सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | सोमवार, २३ सप्टेंबर २०२४ | युगाब्द ५१२५ | वर्ष ४० वे अंक ३२३ | पाने १२ | किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## महत्त्वाचे

### जाहिरात कॉलची जबाबदारी आता टेलिकॉम कंपन्यांचीच



**नवी दिल्ली :** आतापर्यंत जाहिरातीच्या कॉल्समुळे हैराण झालेल्या ग्राहकांना ते कॉल बंद करण्यासाठी स्वत: कंपनीला विनंती करावी लागत होती. टेलिकॉम रेग्युलेटरी अथॉरिटी ऑफ इंडिया (ट्राय)ने हा नियम बदलून ग्राहकांना मोठा दिलासा दिला आहे. आता ट्रायने यासंदर्भात नवीन नियम आणले आहेत. त्यानुसार, अशा कॉल्सची जबाबदारी कंपन्यांचीच राहणार आहे. आता ग्राहक आपोआप या कॉल्समधून बाहेर पडतील आणि ज्यांना असे कॉल्स हवे असतील, त्यांना टेलिकॉम कंपन्यांना ते सुरू ठेवण्याची विनंती करावी लागेल.

## अमेरिकेने परत केल्या २९७ पुरातन वस्तू

### तस्करीच्या माध्यमातून गेल्या होत्या भारताबाहेर

**नवी दिल्ली, २२ सप्टेंबर**

तस्करीच्या माध्यमातून भारताबाहेर नेण्यात आलेल्या २९७ पुरातन वस्तू अमेरिकेने भारताला सोपविल्या आहेत, अशी माहिती अधिकाऱ्यांनी रविवारी दिली.

सांस्कृतिक मालमत्तेची बेकायदेशीर तस्करी ही एक दीर्घकाळ चाललेली समस्या आहे, ज्यामुळे संपूर्ण इतिहासात अनेक संस्कृती आणि देशांना प्रभावित केले आहे तसेच भारताला त्याचा विशेष फटका बसला आहे.



सांस्कृतिक संपर्क अधिक मजबूत करीत आहे आणि सांस्कृतिक संपत्तीच्या अवैध तस्करीविरुद्ध लढा बळकट करीत आहोत. भारताला २९७ मौल्यवान पुरातन वस्तू परत दिल्याबद्दल मी राष्ट्राध्यक्ष ज्यो बायडेन आणि अमेरिकन सरकारचा आभारी आहे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक्सवरील पोस्टमध्ये म्हटले आहे.

यावेळी परत केलेल्या वस्तूंसह २०१४ पासून भारताने जप्त केलेल्या प्राचीन वस्तूंची संख्या ६४० वर गेली आहे. अधिकाऱ्यांनी सांगितले की, केवळ अमेरिकेतून परत आलेल्या वस्तूंची संख्या ५७८ आहे. सध्याच्या भेटीव्यतिरिक्त मोदींच्या यापूर्वीच्या अमेरिका दौऱ्यातही भारताला पुरातन वस्तू परत करण्यात आल्या होत्या.

नरेंद्र मोदी यांनी २०२१ मध्ये केलेल्या अमेरिका दौऱ्यात १५७ पुरातन वस्तू परत करण्यात आल्या. त्यात बाराव्या शतकातील उत्कृष्ट कांस्य नटराज पुतळ्याचा समावेश आहे. (वृत्तसंस्था)

## बायडेन यांना दिली चांदीची रेल्वेगाडी

### महाराष्ट्रातील कारागिरांची कलाकृती

**नवी दिल्ली, २२ सप्टेंबर**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ज्यो बायडेन यांना प्राचीन हस्तनिर्मित रेल्वेगाडीचे मॉडेल भेट दिले, जे महाराष्ट्रातील कारागिरांनी कुशलतेने तयार केलेली आहे. भारतीय धातुकाम कलात्मकतेची अत्युच्च पातळी प्रदर्शित करणरा हा एक दुर्मिळ आणि विलक्षण नमुना आहे.

या पुरातन कलाकृतीवर अत्यंत कठीण असे कोरीव काम करण्यात आले आहे आणि ही रेल्वेगाडी ९२.५ टक्के शुद्ध चांदीतून तयार करण्यात आली आहे. ही कलाकृती म्हणजे वाफेच्या इंजीन युगाला दिलेली मानवंदना आहे, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.




भारत आणि अमेरिकेतील मजबूत संबंधांचे प्रतीक म्हणून मॉडेलला मुख्य गाडीच्या बाजूला दिल्ली-डेलावेआर आणि इंजीनच्या बाजूला इंडियन रेल्वेज असे इंग्रजी आणि हिंदीमध्ये वापरल्या जाणाऱ्या मानक फॉरमॅटवर लिहिण्यात आले आहे.

हे काम केवळ कारागिराच्या अपवादात्मक कौशल्यावर प्रकाश टाकत नाही, तर भारतीय रेल्वेच्या दीर्घ इतिहासाची आणि त्याच्या जागतिक प्रभावांची चमक दाखवते. मोदींनी फर्स्ट लेडी जिल बायडेन यांना भेट म्हणून पश्मिना शाल दिली. पश्मिना शाल हे जम्मू-काश्मीरच्या हस्तकलेचा समृद्ध आणि उत्तम वारसा मानला जातो. (वृत्तसंस्था)

# क्वाड कुणाच्याही विरोधात नाही

### पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा जगाला संदेश

**विलमिंग्टन, २२ सप्टेंबर**

क्वाड कुणाच्याही विरोधात नाही. ही संघटना नियमांवर आधारित आंतरराष्ट्रीय सुव्यवस्था आणि सार्वभौमत्वाचा आदर करण्यासाठी आहे, असा स्पष्ट संदेश पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी चीनचा उल्लेख न करता दिला आहे.

खुले, मुक्त, सर्वसमावेशक आणि भरभराट असलेल्या भारत-प्रशांतला आमचे प्राधान्य आहे, असे मोदी यांनी क्वाड शिखर परिषदेत सांगितले. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ज्यो बायडेन यांनी आयोजित केलेल्या परिषदेला ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान अँटोनी अल्बानीज, जपानचे पंतप्रधान फुमियो किशिडा उपस्थित होते.

आम्ही कुणाच्याही विरोधात नाही. आम्ही नियम आधारित आंतरराष्ट्रीय सुव्यवस्थेचे समर्थन करतो, सार्वभौमत्वाचा आदर करतो, प्रादेशिक एकात्मता आणि सर्व समस्यांचे शांततापूर्ण निराकरण करतो, असे मोदींनी कोणत्याही देशाचे नाव न घेता सांगितले. महत्त्वाचे म्हणजे दक्षिण चीन समुद्र आणि पूर्व चीन समुद्र या दोन्ही ठिकाणी चीन प्रादेशिक वादात गुंतला आहे.



क्वाड राष्ट्रप्रमुखांच्या शिखर परिषदेसाठी रवाना होण्यापूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ज्यो बायडेन यांनी एकमेकांची गळाभेट घेतली व आपल्या अतूट मैत्रीचे दर्शन जगाला घडविले

### दक्षिण आशियासोबत सहकार्य वाढवण्यावर चर्चा

बैठकीत नेत्यांनी दक्षिणपूर्व आशिया, प्रशांत बेटे आणि दक्षिण आशियातील भागीदारींसोबत सहकार्य करण्याच्या अभिनव मार्गांवर चर्चा केली आणि क्वाड सहकार्याच्या भविष्यासाठी मार्गदर्शन केले.

आमचा संदेश स्पष्ट आहे. मदत, भागीदारी करण्यासाठी आणि पूरक होण्यासाठी क्वाड येथेच राहणार आहे. आम्ही एकत्रितपणे आरोग्य सुरक्षा, गंभीर आणि उदयोन्मुख तंत्रज्ञान, हवामान बदल, क्षमता बांधणी क्षेत्रांमध्ये अनेक सकारात्मक आणि सर्वसमावेशक पुढाकार घेतला आहे, असे मोदी म्हणाले.

जगाला संघर्ष आणि तणावाने घेरलेले असताना क्वाडची शिखर परिषद होत आहे. अशा वेळी क्वाडचे लोकशाही मूल्यांसह एकत्र काम करणे संपूर्ण मानवजातीसाठी महत्त्वपूर्ण आहे. डेलावेअरमधील विलमिंग्टन येथे आज क्वाड नेत्यांच्या भेटीमुळे आनंद होत आहे. पुढे जागतिक कल्याणासाठी क्वाड कसे कार्य करू शकते, यावर लक्ष केंद्रित करून झालेल्या चर्चा फलदायी ठरल्या. आम्ही आरोग्यसेवा, तंत्रज्ञान, हवामान बदल आणि क्षमता निर्माण यासारख्या महत्त्वाच्या क्षेत्रांत एकत्र काम करीत राहू, असे नरेंद्र मोदी यांनी एक्सवरील पोस्टमध्ये म्हटले.

क्वाड नेत्यांमध्ये तपशीलवार चर्चा झाली. या चर्चेत सुरक्षा तसेच सागरी सुरक्षा, क्वाड लॉजिस्टिक नेटवर्क, मानवतावादी मदत आणि आपत्ती निवारण सहकार्य वाढवण्याच्या मार्गांवर चर्चा करण्यात आली, अशी माहिती एका अधिकाऱ्याने दिली. (वृत्तसंस्था)

## श्रीलंकेच्या राष्ट्रपतिपदी अनुरा कुमारा दिसानायके

### आज घेणार शपथ

### दुसऱ्या फेरीच्या मतमोजणीत विजयी

**कोलंबो, २२ सप्टेंबर**

श्रीलंकेतील राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीत मार्क्सवादी नेते अनुरा कुमारा दिसानायके यांनी रविवारी विजय मिळवला. निवडणूक आयोगाने दुसऱ्यांदा मतमोजणी केल्यानंतर त्यांना विजयी घोषित करण्यात आले. श्रीलंकेत प्रथमच राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीत दुसऱ्यांदा मतमोजणी झाली. दिसानायके सोमवारी राष्ट्रपतिपदाची शपथ घेणार आहेत.

मार्क्सवादी जनता विमुक्ती पेरामुना पक्षाच्या ब्रॉडर फ्रंट नॅशनल पीपल्स पॉवर अर्थात् एनपीपीचे नेते दिसानायके यांनी समगी जना बालवेगयाचे प्रतिस्पर्धी सजित प्रेमदासा यांचा पराभव केला. विद्यमान राष्ट्रपती रानिल विक्रमासिंघे यांना पहिल्या फेरीत मतांच्या यादीत पहिल्या दोनमध्ये स्थान न मिळू शकल्याने ते शर्यतीतून बाहेर पडले.



दिसानायके सोमवारी शपथ घेणार असल्याचे एनपीपीने सांगितले. ते श्रीलंकेचे नववे राष्ट्रपती असतील.

तत्पूर्वी, निवडणूक आयोगाचे अध्यक्ष एम. ए. एल. रथनायके यांनी सांगितले की, अनुरा कुमारा दिसानायके आणि सजिथ प्रेमदासा यांना राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीत सर्वाधिक मते मिळाली होती, परंतु या दोघांनाही ५० टक्क्यांचा आकडा गाठता आला नाही. आता दुसऱ्या पसंतीची मते मोजून या दोन उमेदवारांना जोडण्यात येणार आहे.

एनपीपीच्या अनुरा कुमारा दिसानायके यांना ३९.५२ टक्के मते मिळाली, तर विरोधी पक्षनेते सजिथ प्रेमदासा ३४.२८ टक्के मतांसह दुसऱ्या क्रमांकावर होते. (वृत्तसंस्था)

### बीएसएफने उधळला घुसखोरीचा डाव

**जम्मू :** येथील आंतरराष्ट्रीय सीमेवर दहशतवाद्यांच्या घुसखोरीचा डाव सीमा सुरक्षा दल अर्थात् बीएसएफच्या जवानांनी उधळून लावत मोठ्या प्रमाणात शस्त्रास्त्र आणि दारुगोळा जप्त केला. आरएस पुरा सीमा भागात शनिवार आणि रविवारी रात्री जवानांनी घुसखोरीचा प्रयत्न उधळून लावला, असे बीएसएफच्या प्रवक्त्याने सांगितले. अंधाराचा फायदा घेत घुसखोर कुंपणाजवळ पोहोचल्याचे निदर्शनास आल्यानंतर जवानांनी हा प्रयत्न धुळीस मिळवला. सकाळी या परिसरात राबवलेल्या शोधमोहिमेत एके रायफल, दोन मॅग्झिन्स, १७ काडतुसे, दोन पिस्तूल, चार मॅग्झिन्स आणि पिस्तूलची २० काडतुसे आढळली. घुसखोरांच्या हालचालीचा सुगावा लागताच जवानांनी लाईट मशीन गनमधून काही फैरी झाडल्या. गोळीबार होताच घाबरलेल्या दहशतवाद्यांनी शस्त्रा□स्त्रे व दारुगोळा मागे ठेवून पळ काढला. एक पाकिस्तानी बॅग, सिगारेटचे पाकीट आणि इतर काही वस्तू घटनास्थळावरून जप्त करण्यात आल्याची माहिती प्रवक्त्याने दिली.

**पूंछमध्ये घुसखोराला अटक**

पुंछ जिल्ह्यातील मेंढर सेक्टरमधील नियंत्रण रेषेवर लष्कराच्या पथकाने रविवारी एका पाकिस्तानी घुसखोराला अटक केली. हसम शहजाद असे त्याचे नाव आहे. तो व्याप्त काश्मिरातील तारिनोट गावातील रहिवासी आहे. पहाटे घुसखोरी करीत असताना लष्कराने त्याला मेंढर उपविभागातील कृष्णा घाटी सेक्टरमध्ये पकडले.

### नोकिया-सॅमसंगसोबत आयडियाचा करार

**नवी दिल्ली :** वाढते कर्ज आणि इतर संकटांत सापडलेल्या व्होडाफोन आयडिया या कंपनीने टेलिकॉम क्षेत्रात खळबळ निर्माण करणारा निर्णय घेतला आहे. या कंपनीने नोकिया, एरिक्सन तसेच सॅमसंग यासारख्या दिग्गज कंपन्यांसोबत तब्बल ३.६ अब्ज डॉलर्सचा करार केला आहे. या कराराअंतर्गत नोकिया, एरिक्सन सॅमसंग या तीन कंपन्या व्होडाफोन आयडिया या टेलिकॉम कंपनीला नेटवर्क इक्विपमेंट्सचा पुरवठा करणार आहेत. हा करार म्हणजे टेलिकॉम क्षेत्रातील सर्वांत मोठी घडामोड म्हटले जाते आहे. या कराराच्या माध्यमातून ४जी आणि ५जी नेटवर्कचा विस्तार करणार आहे.




## वंदे भारतनंतर आता येणार 'वंदे कार्गो'

**नवी दिल्ली, २२ सप्टेंबर**

देशातील पहिली सेमी हायस्पीड ट्रेन वंदे भारतनंतर आता रेल्वेने अमृत भारत ट्रेन, वंदे मेट्रो ट्रेन आणि वंदे स्लीपर ट्रेनसारख्या नव्या ट्रेन प्रवाशांच्या सेवेत आणल्या आहेत. आता आणखी एक कार्गो ट्रेनदेखील नव्याने रेल्वेच्या ताफ्यात दाखल होणार आहे.

वंदे भारत मेट्रो, स्लीपर या ट्रेन धावण्यास सुरुवात झाल्यानंतर मालवाहतुकीसाठी कार्गो ट्रेन धावणार आहे. या ट्रेनमध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञान असणार आहे. रेल्वेने देशातील पहिल्या वंदे कार्गो ट्रेनची झलक समोर आणली आहे.

रेल्वे लवकरच वंदे कार्गो ट्रेनला प्रवाशांच्या सेवेत आणणार आहे. विमानाप्रमाणेच या ट्रेनमधून सामानांचा पुरवठा होणार आहे. यात प्रवाशांसाठी जागा राहणार नाही. छोट्या अंतरावरील मालवाहतुकीसाठी याचा उपयोग होईल. डिसेंबरपर्यंत ही ट्रेन तयार होईल आणि नंतर त्या धावायला लागतील, असे समजते. (वृत्तसंस्था)



### पुन्हा पाऊसधारा; राज्यभर सरी कोसळणार

**पुणे, २२ सप्टेंबर**

मान्सून माघार घेण्याच्या स्थितीत असतानाच, तो पुन्हा सक्रिय होत असून, राज्यातील बहुतांश भागांत चार-पाच दिवस तो बरसणार असल्याचे हवामान विभागाने स्पष्ट केले.

पुणे हवामान विभागाचे तज्ज्ञ डॉ. के. एस. होसाळीकर यांनी त्यांच्या एक्स अकाऊंटवरून ही माहिती दिली.. होसाळीकर यांनी म्हटले आहे की, पश्चिम-मध्य बंगालची खाडी आणि त्याच्या लगतच्या भागात कमी दाबाचे क्षेत्र निर्माण झाले आहे. त्यामुळे राज्यातील बहुतांश भागांत पुन्हा पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. मराठवाडा आणि कोकणातील काही ठिकाणी मध्यम ते जोरदार पाऊस पडणार आहे. (वृत्तसंस्था)




चेन्नई येथील एम. ए. चिदम्बरम् स्टेडियमवर रविवारी बांगलादेशविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्यात २८० धावांनी विजय मिळविल्याचा आनंद साजरा करताना भारतीय क्रिकेटपटू. फिरकीपटू आर. अश्विनने भारताच्या विजयात शतक व ६ बळी अशी दुहेरी भूमिका बजावत अनेक दिग्गजांचे विक्रम मोडीत काढले. भारताने दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेत १-० ने आघाडी घेतली (वृत्त पान १० वर)

## वर्तमानात आपले विचार प्रस्थापित करा

- अध्यक्ष सत्येंद्र सिंह यांचे प्रतिपादन
- वनवासी कल्याण आश्रम कार्यकर्ता परिषदेचा समारोप

**समलखा, २२ सप्टेंबर**

वनवासी समाज हा विशाल सनातनी समाजाचा आधारस्तंभ आहे. आपल्या सर्वांची मुळे जंगलात दडलेली आहेत. प्राचीन वेदांच्या रचनेत वनवासी समाजाचेही म हत्त्वाचे योगदान आहे. सर्व वनवासी समाजाचे सण आणि उपासना पद्धती सनातनी परंपरेवर आधारित आहेत, त्याचा भाव एकच आहे. याला पुस्तकांच्या माध्यमातून इतिहासाचे विकृतीकरण करून इंग्रजांनी तोडण्याचे काम केले. समाजात सध्या संभ्रम निर्माण करणाऱ्या भ्रामक चर्चांपासून समाजाला वाचवण्यासाठी आपले विचार प्रस्थापित करा, असे प्रतिपादन अ. भा. वनवासी कल्याण आश्रमाचे राष्ट्रीय अध्यक्ष सत्येंद्र सिंह यांनी केले.

अखिल भारतीय वनवासी कल्याण आश्रमाच्या समलखा (हरयाणा) येथे आयोजित कार्यकर्ता परिषदेच्या तिसऱ्या दिवशी पहिल्या सत्रात ते बोलत होते. वनवासी बांधव हे संग्रही वृत्तीचे नसून निसर्गाकडून आवश्यक तेवढेच घेतात. अशा वनवासी समाजाचे अस्तित्व टिकवणे हे आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे, असे सत्येंद्र सिंह म्हणाले.

डॉ. राजकिशोर हंसदा भारतातील लव्ह जिहाद आणि लॅण्ड जिहादच्या समस्येवर प्रकाश टाकताना म्हणाले की, झारखंडमधील संताल परगणा भागात ही समस्या दिवसेंदिवस वाढत आहे. तेथे घुसलेले बांगलादेशी मुस्लिम संथाली जमातीच्या मुलींना लग्नाचे आमिष दाखवत आहेत आणि लोकसंख्या वाढवण्याबरोबरच जमिनीही बळकावत आहेत.

नागालॅण्डचे डॉ. थुम्बाई झेलियांग यांनी ईशान्येकडील राज्यांमधील समस्या मांडल्या. छत्तीसगड प्रांताचे संघटन मंत्री रामनाथ यांनीही बस्तरच्या माओवाद्यांच्या समस्येवर प्रकाश टाकला. रविवारी सर्व वनवासी वक्त्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.



**वनवासी बांधवांमध्ये व्यापक काम करा**

तीन दिवसीय कार्यकर्ता परिषदेच्या समारोपप्रसंगी रविवारी उपस्थित असलेले राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी संबोधित केले. परिषदेला आलेल्या सर्व कार्यकर्त्यांनी आपापल्या भागात जाऊन वनवासी बांधवांमध्ये व्यापक काम करावे, असे आवाहन त्यांनी केले. परिषदेत दोन दिवस त्यांच्या उपस्थितीने कार्यकर्त्यांमध्ये उत्साह संचारला. यावेळी बिरहोर जमातीत काम करणारे जशपूरचे पद्मश्री जागेश्वर भगत आणि वनवासी कल्याण आश्रमाचे उपाध्यक्ष एच. के. नागू आणि तेची गोविंद उपस्थित होते.

## कार-कंटेनरच्या अपघातात चाकूरच्या चौघांचा मृत्यू

- पावसामुळे अंदाज न आल्याने घडली घटना
- अंबाजोगाई-लातूर रोड नांदगाव पाटी जवळ अपघात

**तभा वृत्तसेवा,**
**चाकूर, दि. २२ सप्टेंबर-**

बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई-लातूर रोडवर भीषण अपघातामध्ये लातूर जिल्ह्यातील चाकूर तालुक्यातील चार जण जागीच ठार झाले आहेत. मुसळधार पावसात अंदाज न आल्याने कार आणि कंटेनरची धडक झाली असल्याची माहिती समोर येत आहे. हा अपघात इतका भीषण होता की, कारचा चुराडा झाला असून कारमधील सर्व व्यक्तींचा मृत्यू झाला आहे.

घटनेबाबत अधिक माहिती अशी की, बीडच्या अंबाजोगाई-लातूर रोडवर नांदगाव पाटीजवळ स्विफ्ट कार आणि कंटेनरचा भीषण अपघात झाला. या अपघातात स्विफ्ट कारमधील चौघेही जागीच ठार झाले आहेत. सर्व मृत व्यक्ती लातूर जिल्ह्यातील चाकूर तालुक्यातील जगळपूर येथील आहेत. मृत व्यक्तीमध्ये आत्माराम बाणापुरे, माधव खलंग्रे, सौदागर कांबळे या व्यक्तींचे नावे समजली असून एका व्यक्तीचे नाव समजले नाही. बिड जिल्ह्यातील अंबाजोगाई-लातूर रोड येथील नांदगाव पाटी जवळ रात्री उशीरा लातूर जिल्ह्यातील चाकूर तालुक्यातील जगळपूर येथील चार जण स्विफ्ट कारमधून (एम.एच २४ ए.एस ६३३४) औरंगाबादला निघाले होते. रात्री सुरू असलेल्या मुसळधार पावसात अंबाजोगाई लातूर रोडवरील नांदगाव पाटी जवळ त्यांच्या कारची आणि समोरून येणाऱ्या कंटेनरची (एम.एच १२ एम.व्ही ७१८८) जोरदार धडक झाली.



हा अपघात मध्यरात्री एक वाजताच्या सुमारास झाला असल्याची माहिती समोर आली आहे.यावेळी कार कंटेनरच्या खाली घुसल्याने कारचा चुराडा झाला आणि आतील चौघांचा जागीच मृत्यू झाला. अपघाताच्या वेळी मुसळधार पाऊस सुरू होता, त्यामुळे चालकांना समोरून येणाऱ्या वाहनाचा अंदाज न आल्याने अपघात झाला असावा, अशी शक्यता वर्तविण्यात येत आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# क्वाडची शक्ती चांगल्यासाठी

## बैठकीनंतरचे संयुक्त घोषणापत्र

◆ **विलमिंग्टन, २२ सप्टेंबर**

चार सदस्यीय क्वाड हे चांगल्यासाठी एक शक्ती आहे आणि ते पूर्वीपेक्षा अधिक धोरणात्मकरीत्या सुसंगत आहे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह क्वाड नेत्यांच्या बैठकीनंतर जारी केलेल्या संयुक्त घोषणापत्रात म्हटले आहे.

राष्ट्राध्यक्ष ज्यो बायडेन यांनी आयोजित केलेली क्वाड नेत्यांची परिषद शनिवारी त्यांच्या मूळ गावी डेरावेअरमधील विलमिंग्टन येथे झाली. या परिषदेला पंतप्रधान नरेंद्र मोदी, ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान अँथनी अल्बानीज, जपानचे पंतप्रधान फुमियो किशिदा उपस्थित होते.

चार वर्षांपूर्वी क्वाडला नेत्यांच्या पातळीवर उन्नत केल्यापासून ही संघटना पूर्वीपेक्षा धोरणात्मकरीत्या अधिक सुसंगत झाली आहे आणि भारत-प्रशांतसाठी वास्तविक, सकारात्मक आणि चिरस्थायी परिणाम देणारी चांगली शक्ती आहे, असे विलमिंग्टन घोषणापत्रात म्हटले आहे.

अवघ्या चार वर्षांत क्वाड देशांनी एक महत्त्वपूर्ण आणि टिकाऊ प्रादेशिक गट तयार केला आहे, जो पुढील दशकांपर्यंत भारत-प्रशांतला बळकट करेल, असे घोषणापत्रात म्हटले आहे. भारत-प्रशांतमधील चार प्रमुख सागरी लोकशाही म्हणून, जागतिक सुरक्षा आणि समृद्धीचा अपरिहार्य घटक म्हणून आम्ही या गतिशील प्रदेशात शांतता आणि स्थैर्य राखण्यासाठी निःसंदिग्धपणे उभे आहोत. क्वाड गट कोणत्याही अस्थिरता किंवा एकतर्फी कृतींना जोरदार विरोध करतो, असे या घोषणापत्रात चीनच्या संदर्भात म्हटले आहे.

आम्ही या प्रदेशात अलिकडील बेकायदेशीर क्षेपणास्त्र प्रक्षेपणांचा निषेध करतो, जे संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या ठरावांचे उल्लंघन करतात. सागरी क्षेत्रातील अलिकडील धोकादायक आणि आक्रमक कृतींबद्दल आम्ही गंभीर चिंता व्यक्त करतो. आम्हाला असा प्रदेश हवा आहे, जिथे कोणत्याही देशाचे वर्चस्व नाही आणि जिथे सर्व देश बळजबरीपासून मुक्त आहेत आणि त्यांचे भविष्य निश्चित करण्यासाठी त्यांच्या यंत्रणांचा वापर करू शकतात, असे घोषणापत्रात म्हटले आहे. (वृत्तसंस्था)



क्वाड नेत्यांच्या शिखर परिषदेत चर्चा करताना भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ज्यो बायडेन, ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान अँथनी अल्बानीस आणि जपानचे पंतप्रधान फुमिओ किशिदा

## चीन आपल्या सर्वांची परीक्षा घेतोय्

### हॉट माईक सुरू असतानाच बायडेन यांची चिंता

◆ **वॉशिंग्टन, २२ सप्टेंबर**

चीन आपल्या सर्वांची परीक्षा घेत आहे, अशी चिंता अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ज्यो बायडेन यांनी हॉट माईक सुरू असताना क्वाड नेत्यांसमोर व्यक्त केली. यावरून अमेरिका चीनच्या वाढत्या वर्चस्ववादाबाबत किती गंभीर आहे, हे पुन्हा एकदा स्पष्ट झाले.

क्वाड्रिलॅटरल सिक्युरिटी डायलॉग (क्वाड) ही भारत, ऑस्ट्रेलिया, जपान आणि अमेरिका या चार देशांची संयुक्त संस्था आहे. हिंद महासागरातील त्सुनामीनंतर आपत्ती निवारणाच्या प्रयत्नांवर सहकार्यासाठी चार देशांनी चर्चा सुरू केली होती. यंदा या संस्थेची बैठक विल्मिंग्टन येथे होत आहे. या निमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ज्यो बायडेन, ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान अँथनी अल्बानीज आणि जपानचे पंतप्रधान फुमियो किशिदा यांच्यात चर्चा झाली. यावेळी बायडेन यांनी हॉट माईक सुरू असतना चीन आमची परीक्षा घेत असल्याचे सांगितले.

बायडेन म्हणाले की, आमचा विश्वास आहे की, चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग हे देशांतर्गत आर्थिक आव्हानांवर लक्ष केंद्रित करू इच्छितात. चीनमधील अशांतता कमी करण्यासाठी आर्थिक आणि तंत्रज्ञानासह अनेक मुद्द्यांवर चीन आक्रमकपणे आपल्या सर्वांची चाचणी घेत आहे. आमचा विश्वास आहे की, तीव्र स्पर्धेसाठी तीव्र मुत्सद्देगिरी आवश्यक आहे.

चीन संपूर्ण दक्षिण चीन समुद्रावर सार्वभौमत्वाचा दावा करतो, तर व्हिएतनाम, मलेशिया, ब्रुनेई आणि फिलिपाईन्स सारख्या दक्षिणपूर्व आशियाई देशांनी प्रतिदावे केले आहेत. बायडेन यांनी क्वाड नेत्यांना सांगितले की, शी जिनपिंग यांना देशांतर्गत आर्थिक मुद्द्यांवर लक्ष केंद्रित करायचे आहे आणि चीनमधील अशांतता कमी करायची आहे. (वृत्तसंस्था)

## पंतप्रधान मोदींची किशिदांसोबत चर्चा

◆ **विलमिंग्टन, २२ सप्टेंबर**

क्वाड परिषदेच्या पृष्ठभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जपानमधील त्यांचे समकक्ष फुमियो किशिदा यांची भेट घेऊन द्विपक्षीय सहकार्य आणखी बळकट करण्याबाबत चर्चा केली.

ज्यो बायडेन यांनी आयोजित केलेल्या क्वाड परिषदेच्या अनुषंगाने मोदी आणि किशिदा यांची भेट झाली. ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान अँथनी अल्बानीजही या परिषदेला उपस्थित होते. भारत आणि जपानच्या संबंधांचा मोदी व किशिदा यांनी आढावा घेतला आणि द्विपक्षीय संबंध आणखी विस्तारण्यासाठी त्यांनी चर्चा केली.

क्वाड परिषदेच्या पृष्ठभूमीवर नरेंद्र मोदी यांनी फुमियो किशिदा यांची भेट घेतली, असे परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने एक्सवरील पोस्टमध्ये म्हटले आहे. (वृत्तसंस्था)

# विहिंप केंद्रीय मार्गदर्शक मंडळाची आज बैठक

## तिरुपती येथे विविध विषयांवर विचारमंथन

◆ **नवी दिल्ली, २२ सप्टेंबर**

विश्व हिंदू परिषदेच्या केंद्रीय मार्गदर्शक मंडळाची बैठक सोमवारी तिरुपती येथे होणार आहे. आंध्रप्रदेश आणि तेलंगणातील संतांच्या या बैठकीत हिंदू समाजासमोरील आव्हाने आणि त्यावरील उपाय यावर सविस्तर चर्चा होणार आहे. तिरुपती बालाजी मंदिराच्या प्रसादात होणारी भेसळ आणि त्यामुळे निर्माण होणारी परिस्थिती याचाही विचार केला जाणार आहे, अशी माहिती विहिंपचे आंतरराष्ट्रीय सरचिटणीस बजरंग बागडा यांनी दिली.

बैठकीची माहिती देताना ते म्हणाले की, विश्व हिंदू परिषदेचे सर्वोच्च धोरण निश्चितीचे व्यासपीठ संतांचे आहे, ज्यात केंद्रीय मार्गदर्शक मंडळाच्या संतांची प्रमुख भूमिका असते. मंडळाची वर्षातून दोनदा बैठक होते. यावर्षीपासून आम्ही क्षेत्रशः सहामाही बैठका घेण्याचे ठरवले आहे आणि याची पहिली बैठक सोमवारी तिरुपती येथे होणार आहे. यात आंध्रप्रदेश आणि तेलंगणा राज्यातील केंद्रीय मार्गदर्शक मंडळाचे सदस्य असलेले संत सहभागी होतील. ही बैठक दिवसभर चालणार आहे.

या बैठकीत हिंदू समाजासमोरील विविध आव्हानांवर चर्चा केली जाईल आणि त्यावरील उपायांबाबत काही निर्णय घेतले जातील आणि मुख्यतः त्या उपायांमध्ये संतांची भूमिका काय असेल, यावरही मंथन होईल.

तिरुपती बालाजी मंदिरातील प्रसादाबाबत ज्या प्रकारचा गैरसमज आणि चिंताजनक बातम्यांमुळे समस्त हिंदू समाजाला मोठा धक्का बसला आहे, त्याबद्दलही निश्चितपणे चर्चा होईल. या संदर्भात संतांची भूमिका आणि त्यांच्या मार्गदर्शनात कोणते कार्यक्रम राबवायचे यावरही चर्चा होण्याची शक्यता आहे. सोमवारी या बैठकीत संत तिरुपती प्रसादाबाबत प्रस्ताव पारित करण्याचीही शक्यता आहे, असेही बजरंग बागडा यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)



राजधानी दिल्लीतील राष्ट्रीय प्राणी संग्रहालयात रविवारी सकाळी कोवळे उन्ह घेण्यासाठी पिंजऱ्यातून बाहेर आलेले वाघ. त्यांना पाहण्यासाठी लोकांनी गर्दी केली होती

## दोन लाख रुपयांत बिहारचा तरुण बनला आयपीएस

**जमुई** : बिहारच्या जमुई जिल्ह्यातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. दोन लाख रुपये देऊन 'आयपीएस' अधिकारी बनलेल्या तरुणाला सिकंदरा पोलिसांनी अटक केली आहे. पोलिसांच्या चौकशीत ही माहिती समोर आली. सरकारी अधिकारी बनवतो, असे म्हणून तरुणांना फसवणाऱ्या टोळीची माहिती पोलिसांना मिळाली. या टोळीने तरुणाला दोन लाखांत आयपीएसचा बॅच आणि पिस्तूल दिली. मिथलेश कुमार असे या तरुणाचे नाव आहे. ■

# दगडफेक करणारे व अतिरेक्यांची जागा तुरुंगातच

## अमित शाह यांची स्पष्ट भूमिका

◆ **नौशेरा, २२ सप्टेंबर**

जम्मू-काश्मीरमध्ये दगडफेक करणाऱ्यांची आणि अतिरेक्यांची जागा तुरुंगातच आहे. त्यांना सोडले जाणार नाही. जोपर्यंत येथे दहशतवादाचा नायनाट होत नाही, तोपर्यंत पाकिस्तानशी कोणतीही चर्चा होणार नाही, असे प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह केले.

जम्मू-कश्मीर भाजपाचे अध्यक्ष रविंदर रैना यांच्या समर्थनार्थ नौशेरा येथे निवडणूक प्रचारसभेत ते बोलत होते. जम्मू-काश्मीरचे युवक सिंह आहेत. आम्हाला त्यांच्याशी संवाद साधायचा आहे, पण पाकिस्तानशी चर्चा करणार नाही, असे ते म्हणाले.

नॅशनल कॉन्फरन्स-काँग्रेस आघाडीचे सरकार आले, तर ते आपल्या जाहीरनाम्यानुसार दहशतवाद्यांना सोडणार आहेत. फारुख अब्दुल्ला तर आताच जम्मूच्या टेकड्यांमध्ये दहशतवादाच्या पुनरुज्जीवनाबद्दल बोलत आहेत. मला त्यांना सांगायचे आहे की, हे मोदी सरकार आहे व आम्ही दहशतवादाला 'पाताळ'मध्ये गाडून टाकू, असे अमित शाह दहशतवादाविरोधात कठोरपणे म्हणाले.

सीमेवरील रहिवाशांच्या सुरक्षेसाठी सरकारने वर्षानुवर्षे भूमिगत बंकर्स बांधले आहेत. सीमेपलीकडून गोळीबार करण्याची कुणातही ताकद नाही. त्यांनी गोळी चालवली तर आम्ही तोफांनी प्रत्युत्तर देऊ, असेही ते म्हणाले. अमित शाह यांनी आरक्षणावरील नॅशनल कॉन्फरन्स व काँग्रेस नेत्यांच्या वक्तव्यावरही टीका केली. पहाडी, गुज्जर, दलित व इतर मागासवर्गीयांसह वंचित घटकांना दिलेल्या आरक्षणाला कोणालाही हात लावू दिला जाणार नाही, असे ते म्हणाले. राहुल गांधी अमेरिकेत म्हणतात की, आरक्षणाची गरज नाही. मी त्यांना सांगू इच्छितो की, तुम्हाला पात्र समुदायांचे आरक्षण संपवू दिले जाणार नाही, असे अमित शाह म्हणाले. (वृत्तसंस्था)



जाहीर सभेत उपस्थितांना अभिवादन करताना केंद्रीय मंत्री अमित शाह

## चित्रपट वार्ता

### देखण्या प्राजक्ताच्या 'फुलवंती'चा टीझर समोर



**मुंबई** : पद्मविभूषण बाबासाहेब पुरंदरे यांच्या लेखणीतून साकारलेली 'फुलवंती' ही कलाकृती चित्रपटरूपाने ११ ऑक्टोबरला अवतरणार आहे. या चित्रपटाचा टीझर प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. यात भव्य सेट्स, उच्च तंत्रज्ञान वापरून साकारलेली दृश्ये, ऐतिहासिक व्यक्तिरेखा सोबतच दमदार संवाद याची झलक पाहायला मिळते. यात मध्यवर्ती भूमिकेत असलेली प्राजक्ता माळी या चित्रपटाची निर्मातीदेखील आहे. तिच्या जोडीला उमदा, राजबिंडा गश्मीर महाजनी असून, सुप्रसिद्ध नर्तकी आणि प्रकांडपंडीत व्यंकटशास्त्री यांची कथा राहणार आहे. ■

### अभिनेत्री रीमचा चेहरा भाजला

**मुंबई** : अभिनेत्री रीम शेखसोबत मालिकेच्या सेटवर मोठा अपघात घडल्याची माहिती आहे. रीम शेख सध्या कुकिंग-कॉमेडी शो 'लाफ्टर शेफ्स अनलिमिटेड एंटरटेनमेंट' मध्ये दिसत आहे. याच मालिकेच्या सेटवर रीमसोबत दुर्घटना घडली. रीमने या घटनेबाबत चाहत्यांना माहिती दिली. आता या दुर्घटनेचा व्हिडीओ समोर आला आहे. जेवण बनवताना रीम शेखचा चेहरा भाजतो, असे स्पष्ट दिसत आहे. चेहऱ्या भाजल्यानंतर रीम वेदनेने ओरडताना दिसते. स्वतः रीमने याविषयीचा व्हिडीओ शेअर करत आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. ती लिहिते की, काही दिवसांपूर्वी सेटवर झालेल्या अपघातामुळे माझे आयुष्य बदलले असते. मात्र, सुदैवाने मी वाचले. ■

### 'गंगूबाई' फेम शंतनू नव्या सीरिजमध्ये



**मुंबई** : लोकप्रिय अभिनेता शंतनू माहेश्वरी याची 'गंगूबाई काठियावाडी'मधील भूमिका गाजली होती. त्याने आलियाच्या प्रियकराची भूमिका अतिशय उत्तमरीत्या वठवली होती. त्यानंतर त्याच्याकडे चित्रपट आणि वेबसीरिजची नुसती रांग लागली. आता तो 'इश्क इन द एअर' या सीरिजमध्ये दिसत आहे. बीबीसी स्टुडिओज प्रॉडक्शन इंडियाची निर्मिती असलेल्या या मालिकेत प्रतिभावान शंतनूसह मेधा राणा यांच्या प्रमुख भूमिका आहेत. याचा ट्रेलर भेटीला आला तेव्हा चाहत्यांना शंतनू फार आवडला. ही सीरिज ॲमेझॉन एमएक्स प्लेअरवर दिसत आहे. ■

### आता 'रानटी' बनणार शरद केळकर




**मुंबई** : बाहुबलीचा आवाज झालेला अभिनेता शरद केळकर याचा 'रानटी' हा नवा सिनेमा आता येत आहे. नुकतेच या सिनेमाचे पोस्टर समोर आले. या पोस्टरवरून मराठीत कधीही न दिलेला ॲक्शन अवतार पाहायला मिळणार, असा अंदाज वर्तविला जात आहे. अधर्मी वृत्तीचा नाश करणाऱ्या विष्णूची भूमिका तो यात साकारत आहे. चित्रपटाचे दिग्दर्शन समित कक्कड यांनी केले असून, हा चित्रपट २२ नोव्हेंबर रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटाच्या माध्यमातून मराठीला पहिला 'अँग्री यंग मॅन' मिळणार असल्याचे बोलले जात आहे. ■

## भारतीय मीडिया इन्फ्लुएन्सरवर नेपाळमध्ये अत्याचार

**गोरखपूर** : उत्तरप्रदेशच्या महाराजगंज जिल्ह्यात राहणाऱ्या सोशल मीडिया इन्फ्लुएन्सरवर नेपाळच्या एका हॉटेलमध्ये सामूहिक बलात्कार करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. पोलिसांना दिलेल्या तक्रारीत तिने आरोप केला आहे की, महाराजगंज जिल्ह्यातील तीन, गोरखपूर जिल्ह्यातील एक आणि नेपाळच्या दोन तरुणांनी हॉटेलमध्ये तिला मारहाण केली आणि सामूहिक बलात्कार केला. मीडिया इन्फ्लुएन्सर असणारी ही तरुणी नेपाळमध्ये फिरण्यासाठी गेली होती. यादरम्यान ती भैरहवामधील क्लब आणि कसिनोंमध्ये फिरत होती. यानंतर ती हॉटेलात गेली असता ही घटना घडली. ■

# आयटी कंपन्या १० हजार तरुणांना संधी देणार




गेल्या काही दिवसांपासून भारतासह जगभरात आयटी क्षेत्रातून चिंता वाढवणाऱ्या बातम्या येत होत्या. आयटी क्षेत्रातील दिग्गज कंपन्यांनी भरती प्रक्रिया थांबवलेली होती. अनेकांना बाहेरचा रस्ता दाखवला होता. आता मात्र आयटी कंपन्यांनी पुन्हा एकदा तरुणांसाठी आपले दरवाजे खुले केले आहेत. भारतातील आयटी कंपन्या लवकरच फ्रेशर्सना नोकरीची संधी देणार आहेत.

आयटी कंपन्यांकडून आता कॅम्पस इन्टरव्ह्यू घेण्यास सुरुवात करणार आहे. यावेळी आयटी कंपन्या क्लाऊड कॉम्प्यूटिंग, टेडा आणि एआय या क्षेत्रात ज्ञान असणाऱ्यांना संधी देणार आहेत. सध्या आयबीएम, इन्फोसिस, टीसीएस आणि एलटीआयमाइंडट्री कंपन्या लवकरच कॅम्पस इंटरव्ह्यू घेणार आहेत. त्यासाठी या कंपन्यांकडून महाविद्यालयांना भेट दिली जात आहे. यावेळी मात्र निवड प्रक्रिया वेगळ्या पद्धतीने राबवली जाणार आहे.

आयटी क्षेत्रात नावाजलेल्या कंपन्या यावेळी मात्र काही निवडक तरुणांनाच नोकरीची संधी देणार आहेत. यावेळी प्रामुख्याने क्लाऊड कंप्यूटिंग, डेटा ॲनालिटिक्स आणि कृत्रिम बुद्धिमत्तेची माहिती असणाऱ्यांना नोकरी दिली जाऊ शकते. त्यासाठी तरुण-तरुणींना ६ ते ९ लाख रुपयांपर्यंतचे पॅकेज दिले जाऊ शकते. ■

### ऑफ कॅम्पस जॉयनिंगही वाढणार

आगामी वर्षाच्या जुलै महिन्यापासून कॅम्पस इंटरव्ह्यू घेतले जाणार आहेत. अनेकांना ऑफ कॅम्पसच्या माध्यमातूनही नोकरी दिली जाणार आहे. यात टीसीएस कंपनीकडून ४० हजार, इन्फोसिस कंपनीकडून २० हजार तर विप्रो कंपनीकडून १० हजार फ्रेशर्सना नोकरीवर घेतले जाणार आहे. त्यासाठी या कंपन्यांकडून तयारी केली जात आहे. ■

# टर्म इन्शुरन्सकडे भारतीय महिलांचा वाढता कल




नुकत्याच आलेल्या एका अहवालाने महिलांचे टर्म इन्शुरन्सकडे वाढलेला कल दर्शवला आहे, जो समाधानकारक असल्याची चर्चा सुरू आहे. आता महिला अधिक मुदतीचा विमा खरेदी करीत आहेत, जे नियोजनाबाबत त्यांची वाढलेली जागरूकता दर्शवते. महिलांकडून टर्म इन्शुरन्स खरेदी वाढण्याचे मुख्य कारण म्हणजे कुटुंबासाठी आर्थिक नियोजनात त्यांची सर्वांत महत्त्वाची भूमिका. महिला घर सांभाळणाऱ्या असोत किंवा कार्यालयात काम करणाऱ्या, प्रत्येक परिस्थितीत त्या आपल्या कुटुंबाच्या आर्थिक नियोजनात महत्त्वाची भूमिका बजावतात.

विशेषतः नोकरदार महिला ज्या घरापासून दूर आहेत, त्या बाहेरगावी असलेल्या आपल्या कुटुंबाची काळजी घेत आहेत. समोर आलेली आकडेवारी देखील याची पुष्टी करते. टर्म इन्शुरन्स पॉलिसी खरेदी करण्यात नोकरदार महिलांचा सर्वाधिक वाटा आहे. या महिला ५५-६० टक्के पॉलिसी खरेदी करीत आहेत.

नुकताच आलेला हा अहवाल पॉलिसीबाझार या विम्याशी संबंधित ऑनलाईन सेवा पुरवणाऱ्या कंपनीने तयार केला आहे. पॉलिसीबाजारच्या आकडेवारीनुसार, गेल्या दोन वर्षांत महिलांनी खरेदी केलेल्या मुदतीच्या योजनांच्या संख्येत ८० टक्क्यांनी लक्षणीय वाढ झाली आहे. या कालावधीत हाय कव्हरसह पॉलिसी खरेदीत १२० टक्के वाढ झाली आहे. याचा अर्थ असा की, स्त्रिया आता फक्त अधिक विमा खरेदी करत नाहीत, तर त्या अधिक कव्हरेज असलेल्या पॉलिसींची देखील निवड करीत आहेत.

टर्म इन्शुरन्स घेण्यात नोकरदार महिला पुढे आहेत आणि अधिक कव्हर निवडत आहेत. त्यांच्या आर्थिक भविष्याचा विचार करून ते जास्त कव्हर रक्कम निवडत आहेत. २०२२ पासून दोन कोटी किंवा त्याहून अधिक कव्हर रकमेसह मुदत योजना खरेदी करण्याचा ट्रेंड जवळजवळ दुप्पट झाला आहे. ■

### टर्म इन्शुरन्समधील राज्यनिहाय आकडेवारी

- दिल्ली : ८ ते १० टक्के
- हैदराबाद : ६ ते ७ टक्के
- बंगळुरू : ६ ते ७ टक्के
- मुंबई : ४ ते ५ टक्के
- गुंटूर : ४ ते ५ टक्के

# कर्जबाजारी स्पाईसजेटला मिळाले तीन हजार कोटींचे बळ

स्पाईसजेट या विमान कंपनीने क्वालिफाईड इन्स्टिट्यूशनल बायर्सचे शेअर्स विकून तीन हजार कोटी रुपये जमवले आहेत. यामुळे कर्जाच्या गर्तेत बुडालेल्या कंपनीला बऱ्यापैकी आर्थिक बळ मिळाले आहे.

ज्यांनी कंपनीचे शेअर्स विकत घेतले, त्यात सिंगापूरमधील ओडीआय, गोल्डमॅन सॅक्स, नोमुरा सिंगापूर लिमिटेड आणि डिस्कव्हरी ग्लोबल अपॉर्च्यूनिटी मॉरिशस लिमिटेड या विदेशी कंपन्यांचा समावेश आहे. २० सप्टेंबर रोजी ८० हून क्यूआयपी सहभागींनी ४८.७० कोटींहून अधिकचे शेअर्स विकत घेतले. याद्वारे कंपनीला तीन हजार कोटींची कमाई झाली. १९ वर्षांपासून उड्डाण करत असलेल्या स्पाईसजेटला अनेक आव्हानांचा सामना करावा लागत आहे. आता नव्याने आर्थिक व्यवस्था झाल्याने एअरलाईन्सला आपले कर्ज फेडण्यासही मदत मिळणार आहे. ■




# मुकेश अंबानींनी खरेदी केले १००० कोटींचे विमान

जगातील सर्वांत श्रीमंत व्यक्तींपैकी एक असलेल्या रिलायन्स इंडस्ट्रीचे अध्यक्ष मुकेश अंबानी हे पुन्हा एकदा चर्चेत आले आहेत. त्यांनी त्यांच्या चैनीच्या वस्तूंमध्ये १००० कोटींहून अधिक किंमत असलेल्या बोईंग ७३७ मॅक्स ९ या बिझनेस जेटची खरेदी केल्याचे वृत्त समोर आले. अत्याधुनिक बिझनेस जेटची किंमत १००० कोटींहून अधिक असल्याचे बोलले जात आहे.

भारतातील हे सर्वांत महागडे जेट आहे. अल्ट्रा-लाँग-रेंज बिझनेस जेटची खरेदी करणारे अंबानी हे पहिलेच भारतीय आहेत. रिलायन्स इंडस्ट्रीकडे एकूण नऊ खाजगी जेट्स आहेत.

आता त्यात या विमानाची भर पडली आहे. त्यामुळे सर्वाधिक महागडे खाजगी जेट्स असलेले अंबानी हे पहिलेच व्यक्ती ठरले आहेत. बोईंगची नुकतीच चाचणी घेण्यात आली. काही बदलांसह ते नवी दिल्लीत दाखल झाले आहे.

स्वित्झर्लंडमधील युरोएअरपोर्ट बेसल-मुलहाऊस-फ्रीबर्ग येथे या जेट्सच्या केबिनमध्ये बदल करण्यात आले होते. १३ एप्रिल २०२३ हे विमान स्वित्झर्लंडमध्ये दाखल झाले आणि तेथे सर्व अपग्रेड योग्यरीत्या कार्य करीत असल्याची खात्री केली गेली. या खाजगी विमानाची बासेल, जीनेव्हा आणि लंडन ल्युटन विमानतळांवर सहा चाचणी उड्डाणे पार पाडली. २७ ऑगस्ट रोजी या विमानाने बासेल, स्वित्झर्लंड येथून दिल्लीपर्यंतचे शेवटचे उड्डाण घेतले. ■



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# मराठा आरक्षणाबाबत आज मंत्रिमंडळच्या बैठकीनंतर चर्चा

## मुख्यमंत्र्यांचे आंदोलकांच्या शिष्टमंडळाला आश्वासन

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.२३ सप्टेंबर-**

विधानसभा निवडणुका अवघ्या महिनाभरावर आले असताना राज्यात मराठा आरक्षणाचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे मराठा आंदोलन मनोज जरांगे पाटील पुन्हा आमरण उपोषणाला बसले असल्याने माहिती सरकार ला समोर मोठी अडचण निर्माण होण्याची शक्यता आहे त्या पार्श्वभूमीवर मुंबईत आलेल्या मराठा आंदोलकाच्या शिष्टमंडळाने रविवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वर्षा निवासस्थानी भेट घेऊन मागण्याबाबत चर्चा केली .त्यावर सोमवारी होणाऱ्या मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर मंत्र्यांशी चर्चा करण्याचे आश्वासन शिंदे यांनी शिष्टमंडळाला दिले आहे.

त्यामुळे उद्याच्या बैठकीनंतरच जरांगे- पाटील हे उपोषण स्थगित करण्याबाबत निर्णय घेतला जाण्याची शक्यता आहे. सरसकट मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण, सगेसोयऱ्यांचा समावेश आणि हैदराबाद गेझेटप्रमाणे अंमलबजावणी करावी, या मागणीसाठी मराठा आंदोलक मनोज जरांगे- पाटील गेल्या ६ दिवसापासून अंतरवाली सराटी येथे उपोषणाला बसले आहेत. त्यांच्या समर्थनार्थ विविध जिल्ह्यात मराठा समाजाकडून बंद पाळण्यात येत आहे. त्यामुळे मराठा आरक्षणाचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. राज्य सरकारची चर्चा करण्यासाठी मराठा आंदोलकाचे सिस्टिमंडळ शनिवारी पुण्यातून मुंबईला आले आहे त्यांनी आज मुख्यमंत्री शिंदे यांची वर्षा निवासस्थानी भेट घेऊन मागण्याचे निवेदन सादर केले. यावेळी मंत्री शंभूराजे देसाईही उपस्थित होते.

यावेळी त्यांनी महत्वाच्या मुद्द्यांवर चर्चा केली. या बैठकीत मराठा आंदोलकांवरील गुन्हे मागे घेणे, मनोज जरांगे यांचे उपोषण सोडवणे यासोबतच मुंबई मंडळ आणि हैदराबाद संस्थानच्या गॅझेटवर चर्चा झाल्याची माहिती मिळत आहे.

# पोलिसांना मुक्तपणे काम करण्याची संधी द्यावी : ठाकरे

## पंढरपुरातील पत्रकार परिषदेत व्यक्त केली भावना

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२२ सप्टेंबर-**

मनसेला ज्या ठिकाणी माझी गरज असेल त्या ठिकाणच्या मतदारसंघातून विधानसभा निवडणूक लढविण्याची माझी तयारी असल्याचे मनसेचे नेते अमित ठाकरे यांनी सांगितले. याबरोबरच राज्यात महिलांवरील अत्याचाराच्या वाढलेल्या घटना बाबतदेखील चिंता व्यक्त करुन राज्यातील पोलिसांना मुक्तपणे काम करण्याची संधी दिली पाहिजे असेदेखील प्रतिपादन त्यांनी केले. महाराष्ट्रातील लोकांच्या चेहऱ्यावरील हास्य आज लोप पावलेले दिसत आहे. ते परत आणण्याचे काम आम्हाला करावयाचे असून हेच आपले व्हीजन आहे असेही आवर्जून त्यांनी सांगितले.



मंगळवेढा येथे मनसेच्या वतीने आयोजित आलेल्या कुस्ती स्पर्धेच्या उद्घाटनासाठी तसेच दिलीप धोत्रे यांच्या प्रचाराचा नारळ वाढविण्यासाठी अमित ठाकरे यांचा रविवारी मंगळवेढा दौरा होता. मंगळवेढ्याला जाण्या अगोदर पंढरपूर येथे पत्राकारांशी ते बोलत होते. यावेळी मनसेचे नेते दिलीप धोत्रे उपस्थित होते. अमित ठाकरे म्हणाले, मनसेचे प्रमुख राजसाहेब ठाकरे हे जेथून उभारण्यासाठी मला आदेश देतील तेथून निवडणूक लढविण्याची माझी तयारी आहे. त्यामुळे वरळी येथूनच निवडणूक लढविणार असे काही आमच्या पक्षाच्या बैठकीत ठरलेले नाही. आदित्य ठाकरे यांच्याविरुध्द माझे नाव जोडू नका. कारण आपणाला माझ्या तोंडून जे काही वदवून घ्यावयाचे आहे ते मी आपणाला देणार नाही. मनसेमध्ये निवडणूक कोणी, कोठून लढवावयाची या बद्दलचे सर्व अधिकारी पक्ष प्रमुख राजसाहेबांकडेच असतात. समोरच्या पक्षातले आमदार आम्हाला आपल्या पक्षात घ्यावयाचे नाहीत, असा उपरोधिक टोलादेखील अमित ठाकरे यांनी लगाविला.

### आर्थिक निकषावर आरक्षण हवे : ठाकरे

मनसे पक्षाची पहिल्यापासूनच आर्थिक निकषावर आरक्षणाची भूमिका आहे. पक्षाचे प्रमुख राज ठाकरे यांनी वारंवार आपली हीच भूमिका जनते समोर मांडलेली आहे. आम्ही जातपात मानणारे नाहीत. सर्व जाती, धर्मांचे लोक आमच्या पक्षात आहेत. जे गरीब आहेत ते मग कोणत्याही जातीचे असोत त्यांना आरक्षणाचा लाभ भेटला पाहिजे, अशी आमची आग्रही भूमिका आहे. त्यामुळे देशात, राज्यात जी काही आरक्षणाची टक्केवारी आहे, ती अशा प्रकारे असेल तर सर्व जनता खूष होईल, असेही आरक्षणाच्या विचारलेल्या प्रश्नांवर भूमिका मांडताना अमित ठाकरे यांनी सांगितले.

### मनसे राष्ट्रप्रेमी मुस्लिम विरोधी कधीच नाही

दिलीप धोत्रे यांनी मुस्लीम बांधवासाठी आयोजित केलेल्या अजमेर सहलीबाबत अमित ठाकरे यांनी मनसेची भूमिका भारतावर, महाराष्ट्रावर प्रेम करणाऱ्या मुस्लिमांविरुध्द नाही. इथले मुस्लीम दंगली घडवित नाहीत, देशविरोधी कारवाया करीत नाहीत. दंगली कोठे घडतात, देशविरोधी कारवाई कोणती मंडळी करतात हे आपण आवर्जून पहा असेही त्यांनी सांगितले.



# आनंदराव अडसूळ यांचा नियुक्तीबद्दल सत्कार

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई,दि.२३ सप्टेंबर:**

राज्य शासनाच्या अनुसूचित जाती जमाती आयोगाच्या अध्यक्षपदी माजी केंद्रीय अर्थराज्यमंत्री आनंदराव अडसूळ यांची नियुक्ती झाल्याबद्दल को-ऑप बँक एमलॉईज युनियन युनिट : दि डेक्कन मर्चंटस् को-ऑप. बँकेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. अडसूळ हे अनेक वर्षापासून सहकार क्षेत्रात कार्यरत असून सद्या को-ऑप बँक एम्प्लॉईज युनियनचे अध्यक्ष आहेत.

मुंबईत झालेल्या सत्कार सोहळ्याप्रसंगी युनियनचे कार्याध्यक्ष सुनील साळवी, उपाध्यक्ष प्रकाश वाघमारे, मनोहर दरेकर, संघटक सचिव विजय गोवळकर, दिपक गावडे व अभय पाटील, श्रीधर शिंदे, विनोद आंग्रे, सागर केसरकर व विकास काकडे आदी उपस्थित होते.

## ऑर्केस्ट्रा महिलांवरील अत्याचार प्रकरणी

# सराफ नारायणपेठकरांना यांना हायकोर्टाकडून जामीन मंजूर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ सप्टेंबर**

सोलापूर येथील सराफ व्यापारी माणिक सुरेश नारायणपेठकर (रा. ११५९, उत्तर कसबा सोलापूर) यांना महिलेवर अत्याचार केल्या प्रकरणीच्या गुन्हयात क्रिमिनल अपील क्र. ९९९/२०२४ मुंबई उच्च न्यायालयाने सशर्त जामीन मंजूर केला.

याची हकिकत की, एका महिलेने, माणिक नारायणपेठकर यांचे विरुध्द फिर्याद दिली होती की, तिला ऑर्केस्ट्रा मध्ये काम मिळवून देतो असे सांगून १६ फेब्रुवारी २०२४ रोजी बार्शी रोड येथील एका लॉजवर बोलावून अत्याचार केला. त्यामुळे त्यांचे विरुध्द तालुका पोलिस स्टेशन सोलापूर या ठिकाणी गुन्हा दाखल झाला होता. त्यांना त्याप्रकरणात ३० मे२०२४ रोजी अटक झाली होती. सदरच्या प्रकरणात सुरुवातीला तालुका पोलिस स्टेशनचे पोलिसांनी तपास केला. तदनंतर प्रकरणात अट्रोसिटी कायदयाच्या तरतुदी लागू झाल्याने गुन्हा पोलिस उपअधिक्षक संकेत देवळेकर यांच्याकडे तपासासाठी वर्ग झालेला होता. प्रकरणात पोलिसांनी फिर्यादीच्या कथनाचे अनुशंगाने स्पष्ट पुरावा आढळून न आल्याने, पोलिसांनी क्रि.प्रो. कलम १६९ प्रमाणे बंधमुक्त करणेबाबत रिपोर्ट सादर केला होता. तसेच आरोपी विरुध्दची तक्रार सिध्द होत नाही, असा अंतिम 'ब' फायनल रिपोर्टही पाठवला होता. त्याप्रमाणे या प्रकरणात आरोपीनी दुसऱ्यांदा जामिन अर्ज मंडलेनंतर सोलापूर येथील विशेष न्यायाधिशांनी त्यांचा जामिन अर्ज नामंजूर केला होता. त्यावर माणिक नारायणपेठकर यांनी त्यास मुंबई उच्च न्यायालायात आव्हान दिले होते. त्याठिकाणी मुंबई उच्च न्यायालयाने खालील कोर्टाचा जामिन नामंजूरीचा आदेश रद्द करुन आरोपी माणिक नारायणपेठकर यांचा जामीन मंजूर करुन त्यांची रक्कम २५ हजाराच्या जामीनावर मुक्तता करण्याचा आदेश दिला.

यात आरोपीकडून ॲड. शशि कुलकर्णी, ॲड. प्रशांत नवगिरे, ॲड. देवदत्त बोरगावकर, ॲड. रंणजित चौधरी, ॲड. आशुतोष पुरवंत, ॲड. प्रणव उपाध्ये यांनी, तर मुंबई उच्च न्यायालय येथे ॲड. शशि पुरवंत यांनी, तर सरकारतर्फे ॲड. शिल्पा गाजरे धुमाळ यांनी काम पाहिले.

### वकिलांनी असे मुद्दे मांडले...

त्यामध्ये आरोपीचे वकिलांनी असे मुद्दे मांडले की, घटनास्थळावर आरोपी व फिर्यादी यांचे मोबाईल, टॉवर, लोकेशन मिळून येत नाही, यालट फिर्यादिचे मोबाईल टॉवर लोकेशन हे घटनास्थळापासून १५० कि.मी. पेक्षाजास्त अंतरावर दिसून येते, आरोपीस बंधमुक्त, दोषमुक्त करण्याचे दोन्ही रिपोर्ट हे आरोपीने गुन्हा केला नाही असे दर्शवितात. त्यामुळे आरोपीस या पुढे जेलमध्ये ठेवता येणार नाही, असा युक्तीवाद केला सदरचा युक्तीवाद विचारात घेऊन मुंबई उच्च न्यायालयाने जामीनावर मुक्तता केली.

# मंगळवेढ्यात अमित ठाकरेंवर १० जेसिबीने गुलाबांच्या पाकळ्यांची उधळण

## गर्दीतून दिली रुग्णवाहिकेला वाट... मनसे कार्यकर्त्यांनी दाखवले माणुसकीचे दर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. २२ सप्टेंबर-**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने मनसे केसरी २०२४ या जंगी कुस्त्यांचे आयोजन मनसेचे युवानेते अमित ठाकरे यांच्या उपस्थितीत मंगळवेढा येथील इंग्लिश स्कूल येथे आज रोजी करण्यात आले.

या कुस्ती स्पर्धेचे उद्घाटन समारंभासाठी मनसेचे महाराष्ट्राचे युवा नेते अमित ठाकरे यांचे मंगळवेढा येथील दामाजी चौकामध्ये जोरदार स्वागत करण्यात आले.यावेळी जवळजवळ १० जेसीबीच्या सहाय्याने फुलांची उधळण यावेळी करण्यात आली. हजारो कार्यकर्त्याच्या साक्षीने महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पंढरपूर मंगळवेढा



विधानसभेचे अधिकृत उमेदवार दिलीप धोत्रे यांनी दामाजीपंताच्या साक्षीने अमित ठाकरे यांचे स्वागत केले. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या महिला पदाधिकाऱ्यांनी अमित ठाकरे यांचे औक्षण करून स्वागत केले. याप्रसंगी सोलापूर व पंढरपूर विभागातील मनसेचे वरिष्ठ पदाधिकारी उपस्थित होते.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे युवा नेते अमित ठाकरे यांच्या स्वागतासाठी दामाजी चौकामध्ये हजारो कार्यकर्ते ढोल ताशाच्या गजरासह थांबले असता प्रचंड गर्दी व ट्रॅफिक जाम झाले होते. अशा मध्येच एक रुग्ण घेऊन जाणारी रुग्णवाहिका ट्रॅफिकमध्ये अडकली. परंतु मनसेच्या कार्यकर्त्यांनी या रुग्णवाहिकेस जलद गतीने रस्ता मोकळा करून वाट करून दिली. मनसेच्या कार्यकर्त्यांनी दाखवलेल्या या सामाजिक तत्परतेचे सर्व स्तरातून स्वागत होत आहे.

# उच्च न्यायालयाच्या नवीन संकुलाच्या कोनशिलेचे आज अनावरण

**मुंबई दि. २२ सप्टेंबर**

मुंबई उच्च न्यायालयाचे वांद्रे पूर्व येथे बांधण्यात येणाऱ्या नवीन संकुलाच्या कोनशिलेचे सोमवारी (दि.२३ ) सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य सरन्यायाधीश न्या. डॉ. धनंजय चंद्रचूड यांच्या प्रमुख हस्ते अनावरण केले जाणार आहे. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, सर्वोच्च न्यायालयाचे न्या. बी.आर. गवई, न्या. ए.एस.ओक, न्या. दीपंकर दत्ता, न्या. उज्वल भुयान आणि न्या. प्रसन्न बी वराळे व मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय उपस्थित राहणार आहेत. सध्या मुंबईतील फ्लोरा फाऊंटन येथे १६ ऑगस्ट १८६२ रोजी स्थापन झालेली मुंबई उच्च न्यायालयाची इमारत आहे. नोव्हेंबर १८७८ मध्ये बांधण्यात आलेली ही भव्य इमारत केवळ ६ न्यायालये आणि दहा न्यायाधीशांच्या वापरासाठी तयार करण्यात आली होती.मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी असून औद्योगिक आणि आर्थिक विकासात आघाडीवर आहे. काळानुरूप मुंबई उच्च न्यायालयाच्या पायाभूत सुविधांनी युक्त अशा इमारतीची आवश्यकता निर्माण झाली आहे.

या नवीन प्रस्तावित संकुलात न्यायालयीन खोल्या, न्यायाधीश आणि नोंदणी कर्मचाऱ्यांसाठी चेंबर्स, वकील चेंबर्स, सभागृह, ग्रंथालय याबरोबरच बँकिंग सुविधा, वैद्यकीय सुविधा, कॅफेटेरिया, कार पार्किंग, संग्रहालय अशा विविध सोयी सुविधा उपलब्ध असतील.

# सत्यपाल मलिक विधानसभेसाठी मविआचा प्रचार करणार

## मातोश्रीवर केली ठाकरेंशी सविस्तर चर्चा

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**मुंबई, दि.२३ सप्टेंबर:**

लोकसभा निवडणुकीवेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर कडाडून टीका करून चर्चेत आलेल्या जम्मू आणि काश्मीरचे माजी राज्यपाल सत्यपाल मलिक हे आता महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात उतरणार आहेत. महाविकास आघाडीला त्यांनी पाठिंबा जाहीर केला असून आघाडीच्या उमेदवारांसाठी प्रचारसभा घेणार आहेत. दस्तूरखुद्द मलिक यांनी रविवारी पत्रकारांशी बोलताना ही माहिती दिली.

मविआ चे प्रमुख नेते व माजी उद्धव ठाकरे यांची मातोश्री या त्यांच्या निवासस्थानी भेट घेऊन चर्चा केली. त्यानंतर पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले की, आगामी विधानसभा निवडणुकीत जनता सत्ताधारी भाजपला सत्तेवरून पायउतार करेल. त्यांना केवळ मोठा फटका बसणार



नाही, तर निवडणुकीत पक्षाचा सफाया होईल. या निवडणुकीत उद्धव ठाकरे सर्वात महत्त्वाची भूमिका बजावतील. असे सांगून ते म्हणाले की, माझा महाविकास आघाडीला पूर्ण पाठिंबा आहे. मी महाविकास आघाडीसाठी प्रचारही करेन. महाराष्ट्रातील आगामी विधानसभा निवडणुका देशाच्या राजकारणावर लक्षणीय परिणाम करतील. या निकालाचा केंद्रातील सरकारवर परिणाम होणार असल्याचा दावाही त्यांनी केला. मलिक शनिवारपासून मुंबईच्या दौऱ्यावर आहेत. काल त्यांचे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मध्ये आयोजलेल्या भाग घेतला होता. आज सकाळी मातोश्री वर जाऊन उद्धव ठाकरे यांच्याशी सविस्तर चर्चा केली यावेळी आदित्य ठाकरे, शिवसेना नेते खा.संजय राऊत आदी उपस्थित होते.

### कोण आहेत सत्यपाल मलिक?

सत्यपाल मलिक हे केंद्रातील भाजप सरकार आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर सातत्याने निशाणा साधत आहेत. सत्यपाल मलिक एकदा आमदार आणि एकदा खासदार राहिले आहेत. ५ ऑगस्ट २०१९ रोजी जम्मू-काश्मीरमधील ३७० कलम हटविले तेव्हा ते लेफ्टनंट गव्हर्नर होते. पुलावामा येथे झालेल्या लष्कराच्या जवानांवर झालेल्या अतिरेकी हल्ल्याला केंद्र सरकारची निष्क्रियता कारणीभूत असल्याचा आरोप त्यांनी केला होता. त्यामुळे ते चर्चेत आले. त्यांनी बिहार, ओडिशा, गोवा आणि मेघालयचे राज्यपालपदही सांभाळले आहे.

# उपमुख्यमंत्री अजित पवार उद्या करमाळ्यात

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि.२२ सप्टेंबर-**

उपमुख्यमंत्री अजित पवार मंगळवारी २४ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता करमाळा तालुक्याच्या दौऱ्यावर येत आहेत. या दौऱ्यात ते तालुक्यातील विकासकामांचे भूमिपूजन तसेच महिला व शेतकरी मेळाव्याला संबोधित करतील. हा कार्यक्रम झरे फाटा येथील राधेश्याम मंगल कार्यालयात होणार असल्याचे राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष भरत अवताडे यांनी सांगितले.

सकाळी ११ वा. यशवंतराव चव्हाण महाविद्यालय येथे हेलिकॉप्टरने आगमन, कमलाभवानी मातेचे दर्शन घेऊन महापुरुषांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून ते झरे फाटा येथील मेळाव्यासाठी जातील. जाताना सुभाष चौक, देवळाली येथे त्यांचे स्वागत होईल. झरे फाटा येथे सावडी जिल्हा हद्द ते वेणेगाव या ७१ किलोमीटर लांब असलेल्या व २७१.५५ कोटी निधी मंजूर असलेल्या रस्त्याचे भूमिपूजन करणार आहेत. अध्यक्षस्थानी पालकमंत्री चंद्रकांत पाटील राहणार आहेत. यावेळी आ. बबनदादा शिंदे, आ. संजयमामा शिंदे, माजी आ. जयवंतराव जगताप उपस्थित राहणार आहेत. त्यानंतर लाडकी बहीण व शेतकरी मेळाव्याला ते मार्गदर्शन करणार आहेत.देवीचा माळ येथून बाईक रॅली काढण्यात येणार आहे. यावेळी उपस्थित राहण्याचे आवाहन भरतभाऊ अवताडे यांनी केले आहे.



# जिल्हा प्रशासनातील टीम अन् 'मित्र'कडून दिव्यांगांचे टार्गेट पूर्ण

## जिल्हाधिकारी आशिर्वाद यांनी दिली शाब्बासकीची थाप

## २५ दिवसांचे १६ हजाराचे टार्गेट झाले २१ दिवसात पूर्ण

## दिव्यांग बांधवांच्या चेहऱ्यावर 'आनंदाची लकेर'

## राज्यातील दुसऱ्या जिल्ह्यात राबविला यशस्वी प्रयोग

**तभा वृत्तसेवा । अविनाश गायकवाड**
**सोलापूर, दि. २२ सप्टेंबर-**

सोलापूर जिल्हयातील दिव्यांग बांधवांना 'दिव्यांग व्यक्ती अस्मिता अभियान' अंतर्गत दिव्यांगत्व प्रमाणपत्र विशेष मोहिम कार्यक्रमासाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्याशी चर्चा साधून घेतलेले ११ तालुक्यातील २५ दिवसांत १६ हजार दिव्यांगाचे घेतलेले टार्गेट जिल्हा प्रशासनातील टीम आणि मित्र (मिशन इस्टिस्ट्युट फार टर्निंग रिसर्च एंड एक्शन) या संस्थेने २१ दिवसांत पूर्ण केल्याने जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी शाब्बासकीची थाप दिली. दरम्यान, राज्यातील हा दुसरा दिव्यांग बांधवांसाठी केलेला प्रयोग सोलापूर जिल्हा प्रशासनाच्या टीमला घेवून यशस्वी करून दाखविला असल्याची माहिती मित्रचे अध्यक्ष अभिजित राऊत यांनी रविवारी (दि. २२) दै. तरूण भारतशी बोलताना दिली.




दिव्यांग व्यक्तींच्या सक्षमीकरणासाठी आणि त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याच्या उद्येशाने शासनाच्या वतीने विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. दिव्यांगांसाठी असलेल्या शासनाच्या प्रत्येक योजनेचा लाभ घेण्यासाठी दिव्यांगत्व वैद्यकीय प्रमाणपत्र अनिवार्य असते. वेळेत दिव्यांगत्व प्रमाणपत्र मिळाले नसल्याने दरवर्षी शेकडो दिव्यांगांना शासकीय तथा इतर योजनेचा लाभ मिळण्यास दिरंगाई होते. प्रत्येक दिव्यांग व्यक्तीला शासकीय योजनेचा लाभ मिळावा या उद्देशाने दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ नुसार २१ प्रकारच्या दिव्यांग व्यक्तींना मुख्य प्रवाहात टिकवून ठेवण्यासाठी दिव्यांग व्यक्तींना केंद्र शासनाच्या स्वावलंबन प्रणालीद्वारे निर्गमित दिव्यांगत्व प्रमाणपत्र देणे बंधनकारक आहे. हाच दृष्टिकोण लक्षात घेऊन निर्धारित वेळेत दिव्यांगत्व प्रमाणपत्र मिळवून देण्याकरीता दि. १९ ऑगस्ट ते दि. २६ सप्टेंबर २०२४ या कालावधीमध्ये 'दिव्यांग व्यक्ती अस्मिता अभियान' दिव्यांगत्व प्रमाणपत्र विशेष मोहीम जिल्हाधिकारी आशीर्वाद यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आली.

या मोहिमेबाबत विस्ताराने बोलताना मित्र संस्थेचे अध्यक्ष राऊत यांनी सांगितले की, सोमवार, दि. १९ ऑगस्टपासून पंढरपूर तालुक्यातून या मोहिमेला आरंभ करण्यात आला. यानंतर अक्कलकोट, बार्शी, माळशिरस, सांगोला, करमाळा, मोहोळ, माढा (कुर्डुवाडी), मंगळवेढा, द. सोलापूर, उ. सोलापूर आदी तालुक्यात दि. २२ तारखेपर्यंत ही मोहीम राबविण्यात आली आहे. आजतागायत १६ हजार २०४ दिव्यांगांपर्यंत आम्ही पोहोचलो. अजून ३ दिवस ही मोहीब राबविण्यात येणार असून, अजून २ हजारापर्यंत दिव्यांगाला आम्ही या मोहिमेत सहभागी करून घेणार आहोत. ही मोहीम राज्यातच गडचिरोलीनंतर सोलापुरात दुसऱ्यांदा राबविण्यात आली आहे. सोलापूर जिल्ह्यात मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्या प्रमुख मार्गदर्शनात सोलापूर जिल्हयातील दिव्यांग व्यक्तींची डॉ. वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व जिल्हा रुग्णालय, सोलापूर, जिल्हा सामान्य रुग्णालय, सोलापूर येथील दिव्यांग प्रमाणपत्र मंडळातील तज्ञांमार्फत दिव्यांगत्वाचे वैद्यकीय प्रमाणपत्राकरीता निश्चिती करून केंद्र शासनाच्या स्वावलंबन प्रणालीद्वारे त्यांना दिव्यांगत्वाचे वैद्यकीय प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी तपासणी व निदान विशेष मोहिम राबविण्यात येत आहे. ही मोहीम पहिल्या टप्प्यात दि. १९ ऑगस्ट ते २० सप्टेंबर २०२४ या कालावधीत ग्रामीण भागात आणि दि. २३ ते २६ सप्टेंबर कालावधीत शहरी भागात राबविण्यात येईल.

### प्रत्येक दिव्यांगांना घरपोच मिळणार प्रमाणपत्र

११ तालुक्यातील या शिबिरातून नोंदणी झालेल्या सर्व दिव्यांग बांधवांना घरपोच प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. यासाठी संबंधित यंत्रणेला प्रथम प्रशिक्षण देण्यात आले. यानंतर जिल्ह्यातील दिव्यांगांचे सर्व्हेक्षण केले व आता ११ तालुक्यात शिबिरे राबविली आणि आता त्यांना घरपोच दिव्यांग प्रमाणपत्र वाटप करण्यात येणार आहेत.

**- अभिजित राऊत, अध्यक्ष मित्र संघटना**

### १६ प्रशिक्षण कार्यशाळेतून ३७४२ जणांना दिले प्रशिक्षण

मित्र संस्थेमार्फत सोलापूर जिल्ह्यातिल सर्व दिव्यांग व्यक्तींना स्वावलंबी तसेच आत्मनिर्भर करण्यासाठी अधिष्ठाता, शल्य चिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी, शिक्षणाधिकारी (माध्य./प्राथ.) जि.प./म.न.पा. सोलापूर, सर्व गट विकास अधिकारी, वैदयकिय अधिक्षक, तालुका आरोग्य अधिकारी, गट शिक्षणाधिकारी व दिव्यांगत्व प्रमाणपत्र वितरण आरोग्य विभागातील सर्व वैद्यकिय तज्ञ, डॉक्टर्स आणि व्यावसायिक तज्ञ डॉक्टर्स यांचेद्वारे शहरी व ग्रामिण भागातील सामजिक संस्था, त्यांचे पालक, शिक्षक, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर यांना तसेच दिव्यांग कल्याणार्थ कार्यरत असलेल्या स्वयंसेवी संस्था आणि संघटना यांच्या अशा एकूण १६ प्रशिक्षण कार्यशाळाद्वारा एकूण ३ हजार ७४२ व्यक्तींना प्रशिक्षित केल्या.

सोलापूर तरुण भारत
https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# 'ड्रॅगन'ला वेसण घालण्यासाठी हवे सामर्थ्यशाली नौदल

चीनचा वाढता हस्तक्षेप आणि भारत-प्रशांत क्षेत्रातील भू-राजकीय ताकद दाखविण्याचे प्रकार वाढत असल्याच्या पृष्ठभूमीवर हिंद महासागरात लढाऊ क्षमता वाढविण्याचा निर्णय शनिवारी नौदल कमांडर्सच्या बैठकीत घेण्यात आला आहे. एकीकडे साम्राज्यवादी, विस्तारवादी व विश्वासघातकी ड्रॅगन आणि दुसरीकडे दहशतवादाला नेहमीच खतपाणी घालणारा पाकिस्तान या दोन शत्रूंचा उपद्रव दिवसेंदिवस वाढत असताना नौदलाची लढाऊ क्षमता वाढविण्याचा निर्णय अतिशय महत्त्वाचा आणि दूरदृष्टीचा ठरणार आहे. विशेष म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी क्वाड शिखर परिषद व संयुक्त राष्ट्रसंघाच्या महत्त्वपूर्ण परिषदेत सहभागी होण्यासाठी निघत असतानाच नौदलाची मारक क्षमता वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. चीनचा वाढता उपद्रव लक्षात घेता क्वाड शिखर परिषद सुरू होण्यापूर्वीच भारताने घेतलेला हा निर्णय अनेक अर्थाने महत्त्वाचा आहे. चतुर्भुज सुरक्षा संवाद अर्थात क्वाड्रीलॅटरल सिक्युरिटी डायलॉग, ज्याला सामान्यत: 'क्वाड' म्हणून ओळखले जाते, त्यात भारतासह ऑस्ट्रेलिया, जपान व अमेरिकेचाही समावेश आहे आणि या चारही देशांना आक्रमक व विस्तारवादी ड्रॅगनचा मोठ्या प्रमाणात धोका आहे. हिंद महासागर क्षेत्रात भारतीय नौदलापुढे अनेक आव्हाने आहेत. भारतीय नौदलाने आपल्या सामर्थ्याचे आणि एकूणच लढाऊ क्षमतेचे प्रदर्शन करण्यासाठी डिसेंबर २०२३ मध्ये १०० दिवसांची संकल्प मोहीम हाती घेतली होती. या मोहिमेचा समारोप २३ मार्च २०२४ मध्ये झाला होता. आज सहा महिन्यांनंतर पुन्हा नवे नौदल प्रमुख व्हाईस ॲडमिरल दिनेशकुमार त्रिपाठी यांनी नौदलाची लढाऊ क्षमता वाढविण्याचा निर्णय जाहीर करून या संकल्प मोहिमेला प्रत्यक्ष कृतीची जोड दिली आहे. १०० दिवसांच्या आपल्या संकल्प मोहिमेच्या कालावधीत हिंद महासागरात सागरी सुरक्षेशी संबंधित १८ घटना भारतीय नौदलाने शीघ्र आणि प्रथम प्रतिसाद देत हाताळल्या. तसेच ते या कामासाठी सर्वोच्च प्राधान्य दिले गेलेले नौदल ठरले. आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे भारतीय नौदलाने हिंद महासागर क्षेत्रात ११ पाणबुड्या तैनात करून चीनला स्पष्ट संदेश दिला. अशाप्रकारे सामर्थ्याचे दर्शन घडविण्याची तीन दशकांतील ही पहिलीच वेळ आहे, हे विशेषत्वाने नमूद केले पाहिजे. हिंद महासागरात चीनच्या हालचालींमध्ये वाढ झाली आहे. कुठल्याही वेळी चीनच्या पाच ते नऊ युद्धनौका या क्षेत्रात असतात. पाणबुडीसारख्या छुप्या आयुधाने कुठलेही आव्हान मोडून काढण्याची सज्जता आणि वेळप्रसंगी व्यापारी मार्गांवर प्रभाव पाडण्याची क्षमता भारतीय नौदलाने अधोरेखित केली. इस्रायल-हमास संघर्षाच्या पृष्ठभूमीवर भारतीय नौदलाने आपल्या सागरी सुरक्षा मोहिमांची व्याप्ती लक्षणीयरीत्या वाढविली आहे. माल्टाच्या एमव्ही रुएन या मालवाहू जहाजाचे अपहरण झाले, तेव्हा त्याचा शोध घेण्यात भारतीय नौदलाने सक्रिय भूमिका बजावली होती. नौदलाची जहाजे, विमाने आणि विशेष दलांनी सागरी सुरक्षेसाठी आणि सागरी सेवेत कार्यरत समुदायाचे विविध अपारंपरिक धोक्यांपासून रक्षण करण्याचा निर्धार केला आहे. या क्षेत्रातील धोक्यांविषयीच्या माहितीचे आकलन झाल्यानंतर एडनचे आखात आणि लगतचा प्रदेश, अरबी समुद्र तसेच सोमालियाचा पूर्व किनारा अशा तीन भागांत भारतीय नौदलाने विशेष मोहीम राबविली होती. या मोहिमेची आंतरराष्ट्रीय पातळीवर दखल घेण्यात आली. या मोहिमेंतर्गत सागरी क्षेत्रातील धोक्यांना तोंड देण्यासाठी गस्त घालणाऱ्या विमानाचे ९०० तास उड्डाण झाले. भारतीय नौदलाच्या अथक प्रयत्नांचे हे द्योतक आहे. भारतीय नौदलाच्या या प्रयत्नांमध्ये भारताच्या सागरी हितांचे रक्षण करणे, सागरी धोक्यांचा सामना करणे, नव्याने डोके वर काढणाऱ्या चाचेगिरीला विरोध करणे तसेच भारतीय सागरी क्षेत्रात अमली पदार्थांचा व्यापार लक्षणीयरीत्या कमी करणे अशा कामगिरींचा समावेश आहे. अरबी समुद्र, बंगालचा उपसागर, तांबडा समुद्र, पर्शियाचे आखात आणि बब-एल मंडप, होमुझ, मल्लाका, सुंदा व लॅंबॉक यासारख्या सामुद्रधुनींना सामावणाऱ्या हिंद महासागरातील मध्यवर्ती भूभाग म्हणून भारतीय द्वीपकल्पाचे स्थान महत्त्वपूर्ण आहे. जगातील ५० टक्के माल वाहतूक आणि खनिज तेल वाहून नेणाऱ्या दोन तृतीयांश जहाजांची वाहतूक येथून होते. या क्षेत्रातील चिनी आव्हानांना शह देण्यासाठी भारतीय नौदलाने पाणबुडी तैनातीचा पवित्रा घेतला. निकोबार बेट समूहातील कॅम्पबेलपर्यंत एका पाणबुडीने मार्गक्रमण केले. हिंद महासागराला दक्षिण चीन समुद्राशी जोडणारी मल्लाकाची अरुंद पट्टी चीनसाठी आर्थिक व सामरिकदृष्ट्या महत्त्वाची आहे. इंडोनेशियाच्या उत्तरेस केवळ १४५ किलोमीटर अंतरावर हे बेट आहे. ग्रेट निकोबार व बेट सुमात्रादरम्यानच्या व्यापारी मार्गांना ते प्रभावित करू शकते. भारताच्या मुख्य भूमीपासून दीड हजार किलोमीटर अंतरावर विकसित केलेल्या 'आयएनएस बाझ' तळाने सभोवतालच्या क्षेत्रावर देखरेखीसाठी भारतीय नौदलास मोठी शक्ती मिळाली आहे.

भारतीय नौदल आपली शक्ती वेगाने वाढविण्याचा प्रयत्न करीत असला, तरी बलाढ्य ड्रॅगनचे आव्हान फार मोठे आहे. या पृष्ठभूमीवर संरक्षण मंत्रालयाने नवीन ६८ युद्धनौका खरेदी करण्यास मंजुरी दिली असल्याची माहिती आहे. यासाठी २ लाख कोटी रुपये खर्च येणार आहे. वर्ष २०३५ पर्यंत भारत त्याच्या युद्धनौकांची संख्या १७५ करण्याचा प्रयत्न करत असून लढाऊ विमाने आणि हेलिकॉप्टर संख्या वाढवण्यात येणार आहे. नौदलाकडे सध्या १४३ विमाने, १३० हेलिकॉप्टर आणि १३२ युद्धनौका आहेत. आता नवीन पिढीच्या युद्धनौका, पाणबुड्या तसेच अन्य नौका खरेदी करण्याची अनुमती देण्यात आल्याने नौदलाचा मारक क्षमतेत वाढ होणार, यात शंकाच नाही. चीन सध्या हिंद महासागरात त्याचा नौदल तळ बनवण्याच्या प्रयत्नात आहे. त्यासाठी त्याने आफ्रिकेतील जिबुती, पाकचे कराची आणि ग्वादर तसेच कंबोडिया येथील मरी पोर्ट येथे नाविक तळ उभारण्यास प्रारंभ केला आहे. जवळपास ३५० जहाज सामावणारे चीन हे जगातील आकारमानाने सर्वांत मोठे नौदल झाले आहे. त्याच्या सुदूर सागरातील हालचाली वेगाने वाढत असून कुठल्याही वेळी पाच ते नऊ चिनी युद्धनौका, पाणबुड्या हिंद महासागर क्षेत्रात कार्यरत असतात. संशोधनाच्या नावाखाली चिनी जहाजे संचार करीत असतात. नोव्हेंबर २०२३ मध्ये चिनी नौदलाच्या डिझेल-इलेक्ट्रिक पाणबुडीने पश्चिम हिंद महासागरात पाकिस्तानी नौदलासोबत संयुक्त सागरी गस्तीत सहभाग घेतला होता. चीनकडील पाणबुड्यांचा ताफा विस्तारत आहे. पाकिस्तानी नौदल सक्षम करण्यासाठी तो तांत्रिक मदत पुरवतो. हिंद महासागर क्षेत्रात वर्चस्व निर्माण करण्यासाठी ड्रॅगनची धडपड सुरू आहे. चिनी नौदलाकडे बॅलेस्टिक क्षेपणास्त्र डागण्याची क्षमता राखणाऱ्या सहा पाणबुड्या आहेत. डिझेलवर आधारित ४६ पाणबुड्यांचे तो संचालन करतो. चिनी नौदलाच्या आराखड्यानुसार ६५ ते ७० पाणबुड्यांच्या देखभाल दुरुस्तीचे नियोजन आहे. गेल्या १० वर्षांत चीनने १५० नवीन युद्धनौका वाढवल्या आहेत. त्यामुळेच सभोवतालची बदलती परिस्थिती आणि ड्रॅगनच्या धोक्यांना तोंड देण्यासाठी भारतीय नौदलाची जहाजे, युद्धनौका, पाणबुडी व विमाने अशा सर्व स्तरांवर समतोल बांधणीची गरज संसदेच्या संरक्षणविषयक स्थायी समितीने मागेच स्पष्टपणे मांडली आहे. चीनचे हे वाढते आव्हान लक्षात घेता केंद्रातील मोदी सरकारनेदेखील आपल्या संरक्षण बजेटमध्ये भरीव वाढ केली आहे. मात्र, आता आयातीत सामग्रीवर अवलंबून न राहता केंद्र सरकारने स्वदेशी बनावटीच्या अत्याधुनिक लढाऊ जहाज निर्मितीला प्राधान्य देण्याची आवश्यकता आहे. २०२७ पर्यंत नौदलास २०० जहाजांनी सुसज्ज करण्याची योजना आहे. मात्र, ती संथपणे पुढे जात आहे. याला अधिक गती देण्याची गरज आहे. तरच साम्राज्यवादी चीनचे आव्हान यशस्वीपणे परतावून लावता येईल.

## दिल्ली दिनांक

रवींद्र दाणी

# दिल्लीत हंगामी मुख्यमंत्री!

दक्षिण दिल्लीच्या कालकाजी विधानसभा मतदारसंघातून निवडून आलेल्या आतिशी सिंग या दिल्लीच्या मुख्यमंत्री असतील. दिल्लीच्या मुख्यमंत्रिपदी विराजमान होणाऱ्या त्या तिसऱ्या महिला ठरल्या आहेत. केजरीवाल यांनी राजीनामा दिल्यास ते आतिशी सिंग यांना मुख्यमंत्री करतील, हे स्पष्ट झाले होते. १५ ऑगस्ट रोजी दिल्ली सरकारच्या वतीने झेंडावंदन करण्यासाठी केजरीवाल यांनी आतिशी यांचे नाव निश्चित केले होते. तसा निरोप त्यांनी तिहार कारागृहातून दिला होता. पण, नायब राज्यपालांनी हे नाव डावलून कैलाश गहलोत या मंत्र्यास झेंडावंदन करण्यास सांगितले होते. स्व. सुषमा स्वराज या दिल्लीच्या पहिल्या महिला मुख्यमंत्री होत्या. त्यांना केवळ ५२ दिवसांचा अवधी मिळाला होता. नंतर शीला दीक्षित मुख्यमंत्री झाल्या. त्या १५ वर्षे या पदावर होत्या. आता आतिशी सिंग या मुख्यमंत्री झाल्या आहेत आणि त्यांची स्थिती एक हंगामी मुख्यमंत्री अशी राहणार आहे.

**फेब्रुवारीत केजरीवाल?** : २०२५ च्या फेब्रुवारी महिन्यात दिल्ली विधानसभेची निवडणूक होईल. त्यानंतर केजरीवाल पुन्हा मुख्यमंत्री होतील, असे संकेत आहेत. केजरीवाल यांनी राजीनामा देताना एक चालाखी केली आहे. 'न्यायालयात निर्दोष सिद्ध होईपर्यंत आपण या पदावर बसणार नाही,' असे त्यांनी म्हटलेले नाही. ही भूमिका भाजपा नेते लालकृष्ण अडवाणी यांनी हवाला प्रकरणात घेतली होती. न्यायालयात आपले निर्दोषत्व सिद्ध होईपर्यंत आपण संसदेत जाणार नाही, असे त्यांनी घोषित केले होते आणि त्यावर ते कायम राहिले. केजरीवाल यांनी न्यायालयीन प्रक्रियेचा उल्लेख केलेला नाही. दिल्लीच्या जनतेने आपल्याला निर्दोष असल्याचे प्रमाणपत्र दिल्यानंतरच आपण मुख्यमंत्रिपदाच्या व मनीष सिसोदिया उपमुख्यमंत्रिपदाच्या खुर्चीवर बसतील, असे त्यांनी म्हटले आहे. त्यांनी जनतेच्या न्यायालयाचा दाखला दिला आहे. फेब्रुवारी महिन्यात होणार असलेल्या निवडणुकीत पुन्हा केजरीवाल निवडून येतील, असा अंदाज वर्तविला जात आहे. भारताच्या राजकारणात कारागृहात जाऊन कोणताही नेता संपलेला नाही. तिहारमध्ये सहा महिने राहिल्याचा फायदा ते निवडणुकीत उठवतील असे दिसते. निवडणूक प्रचारात ते आपल्या सरकारच्या कामाचा उल्लेख कमी आणि राजकीय कारणांसाठी आपल्याला कसे लक्ष्य केले जात आहे, याचा उल्लेख जास्त करतील असे दिसते. आज तरी दिल्ली भाजपा वा कॉंग्रेसजवळ केजरीवाल यांच्या तोडीचा नेता नसल्याने केजरीवाल यांना जनादेश मिळेल असे मानले जाते. मात्र, त्यांच्या जागा कमी होतील हेही मानले जाते.



**पर्याय नव्हता** : केजरीवाल यांनी कारागृहात असताना राजीनामा दिला नाही आणि कारागृहाबाहेर आल्यावर त्यांनी राजीनामा का दिला, असा एक प्रश्न विचारला जात असला, तरी त्यांच्यासमोर राजीनामा देण्याशिवाय पर्याय नव्हता, हे त्याचे उत्तर आहे. दिल्ली मद्य घोटाळ्यात अंमलबजावणी संचालनालय व सीबीआय यांनी दोन वेगवेगळे गुन्हे त्यांच्यावर दाखल केले आहेत. या दोन्ही प्रकरणांत सर्वोच्च न्यायालयाने त्यांना हंगामी जामीन दिला असला, तरी दोन अटीही टाकल्या आहेत. पहिली अट म्हणजे त्यांना दिल्ली सचिवालयात जाता येणार नाही आणि दुसरी अट आहे त्यांना मुख्यमंत्री म्हणून कोणत्याही सरकारी फाईलींवर सही करता येणार नाही. या दोन अटींचे पालन करीत आपण मुख्यमंत्री राहिल्यास आपले हसे होईल, हे केजरीवाल यांच्या लक्षात आले होते. ती स्थिती तयार होण्यापूर्वी त्यांनी राजीनामा देण्याचा निर्णय घेतला.

**सोरेन अधिक हुशार!** : केजरीवाल आणि झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांची 'केस' जवळपास सारखी होती. सोरेन यांनी अटक होण्याची चिन्हे दिसताच राजीनामा दिला. स्वाभाविकच सर्वोच्च न्यायालयाने त्यांना जामीन देताना मुख्यमंत्री कार्यालयात जाऊ नका, सरकारी फाईलींवर सह्या करू नका, अशा अटी टाकल्या नाहीत. त्यामुळे सोरेन पुन्हा मुख्यमंत्री झाले. मात्र, त्यांनी एक चूक केली. विधानसभा निवडणूक जवळ आली असताना चंपाई सोरेन यांना मुख्यमंत्रिपद सोडण्यास सांगितले. निवडणुका होईपर्यंत त्यांनी संयम दाखविला असता तर चंपाई सोरेन यांना पद गमावण्याची वेळ त्यांच्यावर आली नसती.

**नवी निवड** : केजरीवाल आतिशी सिंग यांना मुख्यमंत्री करतील असे अपेक्षित होतेच. अन्य कोणत्याही नेत्यावर त्यांचा विश्वास नाही. आतिशी सिंग या सर्वात कमजोर नेत्या मानल्या जातात. त्यांना ना जनाधार आहे ना जातीचा आधार आहे. त्या उच्चशिक्षित आहेत हीच काय त्यांची जमेची बाजू. २०२५ ची निवडणूक जिंकल्यानंतर ती आपल्या नेतृत्वाखाली जिंकली आहे, असा दावा न करणारा मुख्यमंत्री त्यांना हवा होता. यासाठी आतिशी सिंग यांच्यापेक्षा दुसरे कोणतेही चांगले नाव त्यांच्याजवळ नव्हते. मधल्या काळात केजरीवाल यांची पत्नी सुनीता केजरीवाल यांच्या नावाचीही चर्चा झाली. पण, यातील धोका ओळखण्याइतपत ते हुशार असल्याने त्यांनी ती चूक केली नाही. आपण आपल्या पत्नीला मुख्यमंत्री केल्यास आपल्यावर परिवारवादाचा आरोप लावला जाईल, याची पूर्ण कल्पना असल्याने त्यांनी तो निर्णय घेण्याचे टाळले. आतिशी सिंग या महिला आहेत, केंब्रिजमध्ये शिकलेल्या आहेत आणि केजरीवाल यांच्याशी एकनिष्ठ आहेत या तीन कारणांमुळे त्यांची निवड करण्यात आली असल्याचे सांगितले जाते.

**राजभवनाशी संघर्ष** : राजधानीत आपचे सरकार आल्यापासून केजरीवाल यांचा राजभवनाशी संघर्ष सुरू होता. नजीब जंग, अनिल बैजल आणि आता विनयकुमार सक्सेना या सर्व नायब राज्यपालांशी केजरीवाल यांचे संबंध कायम तणावाचे राहिले. आता मुख्यमंत्रिपदात बदल झाला असल्याने मुख्यमंत्री आणि नायब राज्यपाल यांच्यात सलोखा दिसेल अशी आशा बाळगण्यास हरकत नाही.

**संकट टळले** : केजरीवाल यांनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला असल्याने आता दिल्लीतील राजकीय व घटनात्मक संकट टळले आहे, असे मानले जाते. त्यांनी राजीनामा दिला नसता तर एक अभूतपूर्व स्थिती राजधानीत तयार झाली असती आणि त्यातून मार्ग काढण्यासाठी राष्ट्रपती राजवट लावणे हा एकच पर्याय केंद्र सरकारसमोर शिल्लक राहिला असता. त्या दिशेने काही हालचाली सुरू झाल्या होत्या. ती स्थिती आता राहिलेली नाही.

**कॉंग्रेसचा विरोध** : कॉंग्रेस पक्षाने मागील काही दिवसात केलेली विधाने पाहता या पक्षाने आम आदमी पक्षाशी फारकत घेण्याचा निर्णय घेतला आहे असे दिसते. हरयाणात कॉंग्रेसने आपशी समझोता करण्यास नकार दिला. पंजाबमध्ये दोन्ही पक्षांमध्ये समझोता कधीच नव्हता. आता दिल्लीतही कॉंग्रेसने आपच्या विरोधात भूमिका घेतली आहे. केजरीवाल यांना जामीन मिळाला आहे. न्यायालयाने त्यांना निर्दोष सोडलेले नाही, अशी सावध प्रतिक्रिया कॉंग्रेसने नोंदविली आहे. आपसोबत आमची युती लोकसभेसाठी आहे, विधानसभेसाठी नाही, अशी भूमिका कॉंग्रेसने घेतली असून याचा आपवर व इंडिया आघाडीतील अन्य पक्षांवर कोणता परिणाम होतो, हे येणाऱ्या दिवसात दिसणार आहे.

**लक्ष हरयाणाकडे** : हरयाणात कॉंग्रेसकडून झालेल्या अपमानाचा बदला केजरीवाल कसा घेणार याची चर्चा राजकीय वर्तुळात केली जात आहे. या निवडणुकीत भाजपाचे १९ तर कॉंग्रेसचे २९ बंडखोर उभे आहेत. यातील किती बंडखोरांना केजरीवाल हाताशी धरतात व निवडणूक निकालांना प्रभावित करतात, हे लवकरच दिसणार आहेत. केजरीवाल यांनी कॉंग्रेसला नुकसान पोहोचविल्यास वा कॉंग्रेसने आपचा सफाया केल्यास- या दोन्ही स्थितीत दोन्ही पक्षांमधील संबंध अधिक दुरावण्याची शक्यता निर्माण होईल.

## वेध

अनिल उमाकांत फेकरीकर

# तारांचे कुंपण लावा! वाघांची दहशत संपवा!!

वाघ म्हणा किंवा वाघोबा तो तुम्हाला सोडणार नाही. संधी मिळताच तो तुमच्या नरडीचा घोट घेणारच. एवढी दहशत वाघांची आहे. कारण तो जंगलाचा राजा आहे. जंगलात राजा टिकलाच पाहिजे. पण प्रजेचे काय? शिवाय पृथ्वीतलावरील मनुष्याचाही विचार तेवढ्याच आत्मीयतेने करायला हवा. पण वर्तमानात वाघांचे कौतुक करताना मनुष्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे. यामुळे जंगलालगत राहणाऱ्या लोकांच्या मनात वाघांबद्दल भीती आणि वन विभागाच्या विरोधात रोष वाढला आहे. याचा प्रत्यय नुकताच रामटेक तालुक्यात आला. वाघाने एका महिलेचा जीव घेतल्यानंतर संतप्त गावकऱ्यांनी वन विभागाच्या कर्मचाऱ्यांवर तुफान दगडफेक केली. कालपर्यंत वन विभागातील कर्मचाऱ्यास काका म्हणून हाक मारणाऱ्या गावातील मुलांनीही दगड हाती धरून त्यांना जखमी केले. त्या गावकऱ्यांची मागणी वाघाला मारून टाका अशी नव्हती, तर त्याला सुरक्षित जागी ठेवा असेच त्यांचे म्हणणे होते. वाघावर गावकरीही प्रेम करतात. पण ज्याच्यावर प्रेम केले जाते, तोच आज त्या गावकऱ्यांच्या जिवावर उठला आहे. म्हणूनच त्यांच्या मते जगा आणि जगू द्या या तत्त्वाने वाघांचा बंदोबस्त करा, एवढीच माफक अपेक्षा त्यांनी वन विभागाकडून व्यक्त केली आहे. आता हा बंदोबस्त कसा करायचा यासंदर्भात पुढाकार वन विभागाला घ्यायचा आहे. माणसाला मारले तर २५ लाख रुपये देत वन विभाग स्वत:ची सुटका करून घेऊ शकत नाही. महागाईच्या काळात २५ लाखांत काहीच होत नाही. द्यायचेच असतील तर वन विभागाने मृत व्यक्तीच्या कुटुंबीयांनी ५ कोटी रुपये द्यायला हवेत. तेव्हा कुठे त्यातून येणाऱ्या व्याजावर त्याचे कुटुंबीय जगेल. पण एवढी रक्कम वन विभाग देणार नाही. यामुळे रोष कधीही कमी होणार नाही, हेही तेवढेच खरे. मग हा प्रकार असाच सुरू ठेवायचा का? नाही. वाघ जगलेच पाहिजे. शिवाय जंगलालगत राहणाऱ्या लोकांचीही सुरक्षा व्हायला हवी. यावर काही सोपे उपाय आहेत.

त्यानुसार जंगलाच्या सभोवताल १० फूट उंच तारांचे कुंपण लावायला हवे. ज्यांना रोज जंगलात गाई-म्हशी, बकऱ्यांना चारायला न्यावे लागते, त्यांना फटाके द्या. शिवाय मोठा आवाज राहील अशी छोट्या आकाराची बॅटरीवर चालणारी साऊंड सिस्टीमही द्या. जेव्हा ते जंगलात राहतील, तेव्हा मोठ्या आवाजात गाणे किंवा कुठलेही संगीत वाजवतील. परिणामी आसपास असलेला वाघ त्यांच्याजवळ भटकणार नाही. असा नवखा प्रयोग पारशिवनी तालुक्यातील कोलितमारा निवासी रामदास सोमकुवर या शेतकऱ्याने केला आहे. याव्यतिरिक्त वनातील प्राणी शेतात आणि गावात पाहुणचारासाठी येऊ नये याकरिता वन विभागानेही जंगलात अधिकाधिक फळांची झाडे युद्धपातळीवर लावत, त्यांचे शंभर टक्के संगोपन करावे. जेणेकरून वन्यप्राण्यांना रसाळ गोमटी फळे जंगलातच खायला मिळतील. जेव्हा ते वन्यप्राणी तिथेच मस्तपैकी पोटभर फळे खातील, तेव्हा त्यांनाच मारून वाघाचेही पोट भरेल नाही का? पण हा साधा उपाय वन विभागाला समजू नये, याचेच आश्चर्य वाटते. समजा तृणभक्षी प्राण्यांना जंगलातच भरपूर खायला मिळाले तर ते कशाला गावात आणि शेतात येतील? पण वन विभागातील हुशार अधिकाऱ्यांनी फळांच्या झाडांकडे दुर्लक्ष करीत सागवान आणि इतर झाडांवर लक्ष केंद्रित केले. परिणामी जंगलात राहणाऱ्या प्राण्यांची उपासमार सुरू झाली. ते पोट भरता यावे म्हणून शेतांकडे वळले. हळूहळू शेतांतून ते गावांत आले आणि आता त्यांचा उपद्रव एवढा वाढला की, तो कमी करणेही कठीण झाले आहे. हरीण, रानडुकरांची संख्या लाखोंच्या घरात आहे. वाघांची संख्याही वेगाने वाढली आहे. भारतात सुमारे ३६८२ वाघ आहेत. महाराष्ट्रात ४४६ वाघांची संख्या आहे. त्यात अजूनही वाढ होतच राहणार आहे. एवढ्या वाघांना पुरेल एवढे जंगलच आज उरलेले नाही. मग ते वाघ गावात नाही घुसणार तर कुठे जातील, याचाही विचार सुज्ञपणे करायलाच हवा. एवढ्या सर्व वाघांना सहजतेने राहू द्यायचे झाल्यास अभयारण्यासह कुठल्याही जंगलाच्या सभोवताल तारेचे दहा फुटी कुंपण टाकल्यास नक्कीच उपाय होऊ शकतो. वाघ सहजतेने गावात येणार नाहीत अन् कटु घटना टळतील. आता यावर वन विभागातील तज्ज्ञ आक्षेप घेतील, एवढ्या मोठ्या क्षेत्रफळात तारेचे कुंपण कसे टाकणार? पैसा कुठून आणायचा अशी अडचण सांगतील. पण माणूस मेल्यावर हेच लोक २५ लाख देतात ना? त्यांनीही याकरिता तरतूद करून तारेचे कुंपण लावा अन् वाघांची दहशत संपवा, हा बेस्ट फॉर्म्यूला अंमलात आणावा. जेव्हा हा प्रयोग सुरू होईल तेव्हा वाघ आणि माणूस यांच्यातील संघर्ष नक्कीच थांबेल.

९८८१७१७८५९

## कानोसा

अमोल पुसदकर

# लगीनघाई का नाही?

नुकताच मॉर्गन स्टॅनले नावाच्या जगप्रसिद्ध कंपनीने एक अहवाल जगासमोर मांडला. त्यामध्ये असे म्हटले आहे की, मुलींचे लग्नाचे वय वाढत आहे. मोठ्या संख्येत मुलींना एकटं राहावंसं वाटत आहे. त्यांना लग्न व लग्नामुळे निर्माण होणाऱ्या जबाबदाऱ्या, मुलंबाळं नको आहे. वयाच्या ४५ व्या वर्षापर्यंत त्यांना एकटं राहावसं वाटत आहे.

भारतासारख्या कुटुंबप्रधान संस्कृती असलेल्या देशाला हे निश्चितच धक्कादायक वाटू शकते. मुलींमध्ये उशिरा लग्न करण्याचा किंवा लग्नच न करण्याचा कल का वाढत आहे, याचाही शोध घेण्याची आवश्यकता आहे. भारतीय समाजाची विशेषता म्हणजे आमची कुटुंब पद्धती आहे. परंतु, लग्नच होणार नसतील किंवा उशिरा होणार असतील तर कुटुंब व्यवस्थेवर त्याचे निश्चितच परिणाम पडणार आहेत. पूर्वी एकत्र कुटुंब पद्धती होती. नोकरी, रोजगार, शिक्षण यामुळे ती हळूहळू समाप्त होत गेली व त्याची जागा एका छोट्या कुटुंबाने घेतली. आज करीअरचे युग आहे. मुलगा असेल किंवा मुलगी; प्रत्येकालाच उत्तम शिक्षण घ्यावे असे वाटत आहे. शिक्षणाचा उपयोग झाला पाहिजे म्हणून नोकरीही केली पाहिजे. त्याचप्रमाणे मोठ्या शहरांमध्ये वाढत्या महागाईला तोंड द्यायचे असेल तर पती-पत्नी दोघांनी पण नोकरी करणे गरजेचे झालेले आहे. त्यामुळे माहेर आणि सासर अशा दोन्ही ठिकाणी मुलींनी नोकरी केली पाहिजे, याला आता पाठिंबा मिळालेला आहे. त्यामुळे मुलींची जडणघडण सुरुवातीपासूनच तुला चांगले शिकायचे आहे, नोकरी करायची आहे, अशा पद्धतीची केली जात आहे. दारासमोर रांगोळी काढली पाहिजे की नाही, स्वयंपाक हे कोणाचे क्षेत्र असावे यावर वाद आहेत. केवळ शिक्षणच नाही तर नोकरीसाठी उच्च शिक्षण घेणे गरजेचे आहे. आजकाल कोणाचा काही भरवसा नाही. त्यामुळे मुली आपल्या पायावर उभ्या झाल्या पाहिजे याबद्दल कोणाचेही दुमत राहिलेले नाही. संसार व्यवस्थित सुरू आहे किंवा नाही यापेक्षा नोकरी सुरू आहे की नाही, हे महत्त्वाचे झाले आहे. परंतु, स्त्री व पुरुष प्रत्येकाचे स्वत:चे असे शरीर निसर्ग नियमाने बांधले गेलेले आहे. त्याच्या काही मर्यादा आहेत. हळूहळू या गोष्टींचा विसर पडत चालला आहे की काय, असे सातत्याने वाटत असते. शिक्षणासाठी लग्नाला उशीर होतो, ही पूर्वीची परिस्थिती होती. त्यानंतर नोकरी लागली की लग्न करू असे म्हणण्याचा कल होता. आता एखादे प्रमोशन मिळाले की लग्न करू, असेही म्हणण्याचा कल दिसून येतो आहे. मुलींचा लग्नासाठी नकार किंवा उशीर याला लग्नामुळे येणारी बंधने कारणीभूत आहेत. आपले हक्काचे राहण्याचे घर सोडून दुसऱ्या घरी जावे लागेल; तिथे आपल्या स्वातंत्र्यावर बंधने येतील. त्यामुळे लग्नाला उशीर केला जात आहे. पूर्वी आई-वडील मुलीसाठी मुलगा पाहायचे. मुलीसुद्धा आपल्याला काय समजते, आई-वडिलांनी पाहिला म्हणजे बरोबरच असेल अशा पद्धतीचा विचार करायच्या. नंतर आई-वडील मुलीला विचारू लागले की, तू कोणी पाहून ठेवला असेल तर आम्हाला सांग. परंतु, मुलींनी जर असा पाहिला नसला तर आई-वडिलांसमोर मुलीसाठी स्थळ शोधणे ही एक मोठी कसरत होऊन गेलेली आहे. त्याला कारणीभूत आहे मुलींच्या वाढलेल्या अपेक्षा. अपेक्षा या असायला हव्यात. चांगला जोडीदार, कर्तबगार जोडीदार, पैसा मिळविणारा जोडीदार अशा अनेक अपेक्षा असू शकतात. परंतु, एकाच व्यक्तीमध्ये किती गुण असावे व असे समाजात किती लोक असावे, हा एक प्रश्न आहे. वाढलेल्या अपेक्षा हा विवाह विलंबाचे एक प्रमुख कारण बनलेले आहे.

लग्नामुळे दोनाचे तीन होणारच आहेत असे समजले जात होते. काही काळापूर्वी 'प्लॅनिंग'च्या नावाखाली त्याला उशीर केला जात होता. परंतु, आता दोघांत तिसरा असावा की नाही, हा मुद्दा चर्चेला आलेला आहे. 'लिव्ह इन रिलेशन' नावाचा एक प्रकार समाजात मोठ्या प्रमाणावर वाढत चाललेला आहे. पूर्वी अपवादाने असलेला हा प्रकार आता राजमान्यता प्राप्त करता झालेला आहे. ज्यांना लग्नाच्या जबाबदाऱ्या नको आहेत ते लोक या पर्यायाकडे बघत आहेत. परंतु, लग्नामुळे जो सामाजिक दर्जा आणि हक्क मुलींना प्राप्त होतो तो 'लिव्ह इन रिलेशन'मुळे प्राप्त होत नाही. ही पण तेवढीच वास्तविकता आहे. साधारणत: मुलेबाळे झाल्यानंतर अनेकांचे संसार स्थिरावतात आणि पुढे चालू लागतात. परंतु लिव्ह इन रिलेशनमध्ये तुमचा जोडीदार कधी बाहेर पडेल हे सांगता येत नाही. विवाहातून होणाऱ्या मुलांचा सामाजिक दर्जा एक वेगळा असतो. 'लिव्ह इन'मध्ये जन्मलेल्या मुलांना तो दर्जा कधीही प्राप्त होऊ शकणार नाही, हे लक्षात घेतले पाहिजे. लिव्ह इन रिलेशनला लग्नाचा पर्याय समजणे हे कितपत बरोबर आहे, याचा विचार समाजाने करणे आवश्यक आहे.

ज्या नैसर्गिक गोष्टींसाठी विवाह हा एक सर्वमान्य, धर्म मान्य पर्याय होता त्या गोष्टींसाठी तकलादू पर्याय शोधले जात आहेत. त्याचा चेहऱ्यावर, शरीरावर दिसणारा परिणाम आहेच; आज ज्याला स्वातंत्र्य समजतो त्यात उद्याचा एकटेपणा दडलेला आहे. योग्य वयात मुलं न झाल्यामुळे त्यातून निर्माण होणाऱ्या आरोग्याच्या समस्या आहेतच. उशिरा होणाऱ्या विवाहामुळे व मुलांमुळे आपले म्हातारपण जवळ येते, परंतु मुले मोठी झालेली नसतात. त्यांच्या जबाबदाऱ्यातून आपण मोकळे झालेले नसतो. त्यांच्या वयाच्या प्रत्येक अवस्थेमध्ये योग्य तशी साथ आपण त्यांना देऊ शकत नाही. त्यांच्या बालपणामध्ये आपण त्यांच्यासारखे लहान होऊन खेळू शकत नाही. त्यांच्या तरुणपणामध्ये आपण त्यांचे मित्र बनू शकत नाही. त्यांचा गृहस्थाश्रम पाहायला कदाचित आपण नसू. न होणाऱ्या लग्नामुळे अनेक प्रकारांचे आजार उद्भवतात. ज्यांना मूलबाळ आहे त्यांना वृद्धाश्रमात राहावे लागते. मग मूलबाळ, लग्नसंसार जर थाटलाच नाही व तसेच आपण एकटे राहिलो व आपला शेवट वृद्धाश्रमात होईल असे समजून घेतले तर काय बिघडले, अशा पद्धतीचा एक युक्तिवाद करण्यात येतो. परंतु वृद्धाश्रम हा अपवाद आहे, नियम नाही हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. सगळ्यांनी आपल्या आई-वडिलांची काळजी घेतली पाहिजे, असा समाज आपल्याला हवा आहे. वृद्धाश्रम निवासी नाही. त्यामुळे शिक्षण, करीअर, नोकरी हे सर्व करीत असताना लग्नाचे वय, त्याची जीवनातील आवश्यकता, एक आदर्श गृहस्थाश्रम उभा करण्याची मुला-मुलींची जबाबदारी आहे. या गोष्टीकडे दुर्लक्ष व्हायला नको, असे वाटते.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## वाचक पत्रे

### रानवाडी-श्रीनगरमधील खेळाचे मैदान दुर्लक्षित

नागपूरच्या श्रीनगर, रानवाडी येथे खेळाचे मैदान असून एक योगा शेड बांधलेले आहे. मैदानाला कुंपण भिंत घातलेली आहे व मैदानात पायी चालणाऱ्यांसाठी पादपथ बांधण्यात आला आहे. या ठिकाणी पूर्वी योगाभ्यास वर्ग चालायचे. रोज सकाळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची शाखा येथे लागते. सध्या मैदानात सर्वत्र गाजर गवत व इतर झुडपे मोठ्या प्रमाणात वाढले असल्यामुळे मैदान खेळण्यायोग्य राहिलेले नाही. तसेच योगा शेडमध्ये कुत्रे व मोकाट गाई दिवसभर बसून शेण व मूत्र ठिकठिकाणी करून ठेवतात. त्यामुळे सदर मैदान व योगा शेड अतिशय दयनीय अवस्थेत आहे. शासनाने मोठ्या प्रमाणात खर्च करून तयार करून दिलेले खेळाचे मैदान व योगा शेड जर वापरणे योग्य नसेल तर हा शासनाचा निधी वाया गेला असेच म्हणावे लागेल. संबंधित विभागाने लक्ष देऊन मैदानावर योगा शेड तसेच पादपथ झुडपापासून मुक्त करून दिल्यास परिसरातील नागरिक, महिलांना व मुला-बाळांना खेळण्यायोग्य चांगले मैदान उपलब्ध होऊ शकेल.



**मिलिंद देशपांडे**/८९५६९८७०८८

### श्राद्धामध्ये कावळ्याचे महत्त्व

कावळा हा पक्षी जन्मजात देवपुत्र आहे. एखाद्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर किंवा श्राद्धकर्माचा वेळेस अन्नाच्या रूपामध्ये ठेवलेला घास कावळ्याने उष्टावणे याला विशेष महत्त्व आहे. श्राद्धाच्या वेळेस ठेवलेला अन्नरूपी घास कावळ्याने खाल्ला तर तो पितरांपर्यंत पोहोचतो, अशी मान्यता आहे. इंद्राचा पुत्र जयंत हा अल्पमतीचा असल्यामुळे त्याने कावळ्याचे रूप धारण केले आणि तो सीतामातेची चेष्टा करू लागला. त्याच्या या कृतीमुळे त्याची चोच सीतामातेच्या पायाला लागून पायाच्या बोटामधून रक्त येऊ लागले. कावळ्याच्या या कृत्यामुळे श्रीरामांना राग आला. त्यांनी कावळ्याच्या दिशेने बाण सोडला. भीतीने कावळा प्राण वाचवण्यासाठी आपले वडील इंद्र यांच्याकडे गेला. इंद्राने कावळ्याला श्रीरामांची क्षमा मागायला सांगितली. परंतु, श्रीरामांनी सोडलेल्या बाणामुळे कावळ्याचा एक डोळा फुटला. शरण आलेल्या कावळ्याला श्रीरामांनी वर दिला की, कावळ्याला अर्पण केलेले अन्न हे अर्पण करणाऱ्यांच्या पितरांना मिळेल. तेव्हापासून श्राद्धविधीमध्ये कावळ्याला विशेष महत्त्व आहे.


**संगीता भोसले**/९७६७५६०२३६

### श्राद्ध परंपरा ही पुराणकालीन!

महाभारत युद्धाच्या वेळेस महारथी कर्णाचा वध होतो. दानधर्म केल्यामुळे त्याला स्वर्गाची प्राप्ती होते. त्याला स्वर्गामधील सर्व सुखे मिळतात. परंतु जेव्हा त्याला भूक लागते तेव्हा त्याला त्याने जसे दान केलेले असते तसेच सोने, हिरे, माणके हे ताटामध्ये वाढले जातात. भुकेने व्याकुळ झालेला कर्ण इंद्राकडे जातो आणि म्हणतो की, मला अत्यंत भूक लागली आहे. मला काहीतरी अन्न खाण्यासाठी द्यावे. त्यावर इंद्र त्याला म्हणतो की, तू जसा दानधर्म केला आहेस तेच अन्न म्हणून तुझ्या ताटामध्ये वाढले आहे. कारण, तू हयात असताना तुझ्या पितरांचे श्राद्ध केलेले नाहीस. तुझे पितर उपाशीच आहेत. त्यावर कर्ण इंद्राला म्हणतो की, माझे पितर कोण आहेत हेच मला माहीत नाही. त्यावेळी इंद्र कर्णाला सोळा दिवसांसाठी परत पृथ्वीवर पाठवतो आणि त्याच्या पितरांचे श्राद्ध करण्यासाठी सांगतो. ते दिवस भाद्रपद कृष्ण पक्षाचे होते. कर्णाने पृथ्वीवर येऊन त्याच्या पितरांचे यथोचित श्राद्ध केले. यावरून श्राद्धविधीची परंपरा ही पुराणकालापासून अस्तित्वात आहे, हे लक्षात येते.

**मनीषा बोराटे**/९४०४९५६८२०

### प्रसादांत भेसळ



तिरुपती बालाजी मंदिरात प्रसादात प्राण्यांची चरबी व फिश ऑईल मिक्स असल्याचे प्रयोगशाळेच्या संशोधनात सिद्ध झाले. सध्या सर्वच गोष्टीत भेसळ असते. त्यामुळे मानवी शरीर रोगांचे माहेरघर झालेले आहे. परंतु पवित्र प्रसादापर्यंत मजल जाईल, असे वाटत नव्हते. तिरुपतीचा लाडू म्हणजे भाविकांसाठी पर्वणी आहे. आपण तिरुपतीला गेलो नाही आणि कोणी नुसता प्रसाद जरी दिला तरी धन्य वाटते. तिरुपतीचा लाडू एक महिना चांगला राहतो हेच त्याचे वैशिष्ट्य आहे. परंतु त्यात मांस मिसळून भक्तांच्या भावना दुखावल्या आहेत. त्यांच्या भावनेशी खेळले आहे. खूप लोक मांसाहारी नाहीत. त्यांना केवढा धक्का बसला असेल. त्यांचा विश्वासघात केला. भेसळ करण्यामागे लोकांच्या भावना दुखावणे, जास्त पैसा कमाविणे की, हिंदू धर्म, त्यांचे देव, देवालये भ्रष्ट करणे हा आहे. भ्रष्टाचारी लोकांची नावे जाहीर करा व त्यांना शिक्षा देण्याचा अधिकार भक्तांना द्या...

**निर्मला गांधी**/९११२२७५२८४

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



सांगोला : किडेबिसरी येथे पावसामुळे रविवारी पहाटे शिवाजी बापू कोळेकर यांच्या घराची भिंत पडल्याने घराचे व संसारोपयोगी वस्तूंचे नुकसान झाले आहे.

# अक्कलकोटमध्ये पाऊस; कुरनूर धरण ७० टक्के भरले

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २२ सप्टेंबर-**

अक्कलकोट शहर व परिसरात शुक्रवारी मध्यरात्रीनंतर शनिवारी व रविवारी दुपारनंतर दिवसभर व संध्याकाळी रात्रीही पावसाने हजेरी लावली. यामुळे आशा पल्लवित झाल्या आहेत. कुरनुर धरणातही ७० टक्के पाणी साठ झाला आहे.

यंदा धरण शंभर टक्के भरेल अशी आशा शेतकऱ्याना लागून राहिली आहे. अक्कलकोट, मैंदर्गी व दुधनी शहराची पाणीपुरवठ्याची भिस्त ही कुरनूर धरणावर अवलंबून आहे. अक्कलकोट तालुक्यात सप्टेंबर महिन्यात परतीच्या पावसाची दमदार हजेरी लागत आहे. विजेचा कडकडाट, लखलखाट व मेघगर्जनेसह शनिवार व रविवारी पाऊस झाला. कुरनूर धरण शंभर टक्के कधी भरेल याकडे शेतकऱ्याचे लक्ष लागून राहिले आहे.



# उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे मोडनिंब येथे स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. २२ सप्टेंबर-**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गटाची जनसन्मान यात्रा रविवारी मोडनिंब येथे दाखल होताच उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे जंगी स्वागत करण्यात आले.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांना मोडनिंब (ता. माढा) येथे सरपंच लक्ष्मी पाटील, स्वाती पाटील, प्रमिला खडके या भगिनींनी राखी बांधली. औक्षण केले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, आमदार बबनराव शिंदे, आमदार संजय शिंदे, कल्याणराव काळे, शंभूराजे मोरे, तालुकाध्यक्ष कैलास तोडकरी आदी उपस्थित होते. परिसरात ठिकठिकाणी झेंडे, फलक लावण्यात आले होते. या जनसन्मान यात्रेस मोडनिंबसह तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.



# मनोज जरांगे-पाटलांचे उपोषण थांबवा : मोहोळकरांची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. २२ सप्टेंबर-**

सगेसोयऱ्यांची अंमलबजावणी करा, मनोजदादा जरांगे-पाटील यांचे उपोषण तात्काळ थांबवा, अशी अशी मागणी मोहोळ येथील मराठा आंदोलकांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे केली.

यावेळी अजित पवार म्हणाले की, तुम्ही मराठा आंदोलकांनी संयम ठेवावा. आम्ही तोडगा काढण्याचा प्रयत्न करतोय. मी मुंबईला गेल्यानंतर तात्काळ उपोषण थांबवण्यासाठी बैठक लावून प्रयत्न करतो. यावेळीड श्रीरंग लाळे, सोमनाथ पवार, बाळासाहेब गायकवाड, महेश पवार, शिवरत्न गायकवाड, मनोज मोरे, मोहन कादे, अजित भोसले, गणेश भोसले, बाबासाहेब पवार, धनू शिंदे, बंडू मुळे, सुनिता नागणे, रत्नाकर डोके उपस्थित होते.




# मेडदच्या तीन विद्यार्थिनींसह एका विद्यार्थ्याने मारली बाजी

**तभा वृत्तसेवा,**
**सदाशिवनगर, दि. २२ सप्टेंबर-**

मेडद (ता. माळशिरस) या खेडेगावातील चार विद्यार्थ्यांनी यश मिळविले असून सिद्धी संदीप पवार हिला सातारा येथील कॉलेजमध्ये एमबीबीएस, विशाल हनुमंत शिंगाडे याने अलिबाग येथील कॉलेजमध्ये एमबीबीएस ला प्रवेश मिळविला आहे.

तर स्नेहा सुरेश हांगे हिने पुणे येथे बीएएमएसला, गौरी सर्जेराव दडस हिने सातारा येथे बीएएमएसला प्रवेश मिळविला आहे. या विद्यार्थ्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# चंद्रशेखर भांड यांचे निधन

**नातेपुते, दि. २२ सप्टेंबर-**



नातेपुतेचे माजी उपसरपंच व माळशिरस पंचायत समितीचे माजी उपसभापती चंद्रशेखर नागनाथ भांड (वय ७८) यांचे रविवारी सकाळी वृध्दापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात नितीन व अजय दोन मुले, एक मुलगी, पत्नी, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

# 'स्वेरी' पंढरपूर तालुक्यातील एकमेव कौशल्य विकास केंद्र

## ● पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्राचे ऑनलाइन उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २२ सप्टेंबर-**

कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभाग यांच्या 'आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्रा' च्या अनुषंगाने आज वर्ध्यात भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विविध विकास कार्याचे उद्घाटन केले. या कार्यक्रमाच्या थेट प्रक्षेपणाचा आनंद स्वेरीतील विद्यार्थ्यांनी घेतला. पंतप्रधान मोदी यांनी शिक्षण विषयक नवीन योजना, समृद्धीपूरक उपक्रम व धोरणासंबंधी विद्यार्थ्यांना बहुमोल मार्गदर्शन केले.

स्वेरीचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वेरीचे कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम. एम. पवार, डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. एन. डी. मिसाळ आणि पदवी अभियांत्रिकीच्या उपप्राचार्या डॉ. मीनाक्षी पवार यांच्या नेतृत्वाखाली स्वेरीच्या अभियांत्रिकी (पदवी व पदविका) महाविद्यालयात या थेट प्रक्षेपण कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या



कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे हे देखील उपस्थित होते. व्हर्च्युअल कॉन्फरन्स (दुरदृष्य प्रणाली) द्वारे या कार्यक्रमाच्या थेट प्रक्षेपणाचे आयोजन केले होते.

स्वेरी डिप्लोमाच्या इंटरनॅशनल कॉन्फरन्स हॉलमध्ये, तसेच इंजिनिअरिंगच्या ट्रेनिंग अँड प्लेसमेंट हॉलमध्ये या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण पाहण्याची सोय करण्यात आली होती. या योजनेत राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मधील व्यवसायिक शिक्षणाचे महत्त्व ओळखून कौशल्य विकास या संकल्पनेचा अधिकाधिक फायदा राज्यातील युवक युवतींना व्हावा, राज्यामधील १ हजार ३० नामांकित महाविद्यालयांमध्ये आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र स्थापन करून महाविद्यालयीन युवक-युवतींना रोजगारक्षम बनविण्याच्या मंत्री महोदयांचा कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता यांचा मानस आहे. त्यापैकी पंढरपूर तालुक्यामधून फक्त स्वेरी महाविद्यालयाची निवड केली आहे. या थेट प्रक्षेपणाचा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी डिप्लोमा इंजिनिअरिंगमध्ये प्रा. व्ही. एस. स्वामी, प्रा. अमेय भातलवंडे, डिग्री इंजिनिअरिंगमधील प्रा. ए. ए. मोटे, प्रा. एस. ए. इनामदार, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

### मोफत मिळणार प्रशिक्षण

या योजनेद्वारे स्वेरीच्या डिप्लोमा इंजिनिअरिंगमध्ये सिव्हिल सर्वेअर आणि ड्रॉप्समन मेकॅनिकल या दोन ट्रेनिंग प्रोग्रामला मान्यता मिळाली आहे. तर डिग्री इंजिनिअरिंगमध्ये सर्वेअर आणि सॉफ्टवेअर इंजिनिअरिंग प्रोडक्ट डेव्हलपमेंट या दोन ट्रेनिंग प्रोग्रामला मान्यता मिळाली आहे. या चारही अभ्यासक्रमांसाठी प्रवेश क्षमता प्रत्येकी ३० विद्यार्थी एवढी आहे. सदरील विद्यार्थ्यांना हे प्रशिक्षण मोफत स्वरुपात मिळणार आहे. या महत्त्वाच्या ट्रेनिंग प्रोग्रामामुळे स्वेरीमध्ये नव्या अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या ज्ञानात नक्कीच भर पडणार आहे.

# मोहोळ, कामती, पेनूर, नरखेडमध्ये बंद

## ● अनगर अप्पर तहसील कार्यालय रद्द करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. २२ सप्टेंबर-**

अनगर अप्पर तहसील कार्यालय रद्द करावे या मागणीसाठी अनेकवेळा आंदोलन झाली. मात्र तो निर्णय रद्द झाला नाही. त्यामुळे रविवारी १० ते ४ मोहोळ शहरासह तालुक्यात मेडिकल व कृषीसेवा क्षेत्र वगळता बंद पाळण्यात आला. याला नरखेड, कामती, पेनूर, मोहोळमध्ये उत्तम प्रतिसाद मिळाला.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांची जनसमान यात्रा रविवारी मोहोळमध्ये येणार असल्याने अनगर अप्पर तहसील कार्यालयाच्या निर्णयाच्या विरोधात जनतेच्या भावना तीव्र आहेत. हे दाखवण्यासाठी मोहोळ तालुका संघर्ष





बचाव समितीच्या वतीने मोहोळ शहर व तालुका बंदची हाक देण्यात आली होती. कुणाचीही मागणी नसताना माजी आ. राजन पाटील व विद्यमान आ. यशवंत माने यांनी जाणीवपूर्वक अनगरला अपर तहसील कार्यालय सुरू केले आहे. हा तालुक्यातील जनतेच्या भावनांवर मीठ चोळण्याचा प्रकार आहे म्हणून अजित पवार जरी मोहोळमध्ये येत असतील, त्यांच्यापर्यंत जनतेच्या भावना पोहोचवण्यासाठी हा बंद पाळण्याचा निर्धार समितीच्या वतीने करण्यात आला होता. त्याला अतिशय चांगले यश मिळाले. अजित पवार शहरात होते, तोपर्यंत आवश्यक सेवा वळून मोहोळ कडकडीत बंद होते. मात्र मार्केट कमिटीच्या आवारातील काही दुकाने सुरू होती.

# गहिनीनाथ महाराजांना महाराष्ट्ररत्न प्रदान

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२२ सप्टेंबर-**

श्री विठ्ठल-रूक्मिणी मंदिर समिती पंढरपूरचे सहअध्यक्ष तथा नाथ संस्थान औसाचे अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांना आफ्टरनून व्हाईस, मुंबई या संस्थेमार्फत महाराष्ट्ररत्न २०२४ पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे.



राज्याचे शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांच्या हस्ते व सीनेअभिनेत्री सोनाली कुलकर्णी व आफ्टरनून व्हाईस, मुंबईच्या संस्थापक अध्यक्षा डॉ. वैदही ताम्हण यांच्या प्रमुख उपस्थित शनिवारी यशवंतराव चव्हाण सभागृह, नरिमन पॉईट मुंबई येथे हा कार्यक्रम झाला. पंढरपूरला श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविक भक्तांना औसेकर महाराज यांनी दिलेल्या सेवा सुविधांची दखल घेत तसेच सहअध्यक्ष म्हणून मंदिर समितीकडे केलेले कार्य तसेच नाथ संस्थानचे अध्यक्ष म्हणून वारकरी संप्रदायातील पूर्वापार चालत आलेली परंपरा टिकवून पुढे वाढवत नेण्यासाठी केलेले कार्य व वारकरी संप्रदायातील योगदान विचारात घेऊन मुंबई येथील नामांकित संस्थेने पुरस्कार देऊन सन्मान केला आहे. या पूर्वी देखील त्यांना महाराष्ट्र भूषण, मराठवाडा भूषण, हिंदुत्व के आधारस्तंभ, धर्म केसरी, धर्म भास्कर, गुरुचरण कमल चंचलिका असे २२ ते २४ पुरस्कार मिळाले आहेत.

# वरुणराजाच्या साक्षीने खवासपूरमध्ये आ. पाटील सन्मानित

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.२२ सप्टेंबर-**

३५ वर्षाच्या प्रदीर्घ राजकीय संघर्षात तालुक्यातील जनतेने मला साथ दिली. माझ्या संपूर्ण आयुष्यात याची उतराई होऊ शकत नाही, इतके माझ्यावर जनतेचे उपकार आहेत. जनतेच्या पाठिंबावरच विकास कामांसाठी पाच हजार कोटी रुपयांचा निधी आणू शकलो. जनतेला भेटल्यानंतर मला काम करण्याची ऊर्जा मिळते. जनतेची सेवा या ध्येयानेच मी काम करीत असून जनतेचा आशीर्वाद हाच माझा ऊर्जा स्त्रोत आहे असे प्रतिपादन आ. शहाजीबापू पाटील यांनी केले.



सांगोला तालुक्यातील खवासपूर गावासाठी ३१ कोटी ८५ लाख रुपयाचा निधी दिल्याबद्दल,स्व.बाळासाहेब ठाकरे उपसा सिंचन योजनेसाठी ८८३ कोटी रुपये मंजूर केल्याबद्दल,माण नदीवरील सर्व बंधारे वर्षातून तीन वेळा भरून देण्याची तरतूद केल्याबद्दल ग्रामस्थांच्या वतीने आ. शहाजीबापू पाटील यांचा नागरी सत्कार करण्यात आला. यावेळी सत्काराला उत्तर देताना ते बोलत होते.

यावेळी गोविंद जरे, रफिकभाई नदाफ, राणीताई माने, शिवाजी घेरडे, दिग्विजय पाटील, दादासाहेब लवटे, गुंडादादा खटकाळे, दीपक ऐवळे, प्रितेश दिघे, अजिंक्य शिंदे, लक्ष्मण भोसले, केशर भोसले, बाळासाहेब भोसले, शामराव बागल, सतीश पाटील, राजू गायकवाड, विकी भोसले, सौदागर सावंत, विनोद ऐवळे, आबा ऐवळे, धनाजी बोडरे, मुरलीधर जरे, सुरेश जरे, दुर्योधन जरे, जयवंत भोसले, मनीषा भोसले, रोहिणी बागल, हेमा बोडरे, रूपाली गायकवाड, कल्पना जरे, अनिता भोसले, महादेव ऐवळे, शहाजी सावंत, संदीप सावंत, अमोल वाघमारे, दादा माने, संजय भोसले, निलेश भोसले, सतीश पाटील, मधुकर फुले उपस्थित होते. यावेळी शिवसेनेच्या शाखांचे उद्घाटन करण्यात आले.

# वर्ध्यातील पीएम विश्वकर्मा मेळाव्यात पंढरीच्या कारागिरांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २२ सप्टेंबर-**

पीएम विश्वकर्मा योजनेंतर्गत वर्धा येथे झालेल्या मेळाव्यात पंढरपुरातील स्वप्निल टमटम, विशाल वाडेकर, नितीन पानकर, अनिल इंदापूरकर, निरंजन पानकर यांनी सहभाग घेतला होता. त्यांच्या कलाकृतीचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह मान्यवरांनी कौतुक केले.



तुळशी माळ करणाऱ्या कारागिरांना निमंत्रित करण्यात आले होते. या मेळाव्यात त्यांचे स्टॉल होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्टॉलला भेट दिली. कारागिरांना जिल्हा अधिकारी कुमार आशीर्वाद, जिल्हा प्रशासन अधिकारी वीणा पवार, प्रशासक सचिन इथापे, मुख्याधिकारी डॉ. प्रशांत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली उपमुख्याधिकारी ॲड. सुनिल वाळूजकर, योगेश काळे, संतोष कसबे, सचिन सरवदे, अनिकेत सर्वगोड विशेष प्रयत्न करून वर्धा येथे पाठविले होते. त्यांच्या स्टॉलला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भेट दिली, त्यावेळेस त्यांच्या आनंदाला पारावर उरला नाही. त्यांनी जिल्हा प्रशासन व पंढरपूर नगरपालिका प्रशासनाचे आभार व्यक्त केले.

# खासबाग येथे दीड लाखाची घरफोडी

**ताभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२२ सप्टेंबर**

अक्कलकोट शहरातील खासबाग नवशा गणपतीजवळील बंद घर फोडून एक लाख साठ हजारांची चोरी झाली. ६ सप्टेंबर रोजी १० वा. ते दि.२१ सप्टेंबरदरम्यान ही घटना घडली.

बंद घराचे दार फोडून ४० हजार रुपयाचे एक तोळ्याच्या सोन्याची अंगठी, २० हजार रुपयांची अर्धा ताळे सोन्याची अंगठी व एक लाख रूपये रोख असे एक लाख साठ हजार रूपयांचा ऐवज चोरून नेला.



फिर्यादी महिला ही सून व नातू यांच्याकडे गणपती सणानिमित्त गेल्या असता ही चोरी झाली. अक्कलकोट उत्तर पोलीस ठाणे येथे अज्ञात चोरट्याविरूद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत फिर्याद सेवानिवृत्त लिपीक ताराबाई उर्फ विजयालक्ष्मी भीमराव हांडे यांनी दिली आहे.

# पाठखळ-खडकी मार्गावर टिप्परच्या धडकेत दुचाकीस्वार जागीच ठार

**मंगळवेढा, दि. २२ सप्टेंबर-**

पाठखळ-खडकी मार्गावर नातेवाईकाच्या वर्षश्राध्द संपवून घराकडे मोटरसायकलवर जाणाऱ्या ४५ वर्षीय तरुणाला एका भरधाव वेगात आलेल्या टिप्परने जोराची धडक दिल्याने ते जागीच मयत झाले. या प्रकरणी अज्ञात टिप्पर चालकाविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.

फिर्यादी सहदेव भंडारे (रा. हुन्नूर) यांचे बंधू तथा मयत युवराज चंद्रकांत तेलंग (भंडारे, वय ४५) हे २२ सप्टेंबर रोजी दुपारी १.५० वाजता पाठखळ येथील नातेवाईकांचा वर्षश्राध्द विधी संपल्यानंतर हुन्नूरकडे मोटरसायकल (क्र. एम. एच.१२/ई. जे.०५६४) वरुन पाठखळ ते खडकी रोडने जात असताना सिध्देश्वर हाके यांच्या घराजवळ रोडवर आले असता समोरुन येणारा टाटा कंपनीचा टिपर (क्र. एम. एच. १४/ एच. जी. ७४५६) च्या चालकाच्या दुर्लक्षपणामुळे ही घटना घडली.

# अक्कलकोट बसस्थानकावर साडेनऊ तोळे दागिन्याची चोरी

**अक्कलकोट, दि.२२ सप्टेंबर-**

बसमध्ये चढत असताना अज्ञात चोरट्याने तब्बल साडेनऊ तोळ्याचे सुमारे तीन लाख रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेले. ही घटना शनिवारी दुपारी १२ वाजता घडली आहे.

याबाबत वैशाली दीपक चांदेकर अंगणवाडी सेविका यांनी फिर्याद दिली असून उत्तर पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.फिर्यादी या मुंबई येथील पालघरचे रहिवासी आहेत. त्या कलबुर्गी येथील त्यांच्या मुलीस भेटण्यास निघाल्या होत्या. शनिवार २१ सप्टेंबर रोजी सव्वाबारा वाजण्याच्या सुमारास त्या अक्कलकोट बसस्थानकावर येऊन कलबुर्गीचया बसमध्ये चढत होत्या. याचदम्यान फिर्यादीच्या बॅगेमधील ९ तोळ्यांचे सोन्याचे हार, मंगळसूत्र, ५ ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी चोरट्याने चोरून नेली. या घटनेत २ लाख ८५ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरीला गेल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

# सांगोल्यात यंदा ५७ हजार १५० हेक्टरवर रब्बी पेरणीचे नियोजन

## तालुका कृषी अधिकारी शिवाजी शिंदे यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२२ सप्टेंबर-**

सांगोला तालुक्याचे सरासरी रब्बी पेरणी क्षेत्र ४४ हजार ४७१ हेक्टर आहे. यामध्ये रब्बी ज्वारी ३७ हजार ४७९ हे., मका ५ हजार १५६ हे., गहू ८२२ हे., हरभरा ७६८ हे. या प्रमुख पिकांची पेरणी केली जाते. गतवर्षी रब्बी हंगामामध्ये ४२ हजार १२ हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली होती.

गतवर्षी दुष्काळी परिस्थितीमुळे पेरणी कमी झाली होती. यावर्षी रब्बी हंगामामध्ये ५७ हजार १५० हेक्टर पेरणीचे नियोजन केले आहे. यामध्ये ज्वारी ३६ हजार हे., मका १५ हजार हे., गहू ३ हजार हे., हरभरा ३ हजार हे., करडई १०० हे., सूर्यफूल ५० हे. पेरणीचे नियोजन केले आहे, अशी माहिती तालुका कृषी अधिकारी शिवाजी शिंदे यांनी दिली. शेतकरी बांधवांनी चांगला पेरणीयोग्य पाऊस पडल्यानंतर जमिनीमध्ये पुरेसा ओलावा पाहून बिजप्रक्रिया करूनच रब्बी पिकांची पेरणी करावी. कृषी विभागामार्फत रब्बी ज्वारी पिकाचे १००० हे क्षेत्रावर प्रात्यक्षिक प्रकल्प राबविले जात आहेत. त्याचबरोबर अनुदानावर ज्वारीचे प्रमाणित बियाणेही वाटप केले जात आहे.खरेदी विक्री संघ व शेतकी भवन सांगोला येथुन परमिट वर किंवा ७/१२ व आधारकार्ड देऊन अनुदानावर ज्वारी बियाणे उपलब्ध आहे. रब्बी ज्वारीसाठी पेरणीपुर्वी प्रती किलो बियाणास ४ ग्रॅम गंधक (३०० मेश पोताचे) व थायमिथाक्झाम ३ ग्रॅम याप्रमाणे रासायनिक बिजप्रक्रिया करावी. त्याचबरोबर २५ ग्रॅम अझोटोबक्टर व पि.एस.बी कल्चर प्रती किलो बियाणे याप्रमाणे जैविक बिजप्रक्रिया करावी असे आवाहन शिवाजी शिंदे यांनी केले आहे.

> रब्बी ज्वारी पेरणीसाठी फुले रेवती, फुले सुचित्रा, मालदांडी ३५-१, फुले वसुधा, परभणी मोती, परभणी ज्योती, परभणी क्रांती या सुधारित वाणांचा वापर करावा. बाजारामध्ये बियाणे पुरेशा प्रमाणामध्ये उपलब्ध आहेत. शेतकऱ्यांनी अधिकृत दुकाणदाराकडूनच बियाणे, खते व कीटकनाशके खरेदी करावेत. दुकाणदाराकडून पक्के बिल घ्यावे. बॅग व लेबल जपून ठेवावे. बॅगवरील किंमतीपेक्षा जादा रक्कम देऊ नये. अधिक माहितीसाठी कृषी विभागाशी संपर्क साधावा.
>
> - शिवाजी शिंदे, तालुका कृषी अधिकारी, सांगोला



**खरेदीपूर्व जाहीर नोटीस**

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, डि. सब डि. सोलापुर पैकी तालुका उत्तर सोलापुर पैकी मौजे, भोगाव येथील ग्रामपंचायत हद्दीतील बिनशेती दोन प्लॉट जागा यासी नविन गट नं. ७२/१ब/२अ यापैकी प्लॉट नं. ४५ व ६० यासी प्रत्येकी क्षेत्रफळ १.९५.१७ आर.चौ. मी. इतके खुली जागा यासी एकत्रित चर्तुसिमा : पुर्वेस : रस्ता, पश्चिमेस : रस्ता, दक्षिणेस प्लॉट नं. ४४ व ६१, उत्तरेस रस्ता. येणेप्रमाणे वर नमुद केलेली मिळकत ही श्री. जगदीश केशव स्वामी यांच्या खरेदीमालकी व कब्जेवहिवाटीचे असून सदर मिळकत ही त्यांनी आमचे आशिलास कायमखुष खरेदी देण्याचे ठरवून इसारा पावती करून रक्कम स्विकालेली आहे. सदर मिळकत ही निर्वेध, निजोखमीतेची, बोजारहित असल्याची खात्री व विश्वास त्यांनी आमचे आशिलास दिलेली आहे.

तथापि पर नमुद मिळकतीवर कोणाचाही मालकी, साठेखत, लिज, लीन, जप्ती, टाच, गहाण, दान, बक्षीस, हिश्श्या, पोटगी, बोजा, चार्ज, कब्जा व इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्या पासुन सात दिवसांचे आत खाली पत्यावर लेखी कागदपत्रे घेऊन समक्ष भेटून आपल्या हक्काबाबत खात्री करून द्यावी. सदर मुदतीत कोणाचीही तक्रार व हरकत न आल्यास ज्यांचा जो हक्क आहे त्यांनी तो स्वखुषीने सोडून दिला आहे असे ग्राह्य धरून आमचे आशिल सदर मिळकतीचा व्यवहार रजि. खरेदीखताने करून घेतील. त्यानंतर कोणाचीही हरकत आल्यास ती आमचे आशिलावर व आशिलांनी घेतलेली मिळकतीवर बंधनकारक असणार नाही याची नोंद घ्यावी. यात कोणाचीही फसगत होऊ नये म्हणुन ही नोटीस दिली कळावे.

ही जाहीर नोटीस दिली दि. २१/०९/२०२४.

सही
अशिल

सही
अशिलातर्फे ॲडव्होकेटस
श्री. दिनेश शिवाजीराव भोपळे
सौ. प्राजक्ता दिनेश भोपळे
रा. १४३, भोपळे नगर, होटगी रोड, मजरेवाडी, सोलापुर. ४१३२२४.
मो. नं. ९४२३९६६६०६.

# आर. अश्विनचे शतक व ६ बळी

● दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेत १-० आघाडी ● भारताचा बांगलादेशवर २३४ धावांनी विजय



◆ **चेन्नई, २२ सप्टेंबर**

फिरकीपटू रविचंद्रन अश्विनने भारतासाठी ऐतिहासिक कामगिरी केली. अश्विनने पहिल्या डावात शतक झळकावले व दुसऱ्या डावात ८८ धावांत ६ बळी टिपल्या. अश्विनच्या या दुहेरी भूमिकेमुळे भारताने पहिल्या कसोटी क्रिकेट सामन्यात चौथ्याच दिवशी बांगलादेशवर २८० धावांनी विजय मिळविला. या विजयाबरोबरच भारताने बांगलादेशविरुद्ध दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेत १-० अशी आघाडी मिळविली. या कामगिरीबद्दल अश्विनला सामनावीर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

भारताने बांगलादेशसमोर विजयासाठी ५१५ धावांचे लक्ष्य ठेवले होते. विजयासाठी धावांचा पाठलाग करताना बांगलादेशने तिसऱ्या दिवस अखेर दुसऱ्या डावात ४ बाद १५८ धावांपर्यंत मजल मारली होती. बांगलादेशला विजयासाठी आणखी ३५७ धावा काढण्याची गरज होती, तर भारताला बांगलादेशचे उर्वरित सहा फलंदाज झटपट बाद करण्याची आवश्यकता होती. रविवारी अर्थात चौथ्या दिवशी याच धावसंख्येवरून पुढे खेळण्यास सुरुवात केली. कालचे नाबादवीर कर्णधार नजमूल हुसेन शांतो व शाकिब अल हसनने सकाळी तास भराच्या खेळात चिवट झुंज दिली व संघाला विजय मिळवून देण्याचा कसोशीने प्रयत्न केला, मात्र अश्विन व रवींद्र जडेजाने त्यांचा हा प्रतिकार मोडून काढला. अश्विनने शाकिब अल हसनला यशस्वी जयस्वालकडे झेल सोपविण्यास भाग पाडले. शाकिबने ५६ चेंडूंत ३ चौकारांसह २५ धावांची भर घातली. या दोघांनी ४८ धावांची भागीदारी करत बांगलादेशला ५१.४ षटकांत ५ बाद १९४ धावांपर्यंत पोहोचवले. पुढे नजमूल हुसेन शांतोने लिटन दासच्या (१) साथीने संघाला दोनशे धावांचा टप्पा गाठून दिला. दरम्यान शांतोही वैयक्तिक शतकाच्या जवळपास पोहोचला होता. शांतोला सहकार्य करण्यासाठी आलेला मेहदी हसन मिराझही अश्विनच्या गोलंदाजीला बळी पडला. त्यावेळी बांगलादेशच्या ७ बाद २२२ धावा झाल्या होत्या, मात्र याच धावसंख्येवर नजमूल हुसेन शांतो रवींद्र जडेजाच्या चेंडूवर बुमराहकडून झेलबाद झाला. नजमूल हुसेन शांतोने १२७ चेंडूंत ८ चौकार व ३ षट्कारांसह ८२ धावांची खेळी केली. पुढे तस्किन अहमदच्या रुपाने आर. अश्विनने आपला सामन्यातील सहावा बळी मिळविला. मोहम्मद सिराजने नाहिद राणाच्या रुपाने सामन्यातील दहावा गडी बाद करून बांगलादेशचा दुसरा डाव ४७.१ षटकांत १४९ धावांत गुंडाळला.

भारताकडून आर. अश्विनने ८८ धावांत ६ बळी टिपण्याची किमया केली. रवींद्र जडेजाने ३ बळी, तर जसप्रीत बुमराहने एक बळी टिपला. ◀(वृत्तसंस्था)

### पहिल्या डावात फलंदाजी उद्ध्वस्त झाली : शांतो

पहिल्या डावातील फलंदाजी उद्ध्वस्त झाली तसेच आघाडीच्या फळीतील भागीदारीच्या अभावामुळे बांगलादेश संघाला भारताकडून पहिल्या कसोटी सामन्यात पराभव पत्करावा लागला, असे बांगलादेशचा कर्णधार नजमुल हुसेन शांतो याने कबूल केले. रविवारी येथील एम. ए. चिदम्बरम् स्टेडियमवर पहिल्या कसोटी सामन्यात भारताने बांगलादेशवर २८० धावांनी विजय नोंदवून दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेत १-० अशी आघाडी घेतली. पहिल्या डावात आम्ही चांगली फलंदाजी केली नाही. आमच्याकडे पहिल्या फळीतील किमान एक मोठी भागीदारी असती तर आम्ही अधिक चांगल्या स्थितीत असू शकलो असतो.

# डॉ.वाघचवरे यांनी इटलीमध्ये रोवला भारताचा झेंडा

### फुल आयर्न मॅन होणारे सोलापूरचे पहिलेच सुपुत्र

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ सप्टेंबर-**

इटली देशातील सर्विया प्रांतात ''फुल डिस्टन्स आयर्न मॅन'' स्पर्धेत येथील डॉ. अभिजित वाघचवरे यांनी ही अवघड स्पर्धा यशस्वीपणे पूर्ण केली. संपूर्ण जगात अंत्यत अवघड स्पर्धेत जगभरातून तीन हजार तर भारतातून २० स्पर्धकांनी भाग घेतला होता. डॉ. वाघचवरे यांनी ''फुल आयर्न मॅन'' हा किताब मिळवला. हा किताब मिळवणारे सोलापूरचे पहिलेच सुपुत्र बनले आहेत. भारतीय वेळेनुसार शनिवारी सकाळी साडेआठला




सुरू झालेली स्पर्धा रविवारी पहाटे साडेतीन वाजता त्यांनी पूर्ण केली. डॉ वाघचवरे यांनी ही स्पर्धा १५ तास ३६ मिनिटात पूर्ण केली.

या स्पर्धेमध्ये समुद्रामध्ये चार किलोमीटर जलतरण, १८० किलोमीटर सायकलिंग तर ४२ किलोमीटर रनिंग असे तिन्ही क्रीडा प्रकार एकापाठोपाठ त्यांनी पूर्ण केले. इटलीच्या या स्पर्धेमध्ये ''भूमध्य समुद्राच्या'' उसळत्या थंड पाण्याच्या लाटांचा सामना करीत त्यांनी त्यांचे चार किलोमीटरचे जलतरण दोन तास चार मिनिटात पूर्ण केले. तर १८० किलोमीटरचे सायकलिंग सात तास ४० मिनिटात त्यांनी पूर्ण केले. सायकलिंग मात्र ''सर्वीया प्रांताच्या '' चढ-उतार असलेल्या रस्त्यावर होते जेथे उलट्या दिशेने येणाऱ्या वाऱ्यांमुळे सायकलिंग करणे खूप जड जात होते. शेवटी ४२ किलोमीटरची फुल मॅरेथॉन त्यांनी पाच तास ४४ मिनिटात पूर्ण केली. त्यावेळी त्यांना त्यांच्या पत्नी डॉ राजश्री या सायकलिंग व रनिंग रूटवर साडे पंधरा तास त्यांचे मनोबल वाढवण्याकरता उपस्थित होत्या. टीम पॉवर पीक्स्चे कोच चैतन्य वेल्हाळ यांचे त्यांना कोचींग लाभले व डॉ.अभिजीत यांच्या भगिनी आयर्न मॅन असलेल्या डॉ. स्मिता झांजुर्णे यांचे मार्गदर्शन त्यांना सरावासाठी लाभत गेले. सोलापूरच्या टीम डब्ल्यू प्लसचे त्यांना सहकार्य मिळाले.

# रोप सांस्कृतिक महोत्सवाच्या स्केटिंग स्पर्धेस उत्सफूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ सप्टेंबर-**

महाराष्ट्र राज्याचे युवा नेते आमदार रोहित दादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त जुळे सोलापूर येथे रोप फाँऊडेशन सोलापूर, आयोजित ''रोप सांस्कृतिक महोत्सव २०२४'' या महोत्सव अंतर्गत गोविंदश्री मंगल कार्यालय येथे आज स्केटिंग स्पर्धेत उत्फूर्त प्रतिसाद मिळाला.

स्पर्धा सकाळी सात वाजता सुरू करण्यात आली परंतु या स्पर्धेला पहाटे सहा वाजल्यापासूनच बालगोपालांचा प्रतिसाद मोठ्या प्रमाणात मिळत होता. या स्पर्धेचे उद्घाटन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे प्रदेश उपाध्यक्ष भारत जाधव यांच्या हस्ते झाले. आयोजक प्रशांत बाबर यांनी प्रास्ताविक केले. यावेळी मुसा अत्तार, ऋषीकेश शिंदे,रियाज निगेहबान, सचिन चलवदे, युनूस अत्तार, झीशान शेख, क्रीडा शिक्षक युसूफ पिरझादे, प्रताप यादव, रवी ओहोळ (पंढरपुर), सागर राठोड, संतोष धुत (बार्शी), वासुदेव कैरम कोंडा यांची प्रमुख उपस्थिती होती.

**स्पर्धेचे अंतिम निकाल (प्रथम तीन):**

**६ वर्षांखालील बिगीनर : मुले :** कृष्णा पवार, इझाहन लंगोटे, भाविक पिटील, विराज लामकाने. मुली : संयुक्ता पोतदार, ऋषिता माळवदकर, मैथली जगताप. स्कॉड मुले : विराज अरकाल,सर्वेश जिने, सक्षम हुच्चे. मुली : अनघा हत्ते.



**६ ते ८ वर्षे बिगीनर-** मुले : श्लोक रंगदळ, जोहेब मुलाणी, अन्वित शंकर. मुली : मुग्धा सावंत, सारीया पठाण, मेहवेश मुलाणी. इनलाईन : शर्विल माळवदकर. स्कॉड मुले : असिफ शेख, देवांश सरवदे, साकिब शेख. मुली : गंगा नारंगी, मिष्टी कोठारी, निशा सरवदे. इनलाईन : शिवन्या हत्ते, सान्वी भातलवंडे.

**८ ते १० वर्षे बिगीनर मुले :** अभिराम म्याकल, कृष्णा मोरे, मुली : लुबना मुलाणी, विद्या मंचीकटला. स्कॉड मुले : वसुधा सब्बन, हर्षा सब्बन, शौर्य गुगळे, आदित्य तेल्लुर. इनलाईन : उत्तरा पोतदार. इनलाईन : अर्पित पावरा, अभिराज देवसानी

**१० ते १२ वर्षे स्कॉड :** श्रवण पेरला, सोहम वाघमोडे, हर्षराज भोसले. बिगीनर : श्रेयश जावळे. मुलीः जीया मुतवल्ली. स्कॉड : स्नेहा बोकडे, अक्षता बिरोली, समृध्दी चव्हाण. इनलाईन : पाही कोडलकर, अवनी गायकवाड. मुले : प्रज्ञेश अदवाड.

**१२ ते १४ वर्षे स्कॉड :** प्रतिक शिंदे, शिवम वाघमोडे, विनायक हुच्च. मुली बिगिनर : दिव्या मर्दा, जान्हवी जगन्नाथ परहार. स्कॉड : मधूपुर्णा दराडे, श्रेया काळे, संध्या डमरे. इनलाईन : समरथ औरंगे, कौस्तुभ मर्दा. मुली : श्रध्दा फलमारी. १४ ते १६ मुली (स्कॉड)- राजनंदिनी सदरखेड.

### इंडोनेशिया पॅरा-बॅडमिंटन सुकांत कदमला रौप्यपदक

**सुरकर्ता :** भारताचा पॅरा-बॅडमिंटन स्टार सुकांत कदम याने इंडोनेशिया पॅरा-बॅडमिंटन आंतरराष्ट्रीय २०२४ स्पर्धेत उल्लेखनीय कौशल्य व दृढनिश्चय दाखवत रौप्यपदक जिंकले. अत्यंत चुरशीच्या झालेल्या पुरुष एकेरी एसएल४ च्या अंतिम फेरीत कदमने इंडोनेशियाच्या फ्रेडी सेटियावानवर २१-१४, २१-१४ असा विजय नोंदवला. भारतीय संघाने चमकदार कामगिरी करत विविध श्रेणींमध्ये अनेक पदके जिंकली. पुरुष एकेरी एसएल३ मध्ये विक्रमने सुवर्ण, नेहल गुप्ताने रौप्य व जगदेशने कांस्यपदक जिंकले. मनदीप कौरने महिला एकेरी एसएल३ मध्ये रौप्य, तर नीरजने कांस्यपदक मिळवले. पुरुष एकेरी एसएच६ मध्ये शिवराजन आणि सुदर्शन सरवणकुमार मुथुसामीनेअनुक्रमे रौप्य आणि कांस्यपदक मिळवले. याशिवाय अन्य प्रकारात रुथिक रघुपतीने पुरुष एकेरी एसयू५ मध्ये रौप्यपदक जिंकले आणि पुरुष दुहेरी एसयू५ मध्ये हार्दिक मक्कर व रघुपतीने सुवर्णपदक जिंकले. तसेच पल्लवीने महिला व्हीलचेअर डब्ल्यूएच१ मध्ये सुवर्ण, तर प्रेमा विश्वास आणि अनुषा चिदानंद यांनी कांस्यपदक मिळवले.

# राज्य जलतरण स्पर्धेत सोलापूरच्या जलतरणपटूंचे यश

### सुरेश मिठ्ठाकोल, शंकर करजगी यांची ३ रौप्य व ३ कांस्य पदकांची कमाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ सप्टेंबर-**

प्रौढ गटाच्या राज्य जलतरण स्पर्धेत येथील जलतरणपटूंनी ३ रौप्य व ३ कांस्य अशी ६ पदकांची कमाई केली.

नागपूर येथे झालेल्या स्विमिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र आयोजित राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेमध्ये सोलापूर जिल्हा हौशी जलतरण संघटनेच्या वतीने सुरेश मिठ्ठाकोल, शंकर करजगी व मोहन श्रीगांधी यांनी सहभाग नोंदविला होता.





एन.आय.टी. स्विमिंग पुल, उत्तर अंबाजरी रोड, नागपूर येथे २१ आणि २२ सप्टेंबर रोजी ही जलतरण स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यातून जलतरणपटू सहभागी झाले होते.

या स्पर्धेत सुरेश मिठ्ठाकोल यांनी २ रौप्य आणि २ कांस्य अशी ४ पदकांची कमाई केली. शंकर करजगी यांनी १ रौप्य, १ कांस्य अशी २ पदके पटकाविली.

सुरेश मिठ्ठाकोल यांना १०० बॅकस्ट्रोकमध्ये १ रौप्य पदक, २०० मीटर वैयक्तिक मिडलेमध्ये १ रौप्य पदक मिळाले. १०० मीटर फ्री स्टाईलमध्ये १ कांस्य आणि १०० मीटर बॅकस्ट्रोकमध्येही १ कांस्य पदक मिळविण्यात यश मिळाले. शंकर करजगी यांनी १०० मीटर ब्रेस्ट स्ट्रोकमध्ये १ रौप्य पदक आणि १०० मीटर फ्री स्टाईलमध्ये १ कांस्य पदक पटकाविले.

मिठ्ठाकोल व करजगी यांनी मिळविलेल्या यशाबद्दल सोलापूर जिल्हा हौशी जलतरण संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन करण्यात आले.



# सांगोला विद्यामंदिरचे शालेय जिल्हा बॉक्सिंग स्पर्धेत यश

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२२ सप्टेंबर-**

सांगोला विद्यामंदिर प्रशाला व ज्यु.कॉलेज मधील खेळाडूंनी मोडनिंब (ता. माढा) येथे झालेल्या शालेय जिल्हा बॉक्सिंग स्पर्धेत यश संपादन करत दबदबा निर्माण केला. यामध्ये १७ वर्ष मुले गटामध्ये बरकतअली मुलाणी, सोहम चव्हाण, १९ वर्षे मुली गटामध्ये अनुष्का गायकवाड, श्रेया बामणे,भारती गायकवाड, महेक मुलाणी यांनी प्रथम क्रमांक मिळविला. या सर्व विद्यार्थ्यांची पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. त्यांना क्रीडा शिक्षक प्रा.सचिन चव्हाण, सुनील भोरे, प्रा.डी. के. पाटील, नरेंद्र होनराव, सुभाष निंबाळकर, अजित मोरे, प्रा.संतोष लवटे यांचे मार्गदर्शन मिळाले. त्यांचे संस्थाध्यक्ष प्रा. प्रबुद्धचंद्र झपके यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी प्राचार्य अमोल गायकवाड, उपमुख्याध्यापिका शहिदा सय्यद, उपप्राचार्य प्रकाश म्हमाणे, पर्यवेक्षक प्रदिप धुकटे, मच्छिंद्र इंगोले उपस्थित होते. त्यांचे संस्था सचिव मल्लिकार्जुन घोंगडे, सहसचिव प्रशुद्धचंद्र झपके, सदस्य विश्वेश झपके,पर्यवेक्षक सुरेश मस्तुद आदींनी अभिनंदन केले.

# दमाणी प्रशालेच्या २६ खेळाडूंची विभागीय तलवारबाजी स्पर्धेसाठी निवड



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ सप्टेंबर-**

शालेय शहर तलवारबाजी स्पर्धेतून बी.एफ. दमाणी प्रशालेच्या २६ खेळाडूंची विभागीय तलवारबाजी स्पर्धेसाठी निवड झाली आहे

शालेय शहर स्पर्धेत ५ खेळाडूंनी प्रथम, ५ खेळाडूंनी द्वितीय तर १६ खेळाडूंनी तृतीय अश्या २६ खेळाडूंनी कामगिरी केली आहे. या सर्व खेळाडूंची पुणे विभागीय विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या खेळाडूंना पवन भोसले, गणेश म्हमाणे व सोनाली थोबडे यांचे मार्गदर्शन लाभले. सर्व यशस्वी खेळाडूंचे संस्थेचे स्थानिय अध्यक्ष कालिदासजी जाजू, सचिव मंगलजी काबरा, सहसचिव उज्वलजी तापडिया, मुख्याध्यापिका रेखा पेंबर्ती व पर्यवेक्षक राहुल इंगळे यांनी अभिनंदन केले व पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

### खेळाडूंची कामगिरी

**प्रथम :** आर्या लंबाटे, मयूर भोसले, ज्ञानदा शिरवाळ, ईश्वरी हेंद्रे, आदित्य निकते.

**द्वितीय :** बसवराज धनश्री, अथर्व बारसे, प्रांजली कोरे, प्रथमेश कस्तुरे, सूर्या सावंत.

**तृतीय :** तनिष्का पोतदार, चैतन्य महाजन, स्वानंदी ताटे, राजमंजुश्री शिंदे, रणवीर कबाडे, अर्णव सुपाते, मुजीब शेख, रितेश काशीद, समर्थ गणेशकर, आदित्य सारवाड, आर्या सूर्यवंशी, आदिती क्षीरसागर, सई पाटील, अर्णव राऊत, ईशांत राजमाने, आर्यन रोहिटे.



# सेवासदन कनिष्ठ महाविद्यालयास सेपक टकरा स्पर्धेत विजेतेपद

**सोलापूर, दि. २२ सप्टेंबर -**

शालेय शहर सेपक टकरा स्पर्धेत सेवासदन कनिष्ठ महाविद्यालयाने १९ वर्षाखालील मुलींच्या गटात विजेतेपद पटकावले. प्रगती गायकवाड, स्नेहा धंगेकर, धनश्री भालेराव, वैष्णवी भुसे, ज्ञानेश्वरी घोडके यांनी ही कामगिरी केली. त्यांना क्रीडा शिक्षिका प्रा . आरती मलजी यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे पुणे सेवासदन संस्था, सोलापूर शाखा अध्यक्षा शीला मिस्त्री, सचिव वीणा पतकी, प्राचार्य डॉ. सतीश कुलकर्णी आदींनी अभिनंदन केले.

### नॉर्थईस्ट युनायटेडवर विजय नोंदविण्यास मोहन बागान उत्सुक

**कोलकाता :** इंडियन सुपर लीग (आयएसएल) २०२४-२५ हंगामात सोमवारी येथील विवेकानंद युवा भारती क्रीडांगणावर मोहन बागान सुपर जायण्ट आणि नॉर्थईस्ट युनायटेड यांच्यादरम्यान सामना होणार आहे. मोहन बागानचा हा हंगामातील दुसरा सामना असून मुंबी सिटी एफसीविरद्धचा सलामी बरोबरीत राहिला होता. त्यामुळे मोहन बागानचे पहिला विजय मिळवण्याचे लक्ष्य असेल. नॉर्थईस्ट युनायटेडने मोहम्मेडन एससी विरुद्धच्या पहिल्या सामन्यात विजय मिळवला. सामन्याच्या अखेरच्या क्षणी अलादीन अजराईने गोल करून नॉर्थईस्टला विजय मिळवून दिला होता.

### फुटबॉल संघ सर्वोत्तम कामगिरी करणार : शर्मा

**थिम्पू :** दक्षिण आशियाई १७ वर्षांखालील फुटबॉल स्पर्धेत भारतीय संघ सर्वोत्तम कामगिरी बजावेल, असा विश्वास सुमित शर्माने व्यक्त केला आहे. या स्पर्धेत १७ वर्षांखालील गटाच्या आमच्या संघाची कामगिरी होणे शिल्लक आहे. आम्ही एक संघ म्हणून अधिक चांगले होऊ शकतो. आम्ही पहिल्या सामन्यात आमच्या क्षमतेनुसार खेळू., असे ते म्हणाले. २४ सप्टेंबर रोजी भारताचा दुसरा आणि अ गटातील अंतिम सामना मालदीवशी होणार आहे. उपांत्य फेरी २८ सप्टेंबरला होणार आहे, त्यानंतर ३० सप्टेंबरला अंतिम फेरी होणार आहे.

# 'वसंतराव काळे' वाडीकुरोली, इंग्लिश स्कूल वेळापूर विजेते



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ सप्टेंबर-**

### शालेय जिल्हा खो-खो १९ वर्षाखालील गट

जिल्हास्तरीय शालेय खोखो स्पर्धेमध्ये १९ वर्षाखालील मुलांच्या गटात इंग्लिश स्कूल वेळापूर (ता. माळशिरस) व मुलींच्या गटात वाडीकुरोली ( ता. पंढरपूर) वसंतराव काळे प्रशालेने विजेतेपद पटकाविले.

नेहरूनगर येथील शासकीय मैदानावर झालेल्या मुलांच्या अंतिम सामन्यात वेळापूरने मंद्रूपच्या ( ता. दक्षिण सोलापूर) लोकसेवा विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाचा एक डाव नऊ गुणांनी पराभव केला. मुलींच्या गटात वाडीकुरोली संघाने अनगर ( ता. मोहोळ) येथील बाजीराव पाटील विद्यालयाचा पराभव केला. दोन्ही विजयी संघ पुणे विभागीय स्पर्धेसाठी पात्र ठरले. त्यांना जिल्हा क्रीडाधिकारी नरेंद्र पवार, तालुका क्रीडा अधिकारी सत्येन जाधव यांनी शुभेच्छा दिल्या.

तृतीय स्थान मुलांच्या गटात न्यू हायस्कूल वडाळाने (ता. उत्तर सोलापूर) तर मुलींच्या गटात शिवणे ( ता. सांगोला) माध्यमिक विद्यालयाने मिळविले. जिल्हा क्रीडा कार्यालयाने ही स्पर्धा सोलापूर सोलापूर ॲम्युचर खो-खो असोसिएशनच्या सहकार्याने आयोजित केली होती. या स्पर्धेसाठी असोसिएशनचे सचिव ए. बी. संगवे, पंचप्रमुख शरद व्हनकडे, सहाय्यक पंचप्रमुख पुंडलिक कलखांबकर, पंचमंडळ सचिव गोकुळ कांबळे, तांत्रिक समिती सचिव उमाकांत गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली असोसिएशनच्या पंचांनी सहकार्य केले.



# करकंबमधील क्रिकेट स्पर्धेत कासेगावला विजेतेपद

**करकंब दि.२२ सप्टेंबर.**

माढा मतदार संघाचे आमदार बबनदादा शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त झालेल्या क्रिकेटस्पर्धेत करकंबने विजेतेपद पटकाविले. अरण रोड, करकंब येथे राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस जिल्हा सरचिटणीस वंशभूषण शिंदे यांच्या नेतृत्वाखाली या स्पर्धांचे आयोजन केले होते. यात १६ क्रिकेट संघानी भाग घेतला. यामध्ये द्वितीय क्रमांक उपळाई, तृतीय क्रमांक फ्रेंड्स करकंब तर चतुर्थ क्रमांक तांबवे या संघाने मिळवला. आयोजक रणजीत शिंदे यांचे सर्व खेळाडू व संघांनी आभार मानले. यावेळी पं.स.सदस्य राहुल पुरवत, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस जिल्हा उपाध्यक्ष सौरभ पाटील, तालुका उपाध्यक्ष समर्थ साळुंखे, विकी पुरवत, दत्ता शिंदे उपस्थित होते. या स्पर्धा यशस्वी होण्यासाठी दीपक शिंदे, बंटी शिंदे, आदित्य कांबळे, ऋषिकेश लोंढे, प्रसाद शिंदे, भिमरत्न शिंदे, रणवीर शिंदे यांनी उत्कृष्ट नियोजन करून स्पर्धा पार पाडण्यासाठी परिश्रम घेतले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त




### राज्यस्तरीय आदर्श शिक्षक गौरव पुरस्काराने दशरथ घाळे सन्मानित

**सोलापूर दि. २२ सप्टेंबर-**

शिक्षक दिनाचे औचित्य साधून निर्भय प्रतिष्ठान ट्रस्ट मुंबई सोलापूर विभाग आयोजित या ट्रस्टतर्फे शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्याबद्दल आमच्या शरणाई बहुउद्देशीय सामाजिक संस्थेचे अध्यक्ष दशरथ घाळे यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक गौरव पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले. यावेळी अडार शेख, नितिन घाळे, बसवराज गुंजले, नागेश कोरे, महादेव कांबळे व योगेश हिरेमठ आदींनी पुरस्कार मिळाल्याबद्दल अभिनंदन केले. कार्यक्रमाचे आयोजन हाजी इक्बाल बागमारू, वसिष्ठ सोनकांबळे, जब्बार शिकलगार, अशोक हत्ते कोषाध्यक्ष व फारूक शेख आदींनी केले.




### अमोल कुलकर्णी यांना रोटरी क्लबचा आदर्श शिक्षक पुरस्कार

**सोलापूर दि. २२ सप्टेंबर-**

येथील दलितमित्र भीमराव जाधव प्रशालेतील सहशिक्षक अमोल कुलकर्णी यांना सोलापूर येथील रोटरी क्लबच्यावतीने आदर्श शिक्षक म्हणून पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले आहे. सहशिक्षक कुलकर्णींना यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल प्रशालेच्या वतीने संस्थेचे अध्यक्ष अ‍ॅड. अमोल गायकवाड, उपाध्यक्षा श्रीमती शारदा गायकवाड यांनी अमोल कुलकर्णी याचा सत्कार केला व शुभेच्या दिल्या. याप्रसंगी मुख्याध्यापक मंगेश पाटील प्रशालेतील सर्व सहशिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# पावनखिंड हे राष्ट्रीय स्वातंत्र्याचे तीर्थक्षेत्र : प. पू. स्वामी गोविंद देव गिरिजी

## छत्रपती श्री शिवाजी महाराज कथेस सोलापूरकरांची उसळली गर्दी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, २२ सप्टेंबर -**

छत्रपती श्री शिवरायांसाठी आपल्या प्राणांचे बलिदान देणाऱ्या बाजीप्रभू देशपांडे आणि शिवा काशीद यांच्यासारख्या वीरांमुळे पावनखिंड हे भारतीय राष्ट्रीय स्वातंत्र्याचे तीर्थक्षेत्र बनले, असे प्रतिपादन छत्रपती श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र अयोध्याचे कोषाध्यक्ष प. पू. स्वामी गोविंद देव गिरिजी यांनी केले.

३५०व्या श्री शिवराज्याभिषेक वर्षानिमित्त समस्त हिंदू समाजातर्फे जुनी मिल कंपाउंड येथील नागेश करजगी ऑर्किड स्कूलमध्ये २५ सप्टेंबरपर्यंत आयोजित छत्रपती श्री शिवाजी महाराज कथेच्या चौथ्या दिवशी रविवारी प. पू. स्वामी गोविंद देव गिरिजी यांनी मार्गदर्शन केले. शिवधैर्य या विषयावर बोलताना त्यांनी पन्हाळगडाचा वेढा, पावनखिंडीतील शौर्य, चाकणचा रणसंग्राम, लाल महालावर छापा आणि शाहिस्तेखानावर मात आदींवर विवेचन



केले. प. पू. स्वामी गोविंद देव गिरिजी म्हणाले, निस्वार्थ भूमिकेतून जिथे धर्मयोद्धे आपले प्राण देव, देश, धर्मासाठी अर्पण करतात तिथे राष्ट्रीय तीर्थ निर्माण होते. प्रत्येकाने ऊर्जा घेण्यासाठी अशा ठिकाणी जावे. संभाव्य संकटांचा अंदाज घेऊन त्यावर मात करण्यासाठी अचूक योजना आखण्याची विलक्षण क्षमता श्री शिवछत्रपतींमध्ये होती. त्यांचाच आदर्श घेऊन प्रत्येक हिंदूने जात, भाषा, संप्रदाय विसरून हिंदू सारा एक हा मंत्र अंगी भिनवला पाहिजे.

यावेळी श्रीलंका ते भारत सलग १० तास २५ मिनिटे पोहून सोलापूरच्या कीर्ती भराडिया यांनी केलेल्या विश्वविक्रमाबद्दल त्यांचा प. पू. स्वामी गोविंद देव गिरिजी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सीए राजगोपाल मिणीयार यांनी प्रास्ताविक केले. गुरुशांत धुत्तरगावकर यांनी सूत्रसंचालन केले.

### आज शिवशौर्य या विषयावर मार्गदर्शन

छत्रपती श्री शिवाजी महाराज कथेमध्ये सोमवारी दुपारी ४ ते ७.३० दरम्यान प. पू. स्वामी गोविंद देव गिरिजी शिवशौर्य या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. यावेळी सोलापूरकरांनी या कथेस उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन समस्त हिंदू समाजातर्फे करण्यात आले आहे.

## ठिबिक लघुपटाला २० पुरस्कार; दिग्दर्शक प्रशांत निकंबे यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ सप्टेंबर-**

सूरछाया फिल्म सेंटर प्रस्तुत पाणी बचतीचा संदेश देणाऱ्या ठिबिक या पाणी बचतीचा संदेश देणाऱ्या लघुपटाला राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय दर्जाचे आतापर्यंत २० पुरस्कार मिळाले असल्याची माहिती लेखक दिग्दर्शक प्रशांत निकंबे यांनी दिली.

या लघुपटामध्ये आपल्याकडून चुकून आणि जाणून बुजून पाण्याचे किती नुकसान होते आणि ज्यावेळेस खरंच आपल्याला पाण्याची गरज असते त्यावेळेस पाण्याचे आपल्याला महत्व कळते हे या लघुपटातून दाखवण्याचा प्रयत्न केला गेला आहे. पाणी बचतीचा संदेश देण्यात आला आहे. या लघु चित्रपटाला सेंटएँगो साऊथ अमेरिका, श्रीलंका, बांगलादेश, म्यानमार या देशांमध्ये बेस्ट शॉर्ट फिल्म, बेस्ट ॲक्टर, बेस्ट सपोर्टिंग ॲक्टर आणि बेस्ट सिनेमोटोग्राफर असे आंतरराष्ट्रीय दर्जाचे ९ पुरस्कार मिळाले असून




पश्चिम बंगाल, राजस्थान या राज्यातील वेगवेगळ्या शॉर्ट फिल्म फेस्टिवलमध्ये बेस्ट मेकअप आर्टिस्ट, बेस्ट शॉर्ट फिल्म असे राष्ट्रीय दर्जाचे ३ पुरस्कार मिळालेले आहेत तसेच मुंबई, छत्रपती संभाजी नगर, बुलढाणा, उदगीर या ठिकाणी झालेल्या वेगवेगळ्या शॉर्ट फिल्म फेस्टिवलमध्ये ८ राष्ट्रीय पुरस्कार मिळालेले आहेत. या लघुपटाचे छायांकन विनोद बोडके, संकलन परवेज इनामदार, रंगभूषा वनिता मुंडे यांनी केले आहे. प्रमुख भूमिकेत प्रशांत निकंबे आणि सहाय्यक भूमिकेत सागर गायकवाड व गणेश शिवपुजे हे कलाकार आहेत.



## महिलांनी उच्च शिक्षणाला प्राधान्य द्यावे : धनशेट्टी

**सोलापूर दि. २२ सप्टेंबर-**

महिलांनी उच्च शिक्षणाला प्राधान्य द्यावे. उच्चपदी कार्यरत राहावे, असे प्रतिपादन जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा विभाग सोलापूरचे कार्यकारी अभियंता संजय धनशेट्टी याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणाले की, पारंपरिक शिक्षणाऐवजी व्यावसायिक शिक्षण घेणे ही काळाची गरज आहे.

भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या जयंतीनिमित्त सर विश्वेश्वरय्या को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी जुळे सोलापूर येथे अभियंता दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा विभाग सोलापूरचे कार्यकारी अभियंता संजय धनशेट्टी हे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अभियंता अजय शिंदे होते. कार्यक्रमाची सुरुवात सर विश्वेश्वरय्या यांच्या प्रतिमा पूजनाने व दीपप्रज्वलनाने झाली. सोसायटीचे नूतन चेअरमन प्राचार्य डॉ. आशा रोकडे , सचिव मोहन कांबळे तर खजिनदार अभिमन्यू कसबे यांचा आणि प्रमुख पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. रमेश खाडे, डॉ. सुहास उघडे यांनी आपली मनोगते व्यक्त केली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अजय शिंदे यांनी केले. सूत्रसंचालन दत्तात्रय डोलारे यांनी केले तर आभार प्रदर्शन जयश्री राजपूत यांनी केले.

## श्रमणाऱ्या हातांना हक्काच्या घरासोबत रोजगार देणार

### आडम मास्तर; हुतात्मा कुर्बान हुसेन अल्पसंख्याक महिला कामगार सहकारी गृहनिर्माण संस्थेची सभा

**सोलापूर, दि. २२ सप्टेंबर-**

सोलापुरातील लढाऊ महिला कामगारांनी आपल्या हक्काचे घर मिळावे म्हणून गेल्या दहा वर्षांपासून अविरत संघर्ष केले. याच श्रमणाऱ्या हातांना महिला सक्षमीकरण आणि सबलीकरण साठी केंद्र सरकारच्या विविध योजनांच्या आणि धोरणांच्या माध्यमातून अल्पसंख्याक महिलांना रोजगार मिळवून देण्याचा निर्धार ज्येष्ठ कमागर नेते माजी आमदार कॉ. नरसय्या आडम मास्तर यांनी केले.

हुतात्मा कुर्बान हुसेन अल्पसंख्याक महिला विडी कामगार सहकारी गृहनिर्माण संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेचे अध्यक्ष माजी नगरसेविका कॉ. नलिनी कलबुर्गी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. कलबुर्गी म्हणाल्या की, आपल्या सर्वांच्या



डोक्यावर सावली आणण्यासाठी आडम मास्तर यांनी ऊन वारा पाऊस याची तमा न बाळगता अहोरात्र आपल्यासाठी लढले, हक्काचे घर मिळवून दिले. श्रमिकाला मालक बनवणाऱ्या आडम मास्तरांना आमदार बनवणे हे आमचे कर्तव्य आहे, असे म्हणत सर्व उपस्थित सभासदांनी उत्स्फूर्तपणे हात उंचावून अब की बार आडम मास्तर आमदार, आडम मास्तर तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है अशा घोषणा दिल्या.

यावेळी कामिनी आडम, संचालक तस्लिम शेख, रुबिना शेख आदींची उपस्थिती होती. संस्थेचे व्यवस्थापक गजेंद्र दंडी यांनी सादर केलेल्या अहवालास सभेने मंजूरी दिली. संस्थेचे सचिव युसुफ शेख मेजर यांनी प्रास्ताविक केले.

# क्रीडा




### बॅडमिंटन स्पर्धेत श्री शिवाजी महाविद्यालय तृतीय

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी दि २२ सप्टेंबर,**

श्री शिवाजी महाविद्यालय बार्शी बॅडमिंटन संघाने १९ वर्षांखालील मुली जिल्हास्तरीय स्पर्धेमध्ये तृतीय क्रमांक मिळवला. तसेच अर्पिता शिंदे ही विभागीय स्पर्धेसाठी पात्र झालेली आहे. जिल्हा क्रीडा संकुल सोलापूर येथे या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धेमध्ये जिल्ह्यामधील एकूण तब्बल नऊ संघांनी सहभाग नोंदवला होता. मार्गदर्शक प्रा. संजय पाटील सर तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले व पुढील स्पर्धेसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

## प्रताप क्रीडा मंडळाच्या बाल क्रीडा स्पर्धा उत्साहात

### २२०० बाल खेळाडूंचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज दि. २२ सप्टेंबर-**

कला, क्रीडा, सांस्कृतिक, सामाजिक क्षेत्रात मोलाचे योगदान देणाऱ्या शंकरनगर-अकलूज येथील प्रताप क्रीडा मंडळाच्या वतीने श्रीमती रत्नप्रभादेवी शंकरराव मोहिते-पाटील यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आणि जयसिंह शंकरराव मोहिते-पाटील व मदनसिंह शंकरराव मोहिते-पाटील यांच्या अमृत महोत्सवी वाटचालीनिमित्त शंकरराव मोहिते महाविद्यालय अकलूज येथे बालक्रीडा स्पर्धा उत्साहात झाल्या.

या स्पर्धेचे उद्घाटन मंडळाच्या अध्यक्षा स्वरूपाराणी जयसिंह मोहिते-पाटील यांचे हस्ते, दिपकराव खराडे-



पाटील, प्रदिपराव खराडे-पाटील, हर्षवर्धन खराडे पाटील, महादेव अंधारे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.

सुरुवातीला उपस्थित मान्यवरांच्या व बाल खेळाडूंच्या शुभहस्ते सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील व श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते-पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यानंतर मैदान पूजनाने व आकाशात कबुतरे सोडून स्पर्धेची सुरुवात करण्यात आली. या स्पर्धेत तालुक्यातील २२ शाळांतून विविध गटातील ११८३ मुले व १०१७ मुली असे एकूण २२०० बाल खेळाडूंनी स्पर्धेत सहभाग घेतला.

प्रथम तीन खेळाडूंना अनुक्रमे सायकल, कॅरम बोर्ड, स्कुल बॅग, टिफिन बॉक्स, प्रमाणपत्र तर चतुर्थ व पंचम क्रमांकास प्रमाणपत्र देण्यात आले. सर्व सहभागी खेळाडूंना खाऊ वाटप करण्यात आले. उपस्थित सर्व मान्यवरांच्या हस्ते बक्षीसांचे वितरण करण्यात आले.

यावेळी मंडळाचे उपाध्यक्ष पोपटराव भोसले-पाटील, सचिव बिभीषण जाधव, स्पर्धाप्रमुख शिवाजी पारसे, भानुदास आसबे, संजय राऊत, अर्जुन बनसोडे, यशवंत माने-देशमुख आदी उपस्थित होते. सूत्रसंचलन किरण सूर्यवंशी, राजकुमार पाटील यांनी केले. आभार भानुदास आसबे यांनी मानले.

विविध गटातील प्रथम तीन विजेते :

**लहानगट -** डोक्यावर चेंडू घेऊन ४० मी. पळणे मुली :शिवश्री माने-देशमुख, काव्या शिंदे, तृतीय - वेदांती चव्हाण, मुले : ध्रुवतेज देशमुख, विनायक इंगळे, अलीमोहम्मद नदाफ .

**मोठा गट -** ६०मी. धावणे मुली : स्वराली पवार, भक्ती लिके,श्रीशा गोडसे. मुलेः धारासिंह लोमटे, शिवांश सावंत, निखिल जाधव.

**इयत्ता १ ली-** कमरेवर हात ठेऊन उड्या मारत जाणे (४० मी. मुली : शौर्या क्षिरसागर, जानवी बनसोडे, अनुश्री एकतपुरे. मुले : विराज लोखंडे, पवन मेढे, स्वराज कुंभार.

**इयत्ता २ री-** लंगडी घालत जाणे (४०मी. मुली : योगी घोडके, दूर्वा केमकर, कृष्णप्रिया मिटकल. मुले : राजवीर यादव, अथर्व खिचडे, राजदीप बुराडे.

**इयत्ता ३ री -** तीन पायाची शर्यत (४० मी. मुले : प्रज्वल दुधाळ व शिवतेज राजेभोसले, अथर्व क्षिरसागर व फैज बागवान, प्रणव कोरे व साईराज साठे. मुली : इंद्रायणी वाघ व स्वरा गुरव, स्वरांजली शिंदे व निकिता वाघमारे, यशोधरा रेडे पाटील व ज्ञानेश्वरी विभुते,

**इयत्ता ४ थी-** पोत्यात पाय घालून उड्या मारत जाणे ५० मी. मुली : अनुष्का थिटे, श्रेया मदने, अनुष्का जाधव. मुले : सत्यजित सूळ, चैतन्य पारसे, प्रताप लोखंडे.



### जिल्हा कबड्डी स्पर्धेत यशवंतराव चव्हाण महाविद्यालयास उपविजेतेपद

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा दि.२२ सप्टेंबर**

करमाळा येथील विद्या विकास मंडळाच्या यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाने १९ वर्षांखालील मुलींच्या गटात उपविजेतेपद संपादिले. सांगोलाबरोबर अंतिम सामन्यात एका गुणाने पराभव झाला. संघास प्रा. दिपक ठोसर, शारीरिक शिक्षक प्रा. राम काळे, प्रा.संध्या बिले, प्रा. सुरेखा जाधव यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे विद्या विकास मंडळाचे सचिव विलासरावजी घुमरे, अध्यक्ष प्राचार्य मिलिंद फंड, सहसचिव विक्रमसिंह सुर्यवंशी, प्राचार्य डॉ. एल.बी.पाटील, उपप्राचार्य संभाजी किर्दक यांनी अभिनंदन केले.

## वळसंगच्या श्री शंकरलिंग प्रशालेची तालुका सांघिक, वैयक्तिक मैदानी स्पर्धेत कामगिरी

**तभा वृत्तसेवा**
**वळसंग, दि. २२ सप्टेंबर-**

जिल्हा क्रीडा परिषद व पंचायत समिती दक्षिण सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने वसुंधरा महाविद्यालय येथे संपन्न झालेल्या दक्षिण सोलापूर तालुका खो-खो स्पर्धेत श्री शंकरलिंग प्रशालेतील १४ वर्षे वयोगटातील मुलांनी अंतिम सामन्यात श्री पंचाक्षरी विद्यामंदिर माळकवठे संघाचा तीन मिनिटे राखून पराभव करत सलग दुसऱ्या वर्षी विजय संपादन केले. विजयी संघाची जिल्हा स्पर्धेसाठी निवड झाली.

१९ वर्षे गटात मुली कबड्डी व क्रिकेट स्पर्धेत उपविजेते ठरले. तालुका मैदानी स्पर्धेत प्रशालेने यश संपादन केले. खेळाडूंना क्रीडा शिक्षक संतोष कस्तुरे, बाळकृष्ण गुंड, गंगाधर बिराजदार, बसवराज दुधगी, विरेश थळंगे, सिध्दारूढ हिरेमठ, अजय माणकोजी, सेवक कट्टेप्पा कोळी यांचे मार्गदर्शन लाभले. खेळाडू व मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेचे अध्यक्ष श्रीशैल दुधगी, स्कूल कमिटी चेअरमन शिवशरण थळंगे, संस्था सदस्य विश्वनाथ थळंगे, प्रकाश दुधगी, शिवशरण प्याटी, प्राचार्य वीरेश थळंगे,



पर्यवेक्षक शिवानंद घोडके यांनी अभिनंदन केले.

**कामगिरी अशी : १७ वर्षे :** ४ बाय १०० मीटर रिले मुले प्रथम (सुरेश चौगुले, अरखान कुरेशी, अभिषेक माणकोजी, पृथ्वीराज चव्हाण, समीर अमलीचुंगे). ३००० मीटर धावणे : रोहित गायकवाड (प्रथम). ८०० मीटर धावणे : दिनेश गायकवाड (द्वितीय). तिहेरी उडी : सुरेश चौगुले (प्रथम), संदेश संतोष घोडके (द्वितीय). भाला फेक : अभिषेक माणकोजी (प्रथम), हातोडा फेक : विश्वा कोडले (तृतीय). गोळा फेक :अभिषेक माणकोजी (द्वितीय), सानिका सलगरे (तृतीय). लांब उडी व थाळी फेक (द्वितीय). भालाफेक : अक्षता माणकोजी (प्रथम) हातोडाफेकमध्ये (तृतीय). तिहेरी उडी : सृष्टी ढब्बे (द्वितीय), प्रिती मल्लिनाथ ताराके (तृतीय), १०० मी. हर्डल्स उषा हिरेमठ (द्वितीय).

**१४ वर्षे :** ६०० मीटर धावणे आदर्श गायकवाड (चतुर्थ). १००मी.धावणे : सृष्टी ढब्बे (प्रथम), थाळी फेक : ज्योती घोडके (प्रथम). **१९ वर्षे** : तिहेरी उडी : इरेश बिराजदार (प्रथम), भाला फेक विश्वा कोडले (प्रथम), ११० हर्डल्स, १०० मी.धावणे व ८० मी.हर्डल्स : समीर अमलीचुंगे (द्वितीय). तिहेरी उडी : वैष्णवी कोळी (तृतीय), हातोडा फेक : तमन्ना अमलीचुंगे (द्वितीय) थाळी फेक : सुप्रिया बिराजदार (द्वितीय).



### जिल्हा कबड्डी स्पर्धेत परमशेट्टी प्रशालेस उपविजेतेपद

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि. २२ सप्टेबर-**

जिल्हा कबड्डी स्पर्धेत दुधनी येथील श्री एस. जी. परमशेट्टी हायस्कूलने १७ वर्षे मुलींच्या गटात उपविजेपद संपादिले.

या स्पर्धेत श्रावणी अचलेर, लक्ष्मी परमशेट्टी, चंदना पंडित, श्रेया बशेट्टी, अंबिका जाधव, कोमल जाधव, पायल राठोड, अंकिता येगदी अंकिता वडियार, रुबिना पठाण यांनी उत्कृष्ट कामगिरी केली. संघास क्रीडाप्रमुख दत्तात्रय हिळळी, नागराज कलबुर्गी, अविनाश भैरूणगी व सेवक महादेव हंगरगी यांचे मार्गदर्शन लाभले.

त्यांचे संस्थेचे अध्यक्ष परमपूज्य जयगुरुशांत लिंगाराध्य शिवाचार्य महास्वामीजी, उपाध्यक्ष महांतेश देसाई, सदस्य माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे, सातलिंगप्पा परमशेट्टी, राजशेखर गाडी, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राखी खंडाळ, उपाध्यक्ष प्रभावती हौदे मुख्याध्यापक रेवणसिद्ध आलीगावे, पर्यवेक्षक लक्ष्मीपुत्र गद्दी आदींनी अभिनंदन केले.

## संक्षिप्त वृत्त



### भारतरत्न इंदिरा गांधी महाविद्यालयात अभियंता दिन साजरा

**सोलापूर, दि. २२ सप्टेंबर-**
केगाव येथील भारतरत्न इंदिरा गांधी अभियांत्रिकी महाविद्यालयात अभियंता दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. एम. विश्वेश्वरय्या यांच्या प्रतिमास पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलन केले. प्रास्ताविक प्रो. रेशमी पीनाबत्ती यांनी केले. प्रमुख पाहुणे म्हणून महावितरणचे सहाय्यक अभियंता रवी बढे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल देशमाने हे होते. यावेळी अभियंता बढे म्हणाले, विद्यार्थ्यांना त्याच्या दृष्टिकोन व्यापक करण्यासाठी आणि त्यांचे कौशल्य तसेच वैयक्तिक गुण वाढवण्यासाठी प्रोत्साहित केले. तसेच समाजासाठी अभियंता किती महत्त्वाचा आहे हे त्यांनी विद्यार्थ्यांना लक्षात आणून दिले आहे. तसेच अभियंता हे सर्व क्षेत्रात राष्ट्र उभारणीचे महत्त्वाचे स्थान आहे. यावेळी प्राचार्य डॉ. देशमाने यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी ॲकॅडमी डीन ए. ए. पेरमपल्ली, मुख्य संयोजक डॉ. सय्यद पाशा उपस्थित होते. या कार्यक्रमाप्रसंगी विद्यार्थ्यांनी स्टार्ट ऑफ कल्पना पोस्टर प्रेझेंटेशन प्रकल्प प्रदर्शने प्रश्नमंजुषा स्पर्धा अशा अनेक विविध मधील विद्यार्थ्यांना बक्षीस आणि प्रमाणपत्राची वितरण प्रम या यशस्वी विद्यार्थ्यांना महाविद्यालयाचे अध्यक्ष रवींद्र गायकवाड सचिवा अनामिका रवींद्र गायकवाड यांनी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमास ३०० विद्यार्थी व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमासाठी समन्वयक डॉ. प्रवीणकुमार मून, डॉ. स्नेहलता नाईक, डॉ. वैभव शिरोडकर, डॉ. श्रीणु बाबू, प्रो. मधिया कैसर यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन प्रो.सय्यदा निकत अथर यांनी केले. तर आभार डॉ. सय्यद पाशा यांनी मानले.



### महापालिकेतील २४९ रोजंदारी, बदली कामगारांना सेवेत कायम करावे

**सोलापूर, दि. २२ सप्टेंबर-**
महापालिकेतील सन १९९५ नंतर सेवेत कार्यरत असलेल्या २४९ रोजंदारी व बदली कामगारांना सेवेत कायम करावे या मागणीचे निवेदन माजी गटनेते आनंद चंदनशिवे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना दिले. सोलापूर महानगरपालिकेमध्ये सुमारे गेल्या २५ ते ३० वर्षापासून विविध संवर्गातील रोजंदारी व बदली २४९ सेवक काम करीत आहेत. या सेवकांना सेवेत कायम करण्यात आलेले नाही. याप्रकरणी तातडीने कार्यवाही करावी, असे निवेदनात म्हटले आहे. दरम्यान, २४९ बदली व रोजंदारी सेवकांना सेवेत कायम करण्याबाबतचा विषय लवकरच मार्गी लावू, असे आश्वासन उपमुख्यमंत्री पवार यांनी दिले. यावेळी माजी नगरसेवक गणेश पुजारी, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते इरफान शेख, महिला जिल्हाध्यक्ष वर्षाराणी शिंदे, महिला आघाडीच्या शशिकला कसफटे, चित्रा कदम, चंद्रकांत सोनवणे, प्रतीक चंदनशिवे, शहाबाज किंग, अल्ताफ कुरेशी, अब्दुल शेख, बापू अड्डेवाले, अब्दुल शेख, मिनाज पटेल, सलीम नदाफ, विनोद मिसाळ, रॉक शेख, तनवीर मुजावर, समीर कुरेशी, फिरोज नदाफ, रोजंदारी व बदली सेवक प्रतिनिधी धोंडीबा कापुरे, धीरज वाघमोडे, समाधान सकट आदी उपस्थित होते.

**माजी गटनेते आनंद चंदनशिवे यांनी दिले उपमुख्यमंत्री पवार यांना निवेदन**

## शहरात नवरात्रोत्सवाची लगबग

# श्री रुपाभवानी मंदिरात मंडप उभारणीस सुरुवात

**श्री तुळजाभवानीच्या धर्तीवरच सर्व धार्मिक विधी होणार**

**दर्शनासाठी लाखो भाविकांची मांदियाळी**

**रंगरंगोटी, मंडप, विद्युत रोषणाईचे काम अंतिम टप्प्यात**

**पुजारी संजय पवार यांची माहिती**









**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ सप्टेंबर-**
येत्या ३ ऑक्टोबर ते १६ ऑक्टोबरपर्यंत येथील श्री रूपा भवानी मंदिरात शारदीय नवरात्रौत्सव आणि कोजागिरी पौर्णिमा उत्सव साजरा होणार आहे. या मंदिरात तुळजापूर येथील श्री तुळजाभवानी मातेच्या धर्तीवर सर्व धार्मिक विधी, नित्योपचार पार पाडण्यात येणार असल्याची माहिती श्री रूपा भवानी देवस्थान भक्त व तरूण मंडळाच्या वतीने मंदिर पुजारी संजय पवार यांनी आज (दि. २२) दै. तरूण भारतशी संवाद साधताना दिली. दरम्यान, रंगरंगोटी, मंडप आणि विद्युत रोषणाईचे कामही अंतिम टप्प्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

नवरात्रौत्सव काळात श्री रूपा भवानी मातेच्या मंदिरातील पार पाडण्यात येत असलेल्या धार्मिक विधींबाबत विस्ताराने बोलताना पुजारी पवार पुढे म्हणाले की, ३ ऑक्टोंबरपासून म्हणजेच घटस्थापनेपासून नवरात्रौत्सवास प्रारंभ होत आहे. या उत्सवाच्या धर्तीवर श्री रूपा भवानी देवस्थान भक्त व तरूण मंडळाच्या वतीने मंदिराच्या रंगरंगोटीचे काम पूर्ण करण्यात आले आहे. आता मंडपाचे काम चालू आहे, यानंतर विद्युत रोषणाईचेही काम सुरू होणार आहे. ही कामे येत्या १ ऑक्टोपर्यंत पूर्ण करण्यात येणार आहेत. प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी मंदिरातील स्वच्छतेबाबत सोलापूर महापालिका अधिकाऱ्यांशी पत्रव्यवहार केला आहे. वीज वितरण कंपनी, पोलिस प्रशासनाशीही पत्रव्यवहार झाला असून, भाविकांच्या सुरक्षेसाठी उद्या म्हणजेच २३ सप्टेंबर रोजी पोलिस अधिकाऱ्यांसोबत एक बैठकही होणार आहे. प्रतिवर्षीप्रमाणे पोलिसांचा चोख तगडा बंदोबस्त ठेवावा, अशी मागणीही आम्ही पोलिस अधिकाऱ्यांकडे या बैठकीत करणार आहोत. भाविकांच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून देखील मंदिरात पोलिसांसाठी एक कक्ष उभारला जाणार आहे. सी.सी. टी. व्ही कॅमेरा कक्ष स्थापन करण्यात येणार आहे. एकंदरीत, हा उत्सव शांततेत आणि उत्साहात पार पाडण्यासाठी प्रयत्न राहणार आहे.

### कर्नाटकच्या भाविकांचीही दर्शनासाठी गर्दी

आई राजा उदो ऽऽ उदो, सदानंदीचा उदो ऽऽ उदो, श्री तुळजाभवानी माता की जय असा जयघोष करीत कर्नाटकातील भावीक श्री तुळजाभवानी मातेचे दर्शन घेण्यासाठी कोजागिरी पौर्णिमेस दूरवरून पायी येतात. सोलापूरहून तुळजापूरला जाताना हे भावीक श्री रूपा भवानी मातेच्या दर्शनासाठीही मोठी गर्दी करतात.

### व्यापाऱ्यांचीही लाखोंची होते उलाढाल

कोजागिरी पौर्णिमेला देखील महिलांसह अबालवृद्ध भाविकांची विशेष उपस्थिती असते. महिला भाविक पुजासाहित्य घेतात, देवीची खणा नारळाने ओटी भरतात. तसेच परडी भरून मातेचे आशीर्वाद घेतात. या उत्सव काळात अनेक प्रासादिक दुकाने, खेळणीचे दुकाने उभारली जातात. यामुळे उत्सव काळात व्यापाऱ्यांचीही लाखोंची उलाढाल होते.

### डुम मंडप आकर्षणाचे केंद्रबिंदू ठरणार

श्री रूपा भवानी मंदिर परिसरात डुम प्रकारचा भव्य असा मंडप उभारला जात आहे. ६० बाय ९० अशा आकाराचे हे डुम आकर्षणाचे केंद्रबिंदू ठरणार आहे. लोखंडी अँगलच्या मध्यमातून उभारलेल्या मंडपाचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. तर मंदिराच्या दोन्ही बाजूस ३० बाय १०५ आकाराचे सभा मंडप उभारले जात आहेत. यासाठी आमचे १२ कामगार अहोरात्र परिश्रम घेत आहेत. या मंडप उभारणीमुळे भाविकांना उन्हाचा अजिबात त्रास होणार नाही.

**- प्रशांत आट्टे, व्यवस्थापक, सचिन कोरे मंडप कॉन्ट्रॅक्टर.**

### दसऱ्याला निघतो पालखी सोहळा

प्रतिवर्षीप्रमाणे नवरात्रोत्सव काळात पहिल्या आणि दुसऱ्या माळेदिवशी भाविकांची गर्दी कमी असते. तिसऱ्या माळेपासून नवव्या माळेपर्यंत हजारो भावीक आई रूपा भवानी मातेच्या दर्शनासाठी येतात. तर दसऱ्यापासून कोजागिरी पौर्णिमेपर्यंत सोलापूर शहर, जिल्हा आणि राज्याच्या विविध भागातून लाखो भावीक दर्शनासाठी येतात. दसऱ्या दिवशी दुपारी ४ वा. श्री रूपा भवानी मातेचा पालखी सोहळा सिमोलंघनासाठी वाजतगाजत निघतो आणि सिमोल्लंघनानंतर पार्क चौकातील शमी वृक्षास प्रदक्षिणा घालून हा सोहळा रात्रौ ९ वा. मंदिरात येतो.

### उत्सव काळात भाविकांनी पोलिसांना सहकार्य करावे

नवरात्र उत्सव काळात आई रूपा भवानी मातेच्या दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी असते. विशेषत: महिला वर्ग मोठ्या प्रमाणात असतो. या यात्रा काळात देवस्थान मंडळाच्या वतीने येणाऱ्या भक्तांना सर्व सोयी-सुविधा पुरविण्याचा आमचा प्रयत्न असतो. यामुळे दर्शन रांगेत आणि परिसरात भाविकांनी गोंधळ न घातला दर्शनाचा लाभ शांततेत घ्यावा व पोलिस बांधवांनाही सहकार्य करावे, असेही आवाहन पुजारी संजय पवार यांनी केले आहे.

# भगवंतांची भक्ती केल्यास माणसाचे रक्षण होते : डॉ. गरिकीपाटी नरसिंहाराव

**दोन दिवसीय आध्यात्मिक प्रवचनमाला**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ सप्टेंबर-**
मनुष्याचे जीवन सुखकर होण्यासाठी भगवंतांची भक्ती करणे गरजेचे आहे. भगवंतांची भक्ती केल्यासच माणसाचे रक्षण होते, असे प्रतिपादन प्रख्यात तेलुगू प्रवचनकार ब्रह्मश्री सहस्रावधानी पद्मश्री डॉ. गरिकीपाटी नरसिंहाराव यांनी शनिवारी सोलापुरात केले.

फेडरेशन ऑफ तेलुगू असोसिएशन्स ऑफ महाराष्ट्र (एफटॅम) अंतर्गत गठीत सोलापूर समितीतर्फे सोलापुरात आयोजित अध्यात्मिक तेलुगू प्रवचनात ते बोलत होते. अक्कलकोट रोड एम आयडीसीतील पद्मावती कन्व्हेंशन्समध्ये त्यांची अमृतवाणी बरसली. आपल्या अमृतवाणीतून त्यांनी महाकवी कालिदास यांचे श्लोक उलगडत धर्म, संस्कृती आणि जीवनशैलीवर प्रबोधन केले. ते म्हणाले की, आधुनिक जीवनशैली मुळे कुटुंब व्यवस्थेवर मोठा परिणाम झाला आहे. एकत्र कुटुंब पद्धतीचा ऱ्हास होत आहे. सर्वांनी मिळून मिसळून राहणे नितांत गरजेचे आहे. मिळून मिसळून राहण्याची पद्धती व नातेसंबंधाचे महत्व जगात केवळ भारतातच आहे. मिळून मिसळून राहण्यातच खरे सुख आहे. हे लक्षात येता एकत्र कुटुंब पद्धतीचा ऱ्हास होऊ नये, याची काळजी प्रत्येकाने घेणे गरजेचे आहे. आपल्या देवघरातील देवाला अनेक फुले वाहण्याची गरज नाही. केवळ एक फुल, मंत्र पुरेसे आहे. देवाला अलंकृत करावेच असे नाही तर देवाचे मनोभावे दर्शन घेणे याला महत्व आहे, असे डॉ. गरिकीपाटी नरसिंहाराव म्हणाले. नर्मविनोद शैलीने भाष्य करत त्यांनी प्रवचनात रंगत आणली.





प्रवचनापूर्वी डॉ. गरिकीपाटी नरसिंहाराव यांचा संयोजन समितीतर्फे पुणेरी फेटा, शाल, त्यांची प्रतिमा असलेले वॉल हैंगिंग, पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी 'एफटॅम' सेंट्रल टीमचे जगनबाबू गंजी, सोलापूर संयोजन समितीचे अध्यक्ष पेंटप्पा गड्डम , उपाध्यक्ष मुरलीधर अरकाल, सहकोषाध्यक्ष श्रीधर म्याकल, सचिव भूपती कमटम , सहसचिव विजयकुमार उडता, कमिटी सदस्य गंगाधर देवसानी, सत्यनारायण अडगटला, अंबादास बिंगी, नागनाथ बुरा, मल्लिकार्जुन कमटम, प्रवीण कोटा, पुरुषोत्तम उडता, गणेश गुज्जा, डॉ. राजेंद्र गाजुल, योगेश म्याकल, अशोक दुस्सा, प्रभाकर भिमनाथ, प्रवीण जिल्ला, अशोक बिटला, अंबादास नक्का उपस्थित होते. सूत्रसंचालन रेणुका बुधारम व नारायण येरवा यांनी केले. यावेळी सुमारे २ हजार श्रोते उपस्थित होते.

# श्री महालक्ष्मी मंदिरात धार्मिक कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ सप्टेंबर-**
तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी येथील कटारे परिवाराने श्री कमला संस्थानम्च्या वतीने उभारलेल्या श्री महालक्ष्मी मंदिरात नवरात्र उत्सव काळात ९ दिवस विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती मंदिर पुजारी देविदास गौडा यांनी आज (दि. २२) दिली.



या नवरात्रोत्सव काळात श्री महालक्ष्मी मातेची विविध अलंकार सेवा पार पडणार आहे. यामध्ये गुरूवार, दि. ३ ऑक्टोबर रोजी श्री कौमारी देवी अलंकार सेवा होणार आहे. तर दि. ४ ऑक्टोबर रोजी श्री राजराजेश्वरी अलंकार सेवा, दि. ५ ऑक्टोबर रोजी श्री शाकंभरी देवी अलंकार सेवा, दि. ६ ऑक्टोबर रोजी श्री धान्यलक्ष्मी देवी अलंकार सेवा, दि. ७ ऑक्टोबर रोजी श्री ललितादेवी अलंकार सेवा, दि. ८ ऑक्टोबर रोजी श्री धनलक्ष्मी देवी अलंकार सेवा, दि. ९ ऑक्टोबर रोजी श्री विद्या सरस्वती देवी अलंकार सेवा, दि. १० ऑक्टोबर रोजी श्री महालक्ष्मी देवी अलंकार सेवा, दि. ११ ऑक्टोबर रोजी श्री कनकदुर्गा देवी अलंकार सेवा, शनिवार, दि. १२ ऑक्टोबर रोजी श्री महिषासूर मर्दिनी देवी अलंकार सेवा करण्यात येत आहे. या उत्सव काळात दररोज पहाटे ५ वा. श्री देवीजींना महाभिषेक, अग्निहोत्र, धुपारती, कर्पुर आरती, पंचारती, महानैवेद्य, सकाळी ९ वा. श्री दुर्गा सप्तशती व पंचसुक्त होमहवन, दुपारी १२ वा. महानैवेद्य, पंचारती, कर्पुर आरती, तीर्थप्रसाद वाटप, सायंकाळी ५ वा. विष्णूसहस्त्रनाम पठन, श्री महालक्ष्मी अष्टोत्तरम, सायंकाळी ६ वा. अग्निहोत्र, सायंकाळी ७ वा. महानैवेद्य धुपारती, नक्षत्र महाआरती, पंचारती, कर्पुर आरती, तीर्थप्रसाद वाटप होणार आहे. तर सोमवार, दि. २१ ऑक्टोबर रोजी श्री महालक्ष्मी देवींचा वार्षिकोत्सव कार्यक्रम पार पडणार असल्याचीही माहिती पुजारी गौडा यांनी दिली.

### मंदिराच्यावतीने वर्षभर अन्नछत्र

तामलवाडी येथील श्री कमला संस्थानम्च्या वतीने उभारलेल्या श्री महालक्ष्मी मंदिरात बुधवार वगळून रोजच दुपारी १२ ते ४ वाजेपर्यंत अन्नछत्र सुरू असते. या अन्नछत्राचा लाभ नवरात्रौत्सव काळात श्री महालक्ष्मी मातेच्या दर्शनास येणाऱ्या सर्व भाविकांनी घ्यावा.


**- किशोर कटारे, संस्थापक अध्यक्ष, कटारे उद्योग समूह**

# गंगेवाडीच्या शंभू महादेव मंदिरावर कोसळली वीज

**जीवीतहानी नाही, मात्र शिखराचे मोठे नुकसान**

**अचानक वीज कोसळल्याने मंदिरात बसलेले लोक घाबरले**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ सप्टेंबर-**
दक्षिण सोलापूर तालुक्यातील गंगेवाडी पंचक्रोशीत रविवार, दि. २२ सप्टेंबर रोजी दुपारी दीड वाजेच्या सुमारास विजांच्या गडगडाटासह पावसाने हजेरी लावली. या पावसातच अचानक वीज कोसळल्यानं येथील ग्रामदैवत श्री शंभू महादेव मंदिराचं मोठं नुकसान झाले. या दुर्घटनेत सुदैवानं जीवीतहानी झालेली नाही, मात्र मंदिराच्या शिखरावरील मूर्ती, खांब आणि इलेक्ट्रीकच्या वायरींगचं मोठं नुकसान झाल्याची माहिती गंगेवाडीचे रहिवासी तथा बीएम आयटीचे प्रा. नितीन जाधव यांनी दै. तरुण भारतशी



आज (दि. २२) संवाद साधताना दिली.

सोलापूर आणि धाराशिव जिल्ह्याच्या सीमेवरचं अगदी छोटंस गांव अशी गंगेवाडीची ओळख आहे. वृध्द, चिमुकली सोडली तर दिवसा सगळे गावकरी शेतात राबताना दिसतात. गंगेवाडी, कासेगाव, तामलवाडी पंचक्रोशीत गेले २-३ दिवस ढगाळ वातावरण असून, गेले २ दिवस सायंकाळी विजांचा कडकडाटासह रिमझीम पाऊस पडत आहे. आज रविवारी सकाळी कडक ऊन असल्याने उकाडाही जाणवत होता. मात्र दुपारी १ च्या नंतर अचानक ढग जमा होवून विजांच्या कडकडाटासह पावसाने हजेरी लावली. याच पावसात गंगेवाडी येथील श्री शंभू महादेव मंदिरावर वीज पडली. याच मंदिरात काही वृध्द मंडळी बसली होती...तर बाजूलाच लहान मुलेही खेळत होती. ही वीज कोसळल्याने सुदैवाने कोणतीही जीवीत हानी झाली नाही मात्र मंदिराच्या शिखराला ३ ते ४ तडे गेले आणि इलेक्ट्रीकल वायर्सचेही मोठे नुकसान झाले आहे. आजच्या पडलेल्या पावसाबरोबर वीज पडल्याने ग्रामदैवत शंभू महादेव मंदिराच्या शिखरावर कोरलेल्या २ ते ३ मुर्तींचं नुकसान झाले. या दुर्घटनेत मंदिराच्या खांबाला तडे गेले आहेत. सुदैवानं कोणतीही जीवीतहानी झालेली नाही. तरीही गावच्या मध्यवर्ती ठिकाणी हे मंदिर असल्याने वीज कोसळताच मोठा आवाज झाला आणि गावातील नागरिक भयभीत झाले होते. मंदिर परिसरात खेळत असलेली मुले, मंदिरात बसलेली

### सप्टेंबर २०२२ ला याच शिखरावर पडली होती वीज

दै. तरूण भारतच्या माध्यमातून स्थानिक नागरिकांशी संवाद साधल्यावर त्यांनी सांगितले की, गंगेवाडी येथील श्री शंभू महादेव मंदिरावर वीज कोसळण्याची ही २ वर्षातील दुसरी घटना आहे. सप्टेंबर २०२२ साली याच मंदिराचे काम सुरू असताना शिखरावर वीज कोसळून मोठे नुकसान झाले होते. त्यावेळी तत्कालिन तलाठ्यांनी रितसर पंचनामा करुन शासनस्तरावरून अर्थसाहाय्यही केले होते. आज रविवार असल्याने या ठिकाणी महसूलच्या कोणीही अधिकाऱ्यांनी भेट दिली नाही. किमान उद्या सोमवारी तरी तलाठी, मंडलाधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी करून नुकसानीचा पंचनामा करावा, अशीही काही नागरिकांनी मागणी केली.

# स्पॅन हॉस्पिटलमधून मंगळसूत्र पळवले

**सोलापूर, दि. २२ सप्टेंबर-**
बाळाला चेकअप करिता घेऊन आलेल्या फिर्यादी सविता पांडुरंग शिरगिरे (वय-३१,रा.मु. पो.उमरगा ता.तुळजापूर) यांनी त्यांच्या वार्ड नंबर १ चा दरवाजा उघडून आत प्रवेश केला.त्यावेळी रूम मधील बाथरूम मध्ये बाळाला आंघोळ करताना त्यांच्या मुलीने काढून ठेवलेले तीस हजार रुपये किमतीचे ३.५ ग्रॅमचे सोन्याचे मनी मंगळसूत्र अज्ञात चोरट्याने चोरून नेले आहे. अशा आशयाची फिर्याद सविता शिरगिरे यांनी सदर बझार पोलिस ठाण्यात दिली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.हि घटना २० सप्टेंबर रोजी सकाळी साडेआठ ते साडेनऊ वाजण्याच्या दरम्यान घडली.पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल सरतापे हे करीत आहेत.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)


सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - ८९३

**देहबुध्दि जयां वसे लोभ चित्तीं ।**
**आपुलें जाणती परावें जे ।।**

निसर्ग निर्मित सर्व समान असले तरीही बुध्दी असणाऱ्या या मानवी जीवाने सर्व जीवात भेद करण्यात कसलीही कसर ठेवली नाही, असे आपणास आपल्या अवती भवतीच्या परिस्थितीवरुन दिसून येते. असा अनुभवही आपणास येत असतो. अशा अनुभवाला काही प्रमाणात आपणही कारणीभूत असू शकतो. असो, इतर जीवांचे तर सोडाच पण मानवा-मानवातही भेद करण्यात हा माणूस मागे राहिला नाही. या भेदजन्य वृत्तीमुळे माणूस इतरांपासून व स्वत:पासून दुरावतो. त्याचे हे दुरावणे त्याला सुख-दु:खाच्या अस्तित्वाची जाणीव करून देते. तरीपण माणूस भेदजन्य दृष्टी सोडत नाही. त्या मागचे कारण म्हणजे तो या नाशवंत देहालाच मी समजून बसला आहे. या देहाला मी समजण्याने त्याच्या चित्तात लोभ उत्पन्न होतो. त्याचा हा लोभ आप-पर असा भेद निर्माण करतो. जेथे आप-पर आला तेथे सुख-दु:ख, ईर्षा, मोह, मत्सर, अहंकार, द्वेष, काम, क्रोध हे ठाण मांडून बसलेले असतात. या सर्वांच्या अस्तित्वाचा परिणाम प्रामुख्याने दु:ख निर्मितीकडे होतो. त्यामुळे देहाला मी माणून चित्तात लोभ उतन्न करणारे व आप-पर मानणारे लोक सुखी असत नाहीत. हे स्पष्ट करतांना तुकाराम महाराज म्हणतात, देह बुध्दि जयां वसे लोभ चित्ती । आपुलें जाणती परावें जे ।।



या नाशवंत देहाला मी म्हणत नाही, असा माणूस सापडणे कठीण आहे. आणि सापडलाच तर तो संत, महात्माच असेल यात शंकाच नाही. एखादा व्यक्ति मी ला टाकून वागू लागला तर अनेक लोक त्याला त्याच्या मीची आठवण देतात. कारण ते स्वत: मी मध्ये जगत असतात. मी शासकीय सुटीच्या वेळेत प्रवचन, किर्तनाला गेलो तरी अनेक लोक माझ्याकडे शासकीय पदाच्या दृष्टीकोनातूनच पाहत. कांही लोक तर मला माझ्या पदाची आठवण करून देत. खरे म्हणजे प्रवचन, किर्तन प्रसंगी माझ्याकडे एक अधिकारी म्हणून पाहण्याचे किंवा मी अधिकारी म्हणून किर्तन, प्रवचनाला उभे राहण्याचे कारणच नसावे. पण असे होत नाही. कारण रात्रं-दिन मी च्या अधिन जगणाऱ्या या माणसाला मी तू चे व्यसन लागले आहे. त्याला हे व्यसन गप्प बसू देत नाही. एखाद्या प्रवचन, किर्तनकाराजवळ लोक जेवढ्या मनमोकळेपणाने जातात, तेवढ्या मनमोकळेपणाने माझ्या जवळ येत नसत. कारण त्यांना माझ्यात एखादा पूर्णत: प्रवचन, किर्तनकार दिसत नसे. तर काही अंशी का असेना पण अधिकारीच दिसायचा. स्वत:कडे व इतरांकडे विशिष्ट अशा मीच्या दृष्टीकोनातून पाहण्यानेच आप-परला पुष्टी मिळते. ही पुष्टीच दु:ख व अहंकाराच्या वाढीस बळकटी देते. नाशवंत देहरुपी चित्तातील लोभ, अहंकार व भावनेतील आप-पर हे इतर क्षेत्रात तर सोडाच; पण समतेचा आधारस्तंभ असणाऱ्या प्रवचन, किर्तन क्षेत्रातही विषमतेला जन्म देत आहेत. असे या पवित्र क्षेत्रात घुसलेल्या काही मूठभर व्यावहारिक लोकांमुळे घडत आहे, हे दुर्दैवाने नमूद करावे लागत आहे. असो, आपण मी नाशवंत आहे, हे सदैव लक्षात ठेवून वागणे योग्य होईल, असे आम्हास वाटते.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : सोमवार | ज्ञानेश्वरी जयंती |
| दि. २३ सप्टेंबर २०२४ | भारतीय आश्विन मासारंभ |
| विक्रम संवत् २०८०, | चांगला दिवस. |
| शके - १९४६ | ....राहू काल.... |
| संवत्सर - क्रोधी नाम | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - भाद्रपद | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| कृ. षष्ठी (१३.५०) | मंगळवार : दु. ३ ते ४.३० |
| ऋतु - वसंत | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र- रोहिणी (२२.०६) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - सिध्दी (२७.०९) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - विष्टि (२५.०९) | शनिवार : स. ९ ते १०.३० |
| दिनविशेष - | |

### राशीभविष्य

**मेष :** मन उत्साही राहिल्यामुळे आजचा दिवस चांगला जाईल. लांब रहात असलेल्या नातेवाईकांकडून फायदा मिळेल. व्यापार चांगला चालेल. बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

**वृषभ :** आपल्याला नवीन संधी मिळतील. राजकीय व्यक्तींपासून फायदा होईल. कार्यक्षेत्रात प्रगती होईल. दुसऱ्याच्या कामात हस्तक्षेप करू नका. प्रवास सुखकारक राहील.

**मिथुन :** आर्थिक फायदा झाल्यामुळे आनंदी रहाल. व्यापारात प्रगती होईल. खाण्या पिण्याकडे लक्ष द्या. कौटुंबिक वातावरण सहकार्याचे राहील.

**कर्क :** मुलांच्या कार्यक्षेत्रातील शुभ बातम्या प्राप्त होतील. नौकरीमध्ये अधिकारी आपल्याला सहकार्य करतील. घाई गडबडीने कोणतेही काम करू नका.

**सिंह :** कौटुंबिक वातावरण आनंदी असल्यामुळे आपले कामात लक्ष लागेल. सामाजिक प्रतिष्ठेत वाढ होईल. पैशाच्या बाबतीत असलेली चिंता दूर होईल. वहान चालवतांना सावधानी बाळगली पाहिजे.

**कन्या :** मनोबल वाढल्याने तणाव कमी होईल. मुलांचे प्रेम मिळेल. व्यापारात नवीन योजनाचा शुभारंभ होईल. आपल्या व्यसनांना चालना देऊ नका.

**तुळ :** चांगल्या लोकांच्या गाठी होतील ते आपले हिंतचिंतक असतील. प्रवास सावधानीने करावा. योजना कार्यान्वयीत होतील. एखादे अवघड काम झाल्याने आनंदी रहाल.

**वृश्चिक :** सकारात्मक विचार कराल. आपल्या कामाचे समाजात प्रशंसा होईल. व्यापारिक कामे यशस्वी होतील. जोखमीचे काम करण्यापासून सावधान रहा.

**धनु :** शुभ रंग: जांभळा, शुभ दिशा:पश्चिम
आनंदी बातमी कळेल. सामाजिक प्रतिष्ठा वाढेल. स्वत:च्या विचाराने कामे केले तर फायदेशीर रहाल. आर्थिक योजना वेळेत पूर्ण होतील. आळस करू नका.

**मकर :** नवीन कामाशी संबंध येण्याचा योग आहे. कोणत्याही कामात स्पर्धक म्हणून राहण्यातच आपला फायदा आहे. खर्चावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.

**कुंभ :** सुख समृध्दीत वाढ होईल. अपूर्ण कामे पूर्ण होण्याचे मार्गावर. प्रवासाचा योग आहे. व्यापार व्यवस्याय भरभराटीवर. निष्कारण वाद विवाद टाळा.

**मीन :** आपले स्वप्न पूरे होतील. जुन्या संबंधामुळे कामे यशस्वी पार पडतील. कामाची गती अशीच राहू द्या.

# गटशिक्षणाधिकारी आरबाळेंवर कारवाईची मागणी

## नियमबाह्य बदल्या प्रकरण; शिक्षक संघटनांचा आंदोलनाचा इशारा



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ सप्टेंबर-**

अक्कलकोट तालुक्यातील प्रभारी गटशिक्षणाधिकारी प्रशांत आरबाळे यांनी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या २२ जुलैच्या आदेशाला केराची टोपली दाखवत मनमानी पद्धतीने २१ प्राथमिक शिक्षकांच्या नियमबाह्य बदल्या गटविकासाधिकारी शंकर कवितके यांना अंधारात ठेऊन केल्या आहेत. या बदल्या तातडीने रद्द कराव्यात अन्यथा सोलापूर जिल्ह्यातील सर्वच शिक्षक संघटना समन्वय समितीच्या माध्यमातून सोलापूर जिल्हा परिषदेसमोर आंदोलनाचा इशारा मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम आणि शिक्षणाधिकारी कादर शेख यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे दिला.

विभागीय आयुक्तांच्या अधिकाराचा गैरवापर करत वरिष्ठ अधिकाऱ्यांची दिशाभूल करत मनमानी आणि नियमबाह्य पद्धतीने कामकाज अक्कलकोट तालुक्यातील प्रभारी गटशिक्षणाधिकारी प्रशांत आरबाळे यांचे सुरू आहे. १० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या आणि दोन शिक्षक कार्यरत असलेल्या शाळेतील सेवाज्येष्ठ शिक्षकाचे तात्पुरते समायोजन करण्याचे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचे दि.२२ जुलै २०२४चे आदेश डावलून गटविकासाधिकारी यांना अंधारात ठेवून नियमबाह्य बदल्या केल्याचा आरोप संघटनेच्यावतीने यावेळी करण्यात आला.

जिल्ह्यातील इतर सर्वच तालुक्यात नियमानुसार कामकाज चालत असून त्याला अक्कलकोट तालुका मात्र अपवाद असल्याचे यावेळी नमुद करण्यात आले.नियमबाह्य कामकाज करणाऱ्या प्रभारी गटशिक्षणाधिकारी प्रशांत आरबाळे यांचा पदभार तातडीने काढून घेण्यात यावा.तसेच नियमबाह्य बदल्या करणाऱ्या प्रभारी गटशिक्षणाधिकारी प्रशांत आरबाळे यांच्यावर कारवाई करण्याची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

यावेळी मागासवर्गीय संघटनेचे तालुकाध्यक्ष महांतेश्वर कट्टीमनी, महाराष्ट्र राज्य आदर्श शिक्षक समितीचे राज्यनेते अंकुश काळे,महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाचे कार्यकारी अध्यक्ष म.ज.मोरे,सोलापूर जिल्हा शिक्षक संघ शिवाजीराव गटाचे जिल्हाध्यक्ष वीरभद्र यादवाड,महाराष्ट्र राज्य शिक्षक समितीचे राज्यनेते अनिल कादे,माजी पुणे विभागीय अध्यक्ष दयानंद कवडे,जिल्हानेते विकास उकिरडे,जिल्हानेते बाबा शेख,राजन ढवण, उम्मीद सय्यद यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.



# आदर्श शिक्षक पुरस्काराने सुभाष नागरसे सन्मानित

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. २२ सप्टेंबर-**

सोलापूर जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ, सोलापूर यांच्याकडून श्री दिगंबर जैन गुरुकुल प्रशालेतील गणित-विज्ञान सहशिक्षक सुभाष नागरसे यांना जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

शिक्षक आमदार जयंत आसगावकर, मुख्याध्यापक संघाचे माजी अध्यक्ष सुभाष माने, महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक संघ महामंडळ, मुंबईचे अध्यक्ष तानाजी माने यांच्या हस्ते हा पुरस्कार सुभाष नागरसे व भाग्यश्री नागरसे यांना प्रदान करण्यात आला. याबद्दल ऐ.प.दि. जैन पाठशाळेचे मानद सचिव डॉ. रणजित गांधी, सर्व विश्वस्त, प्रशालेचे मुख्याध्यापक राजकुमार काळे, उपमुख्याध्यापक शैलेश पांगळ, पर्यवेक्षक प्रवीण कस्तुरे यांच्यासह प्रशालेतील सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले. यापूर्वी उपक्रमशील सहशिक्षक सुभाष नागरसे यांना प्रतिष्ठेचा स्वर्गीय श्रीमान भाऊसाहेब गांधी सेवाभावी पुरस्कारासह १५ विविध संस्थांचे पुरस्कार मिळाले आहेत. त्यांनी आजपर्यंत ४०० हून अधिक शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती करत एक वेगळा रेकॉर्ड निर्माण केला आहे.



# कामगार शक्ती युनियनतर्फे महापालिका आयुक्तांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. २२ सप्टेंबर-**

कामगार शक्ती युनियनच्या वतीने महापालिका आयुक्त शितल तेली-उगले यांचा सत्कार करण्यात आला. महापालिका आयुक्त शितल तेली-उगले यांच्या मार्गदर्शनाखाली लाड कमिटी अंतर्गत अनेक पाल्यांना नियुक्ती आदेश देण्यात आले. रोजंदारी सेवकांच्या मासिक पगारात दररोज ४० रुपये वाढ करण्यात आली. मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाकडील बालवाडी शिक्षिका, सेविका यांच्या मासिक मानधनांमध्ये पाचशे रुपयाची वाढ जाहीर केली आहे. सेवानिवृत्त सेवकांना महागाई भत्ता २६ टक्के वरून ३१ टक्के करण्यात आला आहे याबद्दल युनियनच्या वतीने कामगार नेते जनार्दन शिंदे यांच्या हस्ते आयुक्तांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी जनरल सेक्रेटरी चांगदेव सोनवणे, कार्याध्यक्ष अजय कांबळे, अतिश कुचेकर, प्रसन्नजीत शिंगे, नितीन कांबळे, श्रीकांत विभुते, सचिन देडे, दौला कटवू, दत्ता गायकवाड उपस्थित होते.



# पानगल प्रशालेत हिंदी दिन साजरा

**सोलापूर, दि. २२ सप्टेंबर-**

सोलापूर येथील एम.ए. पानगल प्रशालेत हिंदी दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी हिंदी विभाग प्रमुखजाकीर हुसेन शाहपुरे होते.

यावेळी प्राचार्य डॉ हारून रशीद बागबान, डॉ. सुरैय्या जाहागिरदार, निकहत नल्लामंदू, इश्तियाक तारानाईक, नगमा मुजावर, मसर्रतजहां शेख व आलिया इनामदार हे होते. कार्यक्रमाची सुरुवात कुरआन पठणाने करण्यात आली. यात पहेली, दोहे, लघुनाटिका, गीत, काव्य, हिंदी भाषेचे महत्त्व, हिंदीचा विकास, हिंदी जयघोष, सुविचार, गझल, अशा सुरेल कार्यक्रमाची रेलचेल होती. सूत्रसंचालन बारावी विज्ञान शाखेचा विद्यार्थी समीर बागवान याने केले तर आभार आयेशा नदाफ या विद्यार्थिनीने मानले.

# मुख्यमंत्री वयोश्री, तीर्थ दर्शन योजनेचा लाभ घ्यावा

**पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांचे आवाहन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ सप्टेंबर-**

राज्यातील ६५ वर्षे व त्यावरील ज्येष्ठ नागरिक तसेच ६० वर्षे व त्यावरील ज्येष्ठ नागरिकांसाठी अनुक्रमे मुख्यमंत्री वयोश्री व मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना या दोन महत्त्वाकांक्षी योजना राज्य शासनाकडून ज्येष्ठ नागरिकांसाठी सुरू करण्यात आलेल्या आहेत. तरी सोलापूर जिल्ह्यातीलजास्तीत-जास्त नागरिकांनी या दोन्ही योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन उच्च व तंत्र शिक्षण, वस्त्रोद्योग, संसदीय कार्य मंत्री तथा पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले आहे.

केंद्र शासनाच्या कार्मिक विभागाद्वारे नोंदणीकृत करण्यात आलेले तसेच राज्य शासनाद्वारे नोंदणी करण्यात आलेल्या योगोपचार केंद्र, मन:स्वास्थ केंद्र मनशक्ती केंद्र प्रशिक्षण केंद्र येथे सहभागी होता येईल. यासाठी लाभार्थ्यांचे कौंटुंबिक वार्षिक उत्पन्न रूपये २ लाखाच्या आत असावे. लाभार्थींनी सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांच्याकडे सादर करणे आवश्यक राहील.

**योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे**

आधार कार्ड, मतदान कार्ड, राष्ट्रीयकृत बँकेचे पासबुक झेरॉक्स, पासपोर्ट आकाराचे २ फोटो, स्वयंघोषणापत्र (उत्पन्नाचे व उपकरण विनामुल्य प्राप्त केले नसल्याचे), शासनाने ओळखपत्र पटविण्यासाठी विहीत केलेली अन्य कागदपत्रे.

# सफाईमित्रांना विविध योजनांचा लाभ अभियानाचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ सप्टेंबर-**



स्वच्छता ही सेवा पंधरवडाअंतर्गत या वर्षी 'स्वभाव स्वच्छता-संस्कार स्वच्छता' या मूलमंत्रच्या आधारे महापालिकेच्या वतीने सर्व सफाईमित्रांना विविध योजनांचा लाभ अभियानचा शुभारंभ करण्यात आला.

गृहनिर्माण तथा शहरी कार्य मंत्रालय, भारत सरकार यांचे निर्देशनानुसार राष्ट्रपिता महात्मा गाधीजींना त्यांच्या जयंती निमित्त आदरांजली अपर्ण करण्यासाठी २ ऑक्टोबर हा दिवस स्वच्छ भारत दिवस म्हणून साजरा केला जातो. त्याची पूर्वतयारी म्हणून, स्वच्छ भारतासाठी स्वयंप्रेरणा आणि सामूहिक कृतीला बळकटी देण्यासाठी २०१७ पासून स्वच्छता ही सेवा पंधरवडा साजरा केला जात आहे. दि. १७ सप्टेंबर ते दि. २ ऑक्टोबर २०२४ दरम्यान स्वच्छता ही सेवा पंधरवडा आयोजित करण्यात आला आहे. या वर्षी ''स्वभाव स्वच्छता - संस्कार स्वच्छता'' या मूलमंत्रच्या आधारे हे अभियान राबविण्यात येणार आहे.

त्याअनुषंगाने आयुक्त शीतल तेली -उगले यांच्या आदेशानुसार तसेच उपायुक्त मच्छिंद्र घोलप व सहा. आयुक्त शशिकांत भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली राखी माने आरोग्य अधिकारी व त्यांची टीम यांच्या सहकार्याने म.न.पा. आवारामध्ये १७ ते २७ सप्टेंबरमध्ये (कार्यालयीन वेळेत) सोलापूर महानगरपेलिकेकडील सर्व सफाईमित्रांना मोफत वैद्यकीय तपासणी, आधार अपडेट कॅम्प, पीएम सुरक्षा विमा योजना व पीएम जीवन ज्योती विमा योजनाचे सफाई मित्रांना लाभ द्यायचे याचा शुभारंभ करण्यात आले. या मोहिमेमध्ये मुख्य सफाई अधीक्षक बिराजदार, सफाई अधीक्षक अनिल चराटे व झोन १ मुख्य आरोग्य निरीक्षक व सर्व आरोग्य निरीक्षक उपस्थित होते. पहिल्या दिवशी झोन १ कडील सर्व सफाईमित्रांनी या योजनांचा लाभ घेतला.

# नारी सन्मान पुरस्काराने महिलांचा गौरव
## मध्यवर्ती नवरात्रोत्सव मंडळाचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ सप्टेंबर -**

सार्वजनिक मध्यवर्ती नवरात्रोत्सव मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा शिवानुभव मंगल कार्यालय येथे आयोजित करण्यात आली होती. यावेळी मंडळाचे ट्रस्टी मल्लिनाथ मसरे, दिलीप कोल्हे, सुनील रसाळे, बसवराज येरटे, विजय पुकाळे आदी विश्वस्त उपस्थित होते.

बैठकीच्या अध्यक्षस्थानी जगदीश मुनाळे होते. प्रारंभी देवीमातेचे प्रतिमेचे पुजन करुन आरती करण्यात आली. तद्नंतर सचिव दत्तात्रय मेनकुदळे यांनी मागील वर्षाचा अहवाल आणि जमाखर्च वाचन केले. या अहवालास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. याप्रसंगी विविध देवस्थान तसेच नवरात्रोत्सव मंडळाचे पदाधिकाऱ्यांनी उत्सव काळात येणाऱ्या विविध प्रकारच्या समस्या मांडल्या. समाजात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या आणि आपली यशकीर्ती सर्वत्र पसरवणाऱ्या अनेक महिलांचा नवरात्र मध्यवर्ती मंडळाच्या वतीने पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येणार आहे. या पुरस्काराचे नाव नवरात्र नारी आदिशक्ती असे असणार आहे. अशी माहिती यावेळी मध्यवर्तीच्या बैठकीत देण्यात आली.

यंदाच्या वर्षी आम्ही नारी आदिशक्ती पुरस्काराचा मोठ्या प्रमाणात विस्तार करणार आहे. पहिल्यांदाच भेटवस्तू, समानपत्र , सन्मानचिन्ह देऊन महिलांचा सन्मान करणार आहे. यासाठी व्यापक स्तरावर महिलांच्या कार्याची माहिती घेऊन निवडक महिलांना पुरस्कार देण्यात येणार आहे. **- दत्तात्रय मेनकुदळे , सचिव**

**२३५ मंडळांवर अंकुश असणार**

मध्यवर्ती नवरात्र उत्सव मंडळाच्या माध्यमातून २३५ मंडळांवर अंकुश असणार आहे. मंडळांनी कोणत्या बाबतीत कार्य करावे, याचे मार्गदर्शन त्यांना येणाऱ्या अडीअडचणी आणि सर्व निर्णय सहमतीने घेण्यासाठी मध्यवर्ती मंडळ कार्य करणार आहे. कार्यक्रमांमध्ये महिला सुरक्षा जागृतीचे आवाहन करा आणि युवकांना या कार्याचा सहभागी करून घेणार आहे.

**- अॅड.प्रशांत कांबळे, अध्यक्ष,**

# अनिता जोशी गुणवंत पुरस्काराने सन्मानित

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. २२ सप्टेंबर-**



मार्डी येथील उत्तर सोलापूर तालुका प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या वतीने शैक्षणिक, सामाजिक, क्रीडा या क्षेत्रात दिलेल्या योगदानाबद्दल पतसंस्थेचे चेअरमन मल्लिनाथ निम्बर्गी यांच्या हस्ते उत्तर सोलापूर तालुक्यातील मार्डी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शिक्षिका अनिता पद्माकर जोशी यांनी आत्तापर्यंत केलेल्या दीर्घकाळ शैक्षणिक, क्रीडा आणि सामाजिक सेवेची दखल घेऊन त्यांचा स्मृतिचिन्ह, शाल, आणि श्रीफळ देऊन पतसंस्थेचे चेअरमन मल्लिनाथ निम्बर्गी यांच्या हस्ते गुणवंत पुरस्काराने सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी शिक्षण विस्तार अधिकारी अंकुश काळे होते. सूत्रसंचालन महेंद्र बंडगर यांनी केले. तर श्रीमती वैशाली कळसकर यांनी आभार मानले. याप्रसंगी आदर्श शिक्षक समितीचे जिल्हाध्यक्ष संजीव चाफाकरंडे, सोलापूर जिल्हा सोसायटीचे संचालक रमेश घंटेनवरू, सचिव गोपाळ माने, माजी सरचिटणीस सुर्यकांत व्हनमाने, जिल्हा सोसायटीचे माजी संचालक सिध्दू सुतार, माजी संचालिका डॉ माधुरी भोसले, माधुरी शुक्ल, शिक्षिका अपर्णा कुलकर्णी, उपस्थित होते.

# शिखर युथ फौडेशनतर्फे दिव्यांगास मदत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ सप्टेंबर-**

शिखर युथ फौंडेशनचे अभ्यासू मार्गदर्शक माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांचे नातू शिखर पहाडिया यांच्या हस्ते दक्षिण सोलापूर तालुक्यातील संजवाड गावचे अपंग व्यक्ती असलेले मल्लिकार्जुन बुळगुंडे यांना अपंग स्कुटी देण्यात आली.संजवाड (ता.द.सोलापूर) येथील बुळगुंडे हे जन्मताच दोन्ही पायांने अपंग आहेत.ते कुठेही जाऊ शकत नाही.गावात त्यांचे दुकान आहे.पावसाळ्यात घरातून दुकानाला जाणे-येणे फारच त्रासदायक वाटत होते म्हणून शिखर पहाडिया यांनी त्यांच्या अडचणी पाहून ३ चाकी स्कूटी भेट दिली.

# जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला ११ विधानसभा मतदारसंघातील आढावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२२ सप्टेंबर-**

विधानसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने जिल्ह्यातील ११ विधानसभा मतदारसंघातील कायदा व सुव्यवस्थेचा आढावा जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी घेऊन मार्गदर्शक सूचना दिल्या.



जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित विधानसभा निवडणूक २०२४ कायदा व संस्था आढावा बैठकीत जिल्हाधिकारी मार्गदर्शन करत होते. यावेळी सोलापूर शहर पोलीस आयुक्त एम. राजकुमार, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, पोलीस उपयुक्त दिपाली काळे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, उपजिल्हा निवडणूक अधिकारी गणेश निऱ्हाळी, उपजिल्हाधिकारी संतोष कुमार देशमुख यांच्या सह सर्व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आशीर्वाद पुढे म्हणाले की, पोलीस विभागाने लोकसभा निवडणुकीप्रमाणे विधानसभा निवडणूक २०२४ मध्ये ही जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अत्यंत चोखपणे राहील यासाठी आवश्यक उपायोजना कराव्यात. लोकसभा निवडणूक कालावधीत जिल्ह्यात ज्या ज्या ठिकाणी कॅश किंवा दारू जप्त करण्यात आली होती अशा ठिकाणी पोलीस विभागाने सुरक्षा अधिक चोख ठेवावी. तसेच वलनेरब्ल व क्रिटिकल मतदान केंद्रावर योग्य सुरक्षा पुरवण्यासाठी संबंधित उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांच्या समवेत पोलीस विभागाच्या अधिकाऱ्यांनी पाहणी करावी, असेही त्यांनी सुचित केले.

यावेळी पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांनी सोलापूर शहरातील कायदा व सुव्यवस्था अनुषंगाने पोलीस प्रशासनाने नियोजन केलेले असून सर्व क्रिटिकल मतदान केंद्रावर निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे सुरक्षा व्यवस्था देण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. तर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी ग्रामीण पोलीस दल तयार असल्याची माहिती पोलीस अधीक्षक श्री. कुलकर्णी यांनी दिली. जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था तसेच वलनरेबल व क्रिटिकल मतदान केंद्राच्या अनुषंगाने सर्व पोलीस अधिकारी सेक्टर ऑफिसर यांचे प्रशिक्षण दिनांक २१ सप्टेंबर रोजी ठेवण्यात येणार आहे. या प्रशिक्षणात सर्व संबंधित अधिकाऱ्यांना या अनुषंगाने सविस्तर प्रशिक्षण देण्यात येणार असल्याची माहिती उपजिल्हा निवडणूक अधिकारी गणेश निऱ्हाळी यांनी दिली.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### लोकसहभागातून वाफळकरवस्ती शाळेवर सीसीटीव्हीची करडी नजर

**करकंब, दि. २२ सप्टेंबर-**

जिल्हा परिषदेने शाळा, विद्यार्थी, विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेसाठी दिलेल्या सूचनेनुसार वाफळकरवस्ती-बार्डी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत लोकसहभागातून सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहे. यामुळे शाळेचा परिसर सुरक्षित राहणार आहे. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वाफळकरवस्ती येथील शिक्षक व पालक नेहमीच विद्यार्थ्यांना भौतिक सुविधा मिळाव्यात, त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी प्रयत्न करीत असतात. ग्रामीण भागातील आडवळणी, दुर्गम भागात असलेल्या या शाळेत आतापर्यंत लोकसहभागातून अनेक भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी पालकांचे अनमोल योगदान लाभले आहे. त्यामध्ये शुध्द पिण्याच्या पाण्याचा फिल्टर, डिजिटल वर्गखोल्या, अद्यावत प्रज्ञाचक्षू वाचनालय, झेरॉक्स मशीन, लॅमिनेशन मशीन, शाळेची रंगरंगोटी, तारेचे कुंपण, ग्रामपंचतीच्या माध्यमातून शाळादुरुस्ती अशी कामे करण्यात आली आहेत. यासाठी वाफळकरवस्तीतील पालकांनी पुढाकार घेऊन सुविधा उपलब्ध करून दिल्या. शाळेतील विद्यार्थी, विद्यार्थिनींची गुणवत्तावाढ व विकासासाठी आम्ही सदैव प्रयत्न करत असून यापुढेही ते प्रयत्न चालूच राहतील. यापुढेही पालकांनी अशाच प्रकारचे सहकार्य करावे असे मनोगत मुख्याध्यापक किरण ढोबळे, सहशिक्षक ज्ञानेश्वर दुधाणे यांनी व्यक्त केले. या सर्व उपक्रमांसाठी शाळेचे अध्यक्ष रामदास माळी, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर वसेकर, पदाधिकारी पालक, ग्रामस्थांचे नेहमीच सहकार्य लाभते.




### अन्नछत्रामध्ये धर्म, धार्मिकतेचा संगम : योगानंद सरस्वती

**अक्कलकोट, दि. २२ सप्टेंबर-**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाकडून सुरु असलेले धार्मिक क्षेत्रातील कार्य केरळ राज्यापर्यंत पोहचले असून, येथे धर्म आणि धार्मिकतेचा संगम पाहायला मिळत असल्याचे मनोगत श्री नित्यानंद योगाश्रम कोंडेवूर मठ, कासरगुड (केरळ राज्य)चे श्री श्री योगानंद सरस्वती स्वामीजी यांनी व्यक्त केले. तीर्थक्षेत्र अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात आले असता न्यासाचे सचिव शामराव मोरे यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र व श्रीफळ देऊन मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला, यावेळी ते बोलत होते. यावेळी न्यासाचे एस. के. स्वामी, सिध्दाराम कल्याणी, बाळासाहेब घाडगे, सतीश महिंद्रकर, शहाजी यादव, नामा भोसले, निखील पाटील, प्रवीण घाडगे, विराज माणिकशेट्टी, आकाश कडबगांवकर, दत्ता माने, समर्थ घाटगे, धनंजय निंबाळकर, विठ्ठल रेड्डी उपस्थित होते.

### सुळेवाडी येथील अक्काताई सुळे-माने यांची शासकीय सेवेत निवड


**पिलीव, दि २२ सप्टेंबर-**



माळशिरस तालुक्यातील सुळेवाडी येथील अक्काताई रणजित सुळे-माने यांनी महाराष्ट्र नगरपरिषद करनिर्धारण व प्रशासकीय सेवेमध्ये दैदीप्यमान यश संपादन केले. त्यांचे दहावीपर्यंतचे शिक्षण पिलीव येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयात, अभियांत्रिकीमधील डिप्लोमा दहिवडी येथे तर अभियांत्रिकीची पदवी पुणे येथील मॉडर्न कॉलेज याठिकाणी पूर्ण केले. यानंतर त्यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेतल्या जाणाऱ्या स्पर्धा परीक्षेची तयारी सुरु केली. यामध्ये यशाने हुलकावणी दिली तरीही न डगमगता विविध स्पर्धा परीक्षेची तयारी केली. त्यात त्यांना यश आले. त्यांच्या यशाबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.

### ॲड. अशपाक मुलाणी यांची एसएफआयओपदी नियुक्ती

**मोहोळ, दि. २२ सप्टेंबर-**



केंद्रीय लोकसेवा आयोगाचा निकाल लागला. या निकालात देवडी (ता. मोहोळ) येथील ॲड. अशपाक शहाजान मुलाणी यांची मिनिस्ट्री ऑफ कॉर्पोरेट अफेयर्स या विभागात असिस्टंट डायरेक्टर (एसएफआयओ) यापदी नियुक्ती करण्यात आली. त्यांनी देश पातळीवर यूपीएससीमध्ये सातवा क्रमांक घेऊन यश संपादन केले. त्यांच्या या यशाबद्दल नातेवाईक आणि ग्रामस्थांकडून गौरव करण्यात आला.

### एसटी स्टँड कॉलनीतून दुचाकी लंपास

**सोलापूर, दि. २२ सप्टेंबर -**

एसटी स्टँड कॉलनी येथे पार्क करून ठेवलेली दुचाकी क्रमांक एमएच.१३.बीएफ.३३१८ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे.ही घटना १८ ते १९ सप्टेंबर दरम्यान घडली.याप्रकरणी दिनेश सिद्धाराम आलुरे (वय-३५,रा.सिद्धमोग नगर,शेळगी) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोलीस नाईक मुलाणी हे करीत आहेत.

# पंढरीत २० वर्षांपासून चातुर्मासात शिवचरित्राचे पाठ

**अनिलकाका बडवे महाराजांनी सुरु केला हा उपक्रम**

**ॲड. आशुतोष बडवे यांच्याकडून परंपरा कायम, ३० युवा कीर्तनकारांचा सध्या सहभाग**

**तभा वृत्तसेवा । महेश भंडारकवठेकर**
**पंढरपूर, दि. २२ सप्टेंबर-**

गेल्या २० वर्षांपासून येथील शिवचरित्राचे अभ्यासक अनिल बडवे महाराज हे चातुर्मासात आपल्या निवासस्थानी शिवचरित्राचा पाठ घेत होते. मात्र २०१७ पासून त्यांनी घेतलेला हा वसा त्यांचे पुत्र ॲड. आशुतोष बडवे हा सध्या पुढे चालवित आहेत. चातुर्मासात भजन, कीर्तनासह संत साहित्याच्या अभ्यासासाठी येथे वास्तव्यास असलेल्या तरुणांना छत्रपती शिवाजी महाराज यांच्या चरित्राचाही अभ्यास करता यावा, यासाठी बडवे पिता-पुत्र निःशुल्क हा उपक्रम राबवत आहेत.

सध्या २५ ते ३० युवा कीर्नकार याचा लाभ घेत आहेत. बडवे पित्रापुत्रांकडून प्रेरणा घेऊन राज्यातील दहा ठिकाणी शिवचरित्र सप्ताहाचे आयोजन केले जात आहे. सध्या चातुर्मासा निमित्त सुमारे ५०० तरुण पंढरपुरात वास्तव्यास आहेत. भजन, कीर्तन, धार्मिक ग्रंथांचे पाठ ऐकून ते त्यांचा अभ्यास करत आहेत. त्यांच्या निवासाची येथील विविध मठांमध्ये व्यवस्था आहे. त्यांच्या भोजनासाठी माधुकरी देण्याची व्यवस्थाही महाराज मंडळी व वारकरी सांप्रदायाविषयी आस्था असलेल्या मंडळींकडून केली जात आहे. दरम्यान आम्ही वैकुंठवासी आलो याच कारणासी। बोलिले जे ऋषी साचे भाव वर्ताया।। या भावनेने संतांनी धर्म जागृतीचे कार्य केले, तर त्यांच्या धर्मरक्षणासाठी शिवाजी महाराजांचे चरित्र समजून घेणे आवश्यक आहे. येथील मठ तसेच धर्मशाळांमधून श्री संत ज्ञानेश्वर महाराज, जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज आदी विविध संतांच्या साहित्याचा अभ्यास केलेले प्रवचनकार, कीर्तनकार तरुण नंतर आठ महिन्यांमध्ये राज्यभरात धर्मजागृतीचे कार्य करतात. त्यांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरित्राचाही परिपूर्ण अभ्यास असावा या हेतूने बडवे यांनी हा उपक्रम येथे सुरू केला. या चार्तुमासातील चार महिन्यांत रोज सकाळी आठ ते नऊ या वेळेत बडवे यांच्या निवासस्थानी हा उपक्रम चालतो. यात सहभागी तरुणही अतिशय उत्सुकतेने शिवचरित्रातील बारकाव्यांची माहिती घेतात, शिवाजी महाराज केवळ राजकारणी राजे नव्हते. ते ऋषिमुनी व संतसत्पुरुषांच्या विचाराने शासन चालवणारे आणि त्यांच्याच विचार व शिकवणुकीनुसार वागणारे चारित्र्यसंपन्न राज्यकर्ते होते, हे विजयसिंह देशमुख, वि. का. राजवाडे, बाबासाहेब पुरंदरे, गो. नी. दांडेकर आदी अभ्यासकांच्या साहित्याच्या आधारे बडवे त्यांना सांगतात.





#### खास प्रतिज्ञा, सहलींचे आयोजन

शिवचरित्र पाठातून घडलेल्या कीर्तनकारांसोबत बडवे पिता-पुत्र हे दरवर्षी कोजागिरी पौर्णिमेला रायगड, प्रतापगड, विशाळगड, पन्हाळा, सिंधुदुर्ग, विजापूर, बदामी आदी ऐतिहासिक स्थळांच्या सहलीचे आयोजन करतात. तेथे युवा कीर्तनकारांना कीर्तनात किमान पाच मिनिटे तरी छत्रपती शिवाजी महाराजाच्या जीवनचरित्राविषयी बोलेन, अशी प्रतिज्ञा दिली जाते.

#### शिवचरित्राचा अभ्यास आवश्यक

भारत जागतिक महासत्ता बनवायचा असेल तर छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरित्राचा परिपूर्ण अभ्यास केल्याशिवाय पर्याय नाही. त्यामुळे शिवचरित्र हे कीर्तनकार, प्रवचनकारां मार्फत सर्वांपर्यंत पोहोचावे यासाठी हा उपक्रम राबवत आहे.

**- अनिलकाका बडवे महाराज, पंढरपूर**

सध्या प्रत्यक्ष पाठाबरोबरच आधुनिक तंत्रज्ञानाच्या समृद्धतेचा फायदा घेत छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार प्रत्येकाच्या हृदयात वसावेत. महाराजांचे आदर्शव्रत जीवन तरुणपिढीला खरोखरच प्रेरणादायी ठरावे यासाठी तरुणांमध्ये क्रेझ असलेल्या सोशल मीडियाचा देखील वापर करुन आपण फेसबुकद्वारे लाईव्ह शिवचरित्राचे पाठ सादर करीत आहोत. याबरोबरच युट्युबवरदेखील शिवचरित्र पाठाचे आपले व्हिडिओ अपलोड करुन शिवचरित्राचा महाराष्ट्रात, आपल्या देशात नव्हे तर जगभरात जास्तीत जास्त प्रचार आणि प्रसार व्हावा यासाठी आपण प्रयत्नशील आहोत.

**- ॲड. आशुतोष बडवे, पंढरपूर**

# अक्कलकोटमध्ये आज वंध्यत्व निवारण शिबीर

**डॉ. मीनल चिडगुपकर** | **हिरकणी बहुउद्देशीय संस्थेचा महिलांसाठी उपक्रम**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २२ सप्टेंबर-**

वंध्यत्व निवारणसाठी काम करणारी ॲपोलो फर्टिलिटी, सोलापूर व श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाची सहयोगी संस्था असलेल्या हिरकणी महिला बहुउद्देशीय संस्था, श्रीक्षेत्र अक्कलकोट यांच्या संयुक्त विद्यमाने निःशुल्क वंधत्व निवारण शिबीर व स्त्री आरोग्य आणि वंध्यत्व या विषयावर व्याख्यान व तपासणीचे आयोजन सोमवारी २३ सप्टेंबर रोजी सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत न्यासाच्या यात्री निवासातील हॉलमध्ये करण्यात आल्याची माहिती जेष्ठ स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. मीनल चिडगुपकर यांनी दिली.

हिरकणी महिला बहुउद्देशीय संस्थेच्या संस्थापिका अध्यक्षा अलकाताई भोसले यांच्या अध्यक्षतेखाली, उपाध्यक्षा रत्नमाला मचाले, सचिवा अर्पिताराजे भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीत या शिबिराचे उद्घाटन होणार आहे. सदर शिबिरात नोंदणी केलेल्यांना मोफत स्कॅन धातू तपासणी करण्यात येणार आहे. अतिशय माफक दरात जाणून घ्या तुमचा फर्टिलिटी स्कोर. या शिबिरात एक वर्षापेक्षा जास्त काळ लग्न झालेले आणि अद्याप गर्भधारणा न झालेले जोडपे, जर वय ३० वर्ष अधिक असेल आणि गर्भधारणा झालेली नसेल, अनियमित मासिक पाळी असलेल्या आणि पाळी येत नसलेल्या किंवा जास्त रक्तस्त्राव होत असलेल्या स्त्रिया, नैसर्गिकरीत्या गर्भधारणा होण्यास सक्षम नसलेल्या स्त्रिया, १ किंवा त्यापेक्षा जास्त गर्भपात झालेल्या किंवा प्रेग्नन्सी लॉस झालेल्या स्त्रिया व पुरुषांनी उपस्थित राहण्याचे आवाहन ॲपोलो सेंटर सोलापूरचे व्यवस्थापक डॉ. कीर्ती बालाजी कटारे यांनी केले आहे. या शिबिराच्या नोंदणीसाठी मो : ९१५४८२५६५२, ८८३०७६२००६ यावर संपर्क साधावा.

#### भरीव योगदान

अखिल भारतामध्ये धार्मिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करीत असलेल्या श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ यांची सहयोगी संस्था म्हणून हिरकणी महिला बहुउद्देशीय संस्थेची स्थापना ही स्व. गानसम्राज्ञी भारतरत्न लता मंगेशकर यांच्या प्रेरणेने व आधारस्तंभ जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले आणि विशेष सहकार्याने झाली आहे. न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली बहुउद्देशीय संस्थेच्या संस्थापिका अध्यक्षा अलकाताई भोसले, सचिवा अर्पिताराजे भोसले यांचे महिला सबलीकरण व सक्षमीकरण या उद्देशाने सामाजिक क्षेत्रात भरीव योगदान करत आहे.



# मौलाना आझाद महामंडळाचा लाभ घेण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. २२ सप्टेंबर-**

मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ जिल्हा कार्यालयात २१ सप्टेंबर ते ५ ऑक्टोबरदरम्यान अर्ज स्वीकारण्यात येत असल्याने गरजू लाभार्थ्यांनी लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी जिल्हा कार्यालयाशी संपर्क साधावा असे आवाहन मौलाना आझाद विचार मंचचे जिल्हा अध्यक्ष इस्माईल पटेल यांनी केले आहे.



महाराष्ट्र राज्यातील अल्पसंख्याक बांधवांचे मागासलेपण दूर करुन त्यांच्या सर्वांगिण विकासासाठी बार्टी धर्तीवर मार्टीला कॅबिनेटची मंजुरी अल्पसंख्याक संशोधन व प्रशिक्षण संस्था म्हणजे एमआरटीआयची स्थापना करण्याचा राज्य कॅबिनेट मंत्रिमंडळाने निर्णय घेतला. त्यात महाराष्ट्र राज्यातील मुस्लिम तसेच अल्पसंख्याक बांधवांच्या विकास योजनांना गती देण्यासाठी अल्पसंख्याक समाजाचे नेते खा. हुसेन दलवाई यांचा सतत पाठपुरावा व उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार सातत्याने प्रयत्नशील होते. मुस्लिम अल्पसंख्यांक समाज बांधवाचा मागासलेपणाचा अभ्यास करण्यासाठी, प्रशिक्षणासाठी एकूण ६ कोटी २५ लाख रुपयांच्या खर्चासही मंत्रिमंडळाने मान्यता दिल्याने महाराष्ट्र राज्यातील मुस्लीम समाज बांधव तसेच अल्पसंख्यांक मुख्य प्रवाहात येऊन त्यांचा सर्वांगिण विकासाला चालना मिळावी म्हणून मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ राज्य शासनाकडून भागभांडवल स्वरुपात प्राप्त होणाऱ्या निधीतून मौलाना आझाद शैक्षणिक कर्ज योजना राबविण्यात येते. तसेच राष्ट्रीय अल्पसंख्यांक विकास एवं वित्त निगम नई दिल्ली यांच्याकडून कर्ज स्वरुपात प्राप्त होणाऱ्या प्राप्त होणाऱ्या रकमेतून मुदत कर्ज योजना, सूक्ष्म पतपुरवठा योजना व डॉ. एपीजी अब्दुल कलाम शैक्षणिक कर्ज योजना राबविण्यात येत असून, या सर्व कर्ज योजनेंतर्गत नव्याने अर्ज स्वीकारले जात असल्यान ऑनलाईन अर्ज वर्षभर स्वीकारण्यात येत आहे.

# आलुरे गुरुजी सेवक पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**अणदूर, दि. २२ सप्टेंबर-**

शिक्षणमहर्षी सि. ना. आलुरे गुरुजी सेवकांची सहकारी पतसंस्था मर्या.अणदूर ची ५६ वी सर्वसाधारण सभा उत्साहात पार पडली.

अध्यक्षस्थानी चेअरमन राजकुमार ठोंबरे होते. यावेळी माजी जि. प. सदस्य महादेव आलुरे, महाविद्यालय विकास समिती सदस्य मारूतीराव खोबरे, मुख्याध्यापक गोपाळ कुलकर्णी होते. सर्वसाधारण सभेत सुरूवातीला सचिव मकरंद पाटील यांनी गत आर्थिक वर्षातील अहवाल वाचन केले. सचिव मकरंद पाटील व चेअरमन राजकुमार ठोंबरे, व्हाईस चेअरमन अनिता मुदकण्णा यांनी सभासदांच्या प्रश्नांना उत्तरे दिली. सभासदांना अल्प व्याजदराने कर्ज पुरवठा करणारी पतसंस्था म्हणून तालुक्यात लेखापरीक्षण 'अ' श्रेणी प्राप्त पतसंस्था आहे.



पुढील काळात पतसंस्थेच्या वतीने सभासदांना विविध ऑनलाईन व्यवहार सुविधा, ई-बँकिंग सुविधा उपलब्ध करून देणे, कर्ज मर्यादा वाढविणे, विहित मुदतीत शैक्षणिक, वैद्यकीय कर्जास प्राधान्य देण्याबाबत, पतसंस्थेचे भागभांडवल वाढविण्यासाठी ठेव, मासिक शेअर्स वाढविण्याबाबत, संगणकीकृत व्यवहार करण्याबाबत या बाबींवर सविस्तर चर्चा झाली. चेअरमन ठोंबरे म्हणाले की, शिक्षणमहर्षी सि. ना. आलुरे गुरूजी यांनी पतसंस्था सुरू केली आणि आज पतसंस्थेचे नाव शिक्षणमहर्षी सि. ना. आलुरे गुरूजी सेवकांची सहकारी पतसंस्था मर्या, अणदूर केल्याबद्दल अभिनंदनांचा ठराव घेण्यात आला. अगदी कमी खर्चात पतसंस्थेचे कामकाज सुरळीतपणे चालू आहे. लेखनिक व सचिवांनी कामकाजात विश्वासार्हता प्राप्त केली आहे.

सभासदांचे हित लक्षात घेऊन वेळोवेळी सर्व नियम केले जातात. कर्ज मागणी अर्ज प्राप्त झाल्याबरोबर पतसंस्थेकडे न येता आपल्या बँक खात्यावर पैसे पाठविणारी तालुक्यातील एकमेव पतसंस्था असल्याचे त्यांनी सांगितले. सूत्रसंचालन मकरंद पाटील यांनी तर आभार प्रवीण गुरव यांनी मानले.

# काळजी घ्या, हाडांच्या व्याधी टाळा

**डॉ. पराग संचेती** | **अकलूज येथील शिबिरात आवाहन**

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २२ सप्टेंबर-**

सध्याच्या धावपळीच्या जीवनात हाडांचे आजार हा जिव्हाळ्याचा विषय बनला आहे. विशेषतः ज्येष्ठ व्यक्तींना हाडांच्या अनेक समस्या उद्भवतात. वय वाढताना या समस्या वाढू नयेत यासाठी काळजी घेतली, तर हे आजार टाळता येणे शक्य असल्याचे मत संचेती हॉस्पिटलचे डॉ. पराग संचेती यांनी व्यक्त केले.

अकलूज येथील डॉ. इनामदार हॉस्पिटल येथे आयोजित हाडाच्या शिबिरासाठी ते अकलूजला आले होते, यावेळी ते बोलत होते. वैद्यकीय क्षेत्रात कार्यरत असताना प्रत्येकाने सेवाभाव ठेवला पाहिजे. रुग्ण सेवा हीच ईश्वर सेवा हे ब्रीद वाक्य ठेवून आम्ही कार्यरत आहोत. पाठीच्या शस्त्रक्रियेच्या मानसिक भीतीपासून मुक्त होणे अत्यावश्यक आहे. कदाचित माहित नसेल, परंतु बहुतेक सामान्य मणक्याच्या शस्त्रक्रियांमध्ये पाठीचा कणा समाविष्ट नसतो. आजची अत्याधुनिक शस्त्रक्रिया उपकरण, इमेजिंग उपकरणे आणि मॉनिटरिंग उपकरणे सर्जनला मणक्यामध्ये अभूतपूर्व प्रवेश आणि दृश्ये प्रदान करतात. ज्यामुळे मणक्याची शस्त्रक्रिया पूर्वीपेक्षा अधिक सुरक्षित होते. पाठदुखी टाळण्यासाठी शस्त्रक्रिया आणि जीवनशैलीतील बदलांबद्दलची भीती दूर करण्यासाठी जनजागृती करण्याची गरज आहे. पाठीच्या दुखण्यावर बराच काळ उपचार न केल्यास स्पाइनल स्टेनोसिससारख्या परिस्थिती विकसित होतात. वारंवार पाठदुखीसाठी इतर अनेक घटक जबाबदार आहेत, असे संचेती हॉस्पिटलचे प्रसिद्ध मेंदू व मणका विकार तज्ज्ञ डॉ. शैलेश हादगावकर यांनी सांगितले. यावेळी डॉ. एम. के. इनामदार, डॉ. संजय सिद, डॉ. संतोष खडतरे, डॉ. शिंदे आदी उपस्थित होते.



# मुख्यमंत्री वयोश्री, तीर्थ दर्शन योजना ज्येष्ठांसाठी आधाराची काठी

**सांगोला नगरपरिषदेचे मुख्याधिकारी डॉ. सुधीर गवळी यांचे लाभ घेण्याचे आवाहन**

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२२ सप्टेंबर-**

सांगोला शहरातील ज्येष्ठ नागरिकांनी मुख्यमंत्री वयोश्री व तीर्थ दर्शन योजनांचा लाभ घ्यावा असे आवाहन नगरपरिषदेचे मुख्याधिकारी तथा प्रशासक डॉ. सुधीर गवळी यांनी केले आहे.

सर्व धर्मातील ज्येष्ठ नागरिक जे ६० वर्षे व त्याहून अधिक वयाचे आहेत, त्यांना राज्य आणि भारतातील तीर्थक्षेत्रांना मोफत भेटीची, दर्शनाची संधी देण्यासाठी मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना सुरू करण्यात आली आहे.तसेच ६५ वर्षे वय व त्यावरील ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या दैनंदिन जीवनात सामान्य स्थितीत जगण्यासाठी आणि त्यांना वयोमानापरत्वे येणाऱ्या अपंगत्व, अशक्तपणा यावर उपाययोजना करण्यासाठी आवश्यक सहाय्य साधने, उपकरणे खरेदी करण्याकरिता तसेच मनःस्वास्थ केंद्र, योगोपचार केंद्र याद्वारे त्यांचे मानसिक स्वास्थ अबाधित ठेवण्यासाठी मुख्यमंत्री वयोश्री योजना राबविण्यात येत आहे. या योजनेमध्ये चष्मा, श्रवणयंत्र, ट्रायपॉड स्टिक, व्हील चेअर, फोल्डिंग वॉकर, कमोड खुर्ची, नि-ब्रेस, लंबर बेल्ट, सर्वाइकल कॉलर इत्यादी उपकरणांपैकी एका उपकरणाच्या खरेदीसाठी शासनामार्फत तीन हजार रुपयांचे अर्थसहाय्य मिळणार आहे. सांगोला नगरपरिषदेमार्फत अर्ज स्विकारण्याची प्रक्रिया सुरू झाली असून नगरपरिषद कार्यालयातून अर्ज प्राप्त करावेत.सदर योजनेच्या अधिक माहितीसाठी सांगोला नगरपरिषदेचे कर निरीक्षक रोहित गाडे व सचिन पाडे यांच्याशी संपर्क साधावा,असे आवाहन डॉ.सुधीर गवळी यांनी केले आहे.

#### मुख्यमंत्री वयोश्री योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे

आधार कार्ड, मतदान कार्ड, पासपोर्ट आकाराचे दोन फोटो, ६५ वर्षे पूर्ण असल्याबाबतचा पुरावा, आर्थिक वर्षातील दोन लक्ष रुपयांच्या आतील स्वयंघोषणापत्र, अर्जदाराचे बँकेच्या पासबुकची झेरॉक्स, अर्जदाराला उपकरणाची आवश्यकता असल्याबाबतचा डॉक्टरांचा तपासणी अहवाल



#### मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे

आधारकार्ड, रेशनकार्ड, महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र, महाराष्ट्र राज्यातील जन्म दाखला, सक्षम प्राधिकारी यांनी दिलेला कुटुंब प्रमुखांचा उत्पन्नाचा दाखला (वार्षिक उत्पन्न रुपये २.५० लाखापर्यंत असणे अनिवार्य) किंवा अंत्योदय अन्न योजना, प्राधान्य कुटुंब योजना, वार्षिक उत्पन्न रु.२.५० आत असलेले मात्र प्राधान्य कुटुंब नसलेले शिधापत्रिकाधारक, वैद्यकीय प्रमाणपत्र, पासपोर्ट आकाराचा फोटो, जवळच्या नातेवाईकाचा मोबाईल नंबर, सदर योजनेच्या अटी-शर्तीचे पालन करण्याबाबतचे हमीपत्र.

## शेतकरी सहकारी सूतगिरणीची उद्या सर्वसाधारण सभा

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. २२ सप्टेंबर -**



डॉ. भाई गणपतराव देशमुख शेतकरी सहकारी सूतगिरणी मर्यादित, सांगोले या संस्थेच्या अधीमंडळाची ४५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा मंगळवारी २४ सप्टेंबर रोजी दुपारी १ वाजता संस्थेच्या कामगार भवन येथे आयोजित केली आहे, अशी माहिती संस्थेचे चेअरमन डॉ. प्रभाकर माळी यांनी दिली. या सभेस सभासदांना वेळेवर उपस्थित राहता यावे याकरीता महात्मा फुले चौक, सांगोला येथून मंगळवारी सकाळी १० वाजल्यापासून वाहनांची व्यवस्था केलेली आहे. वार्षिक सर्वसाधारण सभेस संस्थेच्या सर्व सभासद बंधू-भगिनींनी वेळेवर उपस्थित रहावे असे आवाहन संस्थेचे चेअरमन डॉ. प्रभाकर माळी यांनी केले आहे.

## संक्षिप्त वृत्त...



### मेथवडेतील सह्याद्री फार्मसी कॉलेजची फार्माकोव्हिजिलन्स सप्ताह रॅली जल्लोषात

**सांगोला, दि.२२ सप्टेंबर-**

फार्माकोव्हिजिलन्स सप्ताहनिमित्त मेथवडे येथील सह्याद्री कॉलेज ऑफ फार्मसीतर्फे खर्डी (ता. पंढरपूर) येथे रॅली काढण्यात आली. उद्घाटन संस्थापक अध्यक्ष डॉ. दिलीपकुमार इंगवले, सरपंच मनीषा सवासे, उपसरपंच शरद रोंगे, सोसायटी चेअरमन मोहन रोंगे, तंटामुक्ती समिती अध्यक्ष मिनानाथ खताळ, ग्रामपंचायत सदस्य डॉ. शहाजी साबळे, नारायण रोंगे, दाजी चंदनशिवे, मिनाज पठाण, सत्यवान फाळके, प्राचार्य डॉ. मनोजकुमार पाटील यांनी केले. विद्यार्थिनी प्रज्ञा सावंत, स्वाती पोळ, प्राजक्ता पवार, साक्षी पवार, श्रद्धा पवार, साक्षी शिंदे, वैभवी मासाळ, संगमित्रा जगधने, अपूर्वा स्वामी, सोनाली वाले, स्नेहल आवताडे, शीतल चव्हाण, नियती काटकर, अस्मिता बिले, प्रगती भुई, स्वाती बर्गे, अर्पिता आवताडे, भारती मोटे, सानिका लेंडवे, संकेत बाबर, सुरज हजारे यांनी संदेश फलके तयार केली होती. रॅली यशासाठी डॉ. एन. ए. तांबोळी, प्रा. एस. जे. करचे यांचे योगदान लाभले. आभार प्रा. एस. पी. जोकार यांनी मानले.




### बार्शीतील परसबाग स्पर्धेचा निकाल जाहीर

**बार्शी, दि.२२ सप्टेंबर-**

लायन्स क्लब बार्शी रॉयल व तिरुपती ग्रो एजन्सजी बार्शी यांच्या संयुक्त विद्यमानाने विषमुक्त परसबाग स्पर्धा घेण्यात आली. याचे बक्षिस वितरण करण्यात आले. लायन्स क्लब बार्शी रॉयल व तिरुपती ग्रो एजन्सी बार्शी गेल्या चार वर्षांपासून सामाजिक कार्यात सतत नाविन्यपूर्ण उपक्रमाचे आयोजन करत असतात. उत्तेजनार्थ तीन बक्षिसाला मंगेश बागुल यांच्याकडून उत्तेजनार्थ बक्षीस देण्यात आले. यामध्ये सुमन चौधरी, सुजाता मुक्के, कल्पना सोमावार यांना बक्षीस देण्यात आले. संजय खांडवीकर यांच्याकडून पहिले बक्षीस पैठणी साडी शोभा घुटे, दुसरी साडी अलका माळी, तिसरी बेंगलोर सिल्क साडी सुवर्णमाला काशीद यांना देण्यात आली. एमजेएफ चेतना होमकर, एमजेएफ माजी प्रांतपाल लायन जितेंद्र माढेकर, एमजीएफ रिजन चेअरमन लायन राहुल माढेकर उपस्थित होते. या स्पर्धेचे आयोजन करणारे प्रोजेक्ट चेअरमन मंगेश बागुल, लायन्स क्लब बार्शी रॉयलचे अध्यक्ष वर्षा खांडवीकर, सेक्रेटरी लायन अमृता गुंडेवार, सचिव लायन राजुल कांकरिया उपस्थित होते.



### मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीवर मार्गदर्शन

**बार्शी, दि.२२ सप्टेंबर-**

मुख्यमंत्री श्री.एकनाथ शिंदे, खा. डॉ. श्रीकांत शिंदे व मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षप्रमुख मंगेश चिवटे यांच्या मार्गदर्शनाखाली राम हरी राऊत कक्षप्रमुख महाराष्ट्र यांचा आरोग्य वारीच्या माध्यमातून दौरा सोलापूर-बार्शी येथे आले असता, पत्रकार परिषद घेऊन मुख्यमंत्री सहायता निधीतून योजना संबंधित आजारांचा समावेश व मुख्यमंत्री सहाय्यता निधी कशा प्रकारे मिळवावा यासंबंधी महिती दिली. सर्वसामान्य गरजूंना मदत मिळावी. रामहरी राऊत यांचा नियोजित बार्शी दौरा होता, यावेळी त्यांनी मार्गदर्शन केले. यावेळी सांगली जिल्हा समन्वयक गौरव गुळवणी, जिल्हा समन्वयक सूरज जम्मा, डॉ. रणजीत काकडे, शहर समन्वयक अनिल जैंद, बार्शी तालुका समन्वयक विजय माने, उमेश रजपूत, पांडुरंग पाटील, लक्ष्मण माळी उपस्थित होते.

# जरांगे-पाटलांच्या उपोषणाला पाठिंबा

## करमाळ्यात कडकडीत बंद

**● बाईक रॅली काढून दिले तहसील कार्यालयाला निवेदन**

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. २२ सप्टेंबर-**



मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण मिळवे यासाठी मनोज जरांगे पाटील अंतरवाली सराटी येथे उपोषणाला बसले आहेत.उपोषणाला सहा दिवस झाले तरी सरकार आवश्यक पावले उचलत नाही. या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी मराठा क्रांती मोर्चा व सकल मराठा समाज करमाळा यांच्यावतीने रविवारी करमाळा बंद पुकारण्यात आला.

लोकांनी आपली दुकाने स्वेच्छेने बंद ठेवली. यावेळी तरुणांनी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथून सकाळी दहा वाजता मोटार सायकल रॅली काढून तहसील कार्यालयात निवेदन दिले. या रॅलीत सर्वधर्मीय युवक सहभागी झाले होते संपूर्ण शहरात शांततेत हा बंद पार पडला. तहसील कार्यालयास दिलेल्या निवेदनात मराठा क्रांती मोर्चा व सकल मराठा समाज करमाळा तालुका यांच्या वतीने खालील मागण्या मांडण्यात आल्या.मनोज जरांगे-पाटील यांनी मागणी केलेली सगेसोयरे संबंधीची तात्काळ अंमलबजावणी करा, मराठा विद्यार्थी-विद्यार्थीनींना शैक्षणिक सवलती, वसतिगृह भत्ता मिळण्याबाबत विद्यापीठांना तात्काळ आदेश देण्यात यावेत, कुणबी नोंदी सापडलेल्या बांधवांना विनाअडथळा दाखले देण्यात यावेत, मराठा समाजाला घटनात्मक कक्षेत बसणारे आरक्षण द्यावे, दाखल खोटे गुन्हे मागे घ्यावेत, सारथी व आण्णासाहेब पाटील महामंडळाची कार्यक्षमता वाढवावी, जात पडताळणी प्रमाणपत्रे तात्काळ द्यावी, तहसील कार्यालय व प्रांत ऑफिस येथून कुणबीचे प्रमाणपत्र सुलभ पध्दतीने देण्यात यावे सोलापुरातील मराठा वसतिगृह लवकरात लवकर चालू करावे, अशा मागण्या आहेत.

**इतर समाजांचाही सहभाग**

उपोषणादरम्यान संघर्षयोध्दा मनोज जरांगे-पाटील यांच्या प्रकृतीस काही कमी-जास्त झाल्यास यास शासन जबाबदार राहिल, असा इशाराही या निवेदनाद्वारे देण्यात आलेला आहे. मराठा समाजाच्या आरक्षणाच्या मागणीसाठी शहरातील सकल मुस्लिम समाज तसेच जैन संघटना, करमाळा यांनीही पाठिंबा दर्शवत बाईक रॅलीत सक्रिय सहभाग नोंदवला. मराठा समाजासह बहुजन समाज बांधवांची या रॅलीला उपस्थिती होती.

## मराठा आरक्षणासाठी जेऊर येथे कडकडीत बंद

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि.२२ सप्टेंबर-**



मराठा आरक्षणाच्या पार्श्वभूमीवर मराठा क्रांती मोर्चा व सकल मराठा समाज व जेऊर ग्रामस्थ तसेच सर्व बहुजन समाज बांधवांनी जेऊर येथे कडकडीत बंद पाळण्यात आला.

मराठा आरक्षण प्रश्न सरकारने आश्वासित केल्याप्रमाणे सगे-सोयरे अध्यादेशाचे कायद्यात रूपांतर करावे व लवकरात लवकर अंमलबजावणी करावी. या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांचे अंतरवाली सराटी येथे आमरण उपोषण सुरू आहे. वारंवार उपोषणे केल्याने शरीर साथ देत नाही आणि सरकार त्यांच्या जीवाची परीक्षा घेत आहे.त्यांना पाठिंबा देण्यासाठी मराठा बांधवांनी २२ सप्टेंबर रोजी बंदची हाक दिलेली होती सकल मराठा समाजाने केलेल्या आव्हानाला मोठ्या संख्येने व सक्रिय पणे जेऊर ग्रामस्थ व व्यापारी वर्गाने १००% पाठिंबा देत कडकडीत बंद पाळला.

**आजच्या जेऊर बंदमध्ये बार्शी तालुक्याचे आ. राजेंद्र राऊत यांचा जाहीर निषेध करतो. गरजवंत मराठ्यांच्या आरक्षणासाठीच्या या लढ्यामध्ये चमकोगिरी करणाऱ्या पुढाऱ्यांनी बेताल वक्तव्य करू नयेत.**

**- नितीन खटके,**
कार्याध्यक्ष, संभाजी ब्रिगेड, पुणे विभाग

## धनगडचे दाखले रद्द करा; अन्यथा पाणीही बंद करणार

**उपोषणकर्त्यांचा इशारा**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २२ सप्टेंबर-**



मागील ७० वर्षांपासून प्रलंबित असणारा धनगर समाजाचा एसटी आरक्षण अंमलबजावणीचा प्रश्न उद्याच सुटावा व आमरण उपोषण स्थगित व्हावे यासाठी धनगर समाजाचा वकील म्हणून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना भेटून तात्काळ निर्णय घ्यावा, यासाठी प्रयत्न करणार असल्याचे आ. शहाजीबापू पाटील यांनी सांगितले. दरम्यान उपोषकर्त्यांनी धनगडचे दाखले रद्द करा अन्यथा पाणी प्राशनही बंद करण्याचा इशारा दिला आहे.

पंढरपूर येथील टिळक स्मारक मैदानावर दिनांक ९ फेब्रुवारीपासून धनगर समाजाच्या एसटी आरक्षणाच्या अंमलबजावणी करण्यासाठी सुरू असलेल्या उपोषणाचा १४ वा दिवस असून या सहा तरुणांना भेटून प्रकृतीची चौकशी करण्यासाठी आणि पाठिंबा पत्र देण्यासाठी आ. शहाजीबापू पाटील आले होते. त्यावेळी ते म्हणाले की, दऱ्या खोऱ्यात, रानावनात आपल्या मेंढ्या घेऊन फिरणारा धनगर समाज हा माझ्या मतदारसंघात बहुसंख्येने असून मला त्यांच्या परिस्थितीची जवळून जाणीव आहे. स्वातंत्र्यापासून हा प्रलंबित पडला आहे. परंतु मुख्यमंत्री हे संवेदनशील असून त्यांनी संभाजीनगर जिल्ह्यातील फुलंब्री तालुक्यातील खिल्लारे कुटुंबाचे जे खाडाखोड करून मिळविलेले ‘धनगड’ नावाचे दाखले रद्द करण्याचा निर्णय घेणार असल्याचे सांगितले आहे. तो रद्दचा आदेश तात्काळ व्हावा व मागील अनेक वर्षापासून चा प्रश्न सुटावा यासाठी मी उद्या मुख्यमंत्र्यांना भेटून हा प्रश्नांची सोडवणूक होऊन निश्चित मार्ग काढणार असल्याचे आ. पाटील यांनी सांगितले.

**सकल मराठा समाजाचा धनगर समाजाला पाठिंबा**

जिल्ह्यातील सकल मराठा समाजाच्या वतीने एसटी आरक्षण अंमलबजावणीसाठी आमरण उपोषणास बसलेल्या आंदोलन लढ्यास सोलापूर जिल्ह्यातील सकल मराठा समाजाचा पाठिंबा पत्र पंढरपूरचे माजी उपनगराध्यक्ष नागेश भोसले यांच्या नेतृत्वाखाली देण्यात आले.

**उशिरा भेट दिल्याबद्दल व्यक्त केली दिलगिरी**

मागील काही दिवसांपासून मी आजारी असून दवाखान्यात ॲडमिट होतो. परंतु माझे लक्ष उपोषणकर्त्यांच्या प्रकृतीकडे सतत होते. मी प्रसार माध्यमाच्या माध्यमातून ते पाहत होतो. कार्यकर्त्यांकडे चौकशी करीत होतो. त्यामुळे आंदोलनस्थळी येण्यास मला उशीर झाला त्याबद्दल मी समाजाची माफी मागतो, असे आ. शहाजीबापू पाटील यांनी सांगितले.

## संत ज्ञानदेवांचे ७५० वे जन्मवर्ष ज्ञानोत्सव म्हणून साजरा करा

**● योगी निरंजननाथ यांचे आवाहन**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२२ सप्टेंबर-**

२५ हे वर्ष संत ज्ञानदेवांचे ७५० व्या जन्मोत्सवाचे वर्ष असून हे वर्ष ज्ञानोत्सव म्हणून राज्यभर साजरे करावे व त्यासाठी राष्ट्रीय महामार्ग महामंडळाच्या माध्यमातून महामार्गावर संत ज्ञानदेवांचे बोधचिन्ह व सविस्तर माहिती फलक लावावा अशी मागणी संत ज्ञानेश्वर महाराज देवस्थानचे विश्वस्त योगी निरंजननाथ यांनी केंद्रीय रस्ते व वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे केली.

आळंदी देवस्थान समितीचे विश्वस्त योगी निरंजननाथ आणि डॉ. भावार्थ देखणे यांनी आज केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन बोधचिन्हाचे प्रकाशन केले व त्यांच्याशी संवाद साधला.



योगी निरंजननाथ म्हणाले, पालखी महामार्ग व पालखी सोहळा व्यवस्थापन समितीसमवेत किमान दोन महिन्यांतून एकदा राष्ट्रीय महामार्ग अधिकाऱ्यांशी बैठक घेऊन त्यावर आढावा तयार असावा. दिवेघाटातील ज्या कार्याचे शनिवारी भूमिपूजन संपन्न झाले, त्याबद्दल विस्तृत बैठक आवश्यक आहे.

## धनगर समाज आरक्षणासाठी आ. राम सातपुतेंचा पुढाकार

**तभा वृतसेवा,**
**पिलीव, दि २२ सप्टेंबर-**



धनगर समाजाच्या आरक्षण मागणीसाठी आ. राम सातपुते यांनी पुढाकार घेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे मागणी केली आहे.

महाराष्ट्रात कुठेही धनगड नाहीत. महाराष्ट्र शासनाच्या प्रतिज्ञापत्राप्रमाणे धनगर समाजाचा अनुसुचित जमातीमध्ये समावेश करणे योग्य आहे. या मागणीसाठी पंढरपूर, लातूर, नेवासा याठिकाणी १४ दिवसांपासून आमरण उपोषणाला बसले आहेत. धनगर समाज बांधवाच्या या मागणीस माझा पाठींबा असून शासनाने धनगर समाजाच्या अनुसुचित जमातीमध्ये समावेशाच्या मागणीची ताबडतोब अमंलबजावणी करावी, अशी मागणी माळशिरस तालुक्याचे आ. रामभाऊ सातपुते यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे.

## वीरशैव लिंगायत संस्कार केंद्र दिशादर्शक ठरेल : पाटील

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. २२ सप्टेंबर-**



वीरशैव लिंगायत जंगम कन्नड संस्कारांतून अध्यात्मिक पिढी घडणार आहे. या पिढीकडून वीरशैव लिंगायत समाजाचा आचार, विचार आणि संस्काराचा प्रसार आणि प्रचार होणार आहे. हे संस्कार केंद्र समाजाला दिशादर्शक ठरेल, असे प्रतिपादन सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक आप्पासाहेब पाटील-वडकबाळकर यांनी केले आहे.

सोलापूर येथील वीरशैव महेश्वर वैदिक मंडळ, संचलित वीरशैव लिंगायत जंगम कन्नड संस्कार केंद्राचे बांधकाम सुरू असून यासाठी अप्पासाहेब पाटील-वडकबाळकर यांनी एक लाखाची देणगी दिली. यावेळी त्यांच्या हस्ते भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले यावेळी ते बोलत होते. यावेळी शिवयोगी शास्त्री होळीमठ, बसवराज शास्त्री पुराणिक, नंदकिशोर हिरेमठ, विद्यानंद स्वामी, विजयकुमार मुलगे आदी उपस्थित होते. पाटील म्हणाले की, वीरशैव लिंगायत समाजावर धार्मिक संस्कार आणि धार्मिक विधी,पूजा,पाठ करण्याची जबाबदारी जंगम समाजावर असते. त्यामुळे जंगम बटूंना उत्तम धार्मिक संस्कार देण्यासाठी संस्कार केंद्राची गरज होती. ही गरज वीरशैव महेश्वर वैदिक मंडळ सोलापूर पूर्ण करीत आहे, हा उपक्रम कौतुकास्पद आहे. वीरशैव माहेश्वर लिंगायत वैदिक मंडळाकडून विविध सामाजिक व धार्मिक उपक्रम राबविले जाते, हे कौतुकास्पद आहे. येणाऱ्या काळातही आपण या संस्कार केंद्राच्या अडचणी सोडविण्यासाठी कटिबद्ध आहोत, अशी ग्वाही पाटील यांनी दिली.

## शेटफळमधील नाईकनवरेंच्या घरात चक्क रानपक्षी ब्राह्मणी मैनेने थाटला संसार

**● छोट्या विराजचे पक्षीप्रेम; परिसरात कुतूहलाचा विषय, चार वर्षांपासून एकाच ठिकाणी वास्तव्य**

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. २२ सप्टेंबर-**

शेटफळ (ता. करमाळा) येथील नाईकनवरे यांच्या घरात चक्क थाटला रानपक्षी ब्राह्मणी मैनेने आपला संसार. छोट्या विराज नाईकनवरेला या पक्षांचा चांगलाच लळा लागला असून दररोज त्यांच्या वेगवेगळ्या कृतींचे निरीक्षण करून या पक्षांच्या जीवनक्रमाचा त्याने अभ्यास केला आहे.

निसर्गामध्ये आढळणारे अनेक रानपक्षी मानवी वस्तीपासून सुरक्षित अंतरावरच राहणे पसंत करतात. माणसापासून त्यांना कायमच असुरक्षितता वाटत आलेली आहे. चिमणी, कावळा, पोपट यासारखे ठराविक पक्षी लोक वस्तीमध्ये वास्तव्य करत असले तरी अनेक रानपक्षांना माणसांचा सहवास नकोच वाटतो. असाच एक पक्षी म्हणजे ब्राह्मणी मैना किंवा तिला भांगपाडी मैना असेही संबोधले जाते.

> ब्राह्मणी मैना हा फारच देखणा पक्षी आहे. तिच्या डोक्यावर केसाचा तुरा असतो. तो भांग पाडलेल्या केसासारखा दिसतो. त्यामुळे तिलाच भांगपाडी मैना असेही म्हटलं जातं. जून, जुलै हा या पक्षांचा विणीचा हंगाम असतो. माझ्या परिचयाचा नाईकनवरे परिवार हा निसर्गप्रेमी परिवार आहे. त्यांच्या शेतातील घर हे अनेक पक्षी, पाळीव प्राणी यांचे आश्रयस्थान आहे. कदाचित त्यांच्या घरात या पक्षांना सुरक्षित वातावरण वाटले असेल.
>
> **- कल्याणराव साळुंके,** पक्षी अभ्यासक, कुंभेज

याच ब्राह्मणी मैनेने शेटफळ येथील प्रशांत नाईकनवरे यांच्या शेतातील घराच्या पोर्चमधील कृत्रिम घरट्यात आपला संसार थाटला आहे. गेली चार वर्षे या पक्षाची जोडी त्यांनी लावलेल्या कृत्रिम घरट्यामध्ये काही दिवस वास्तव्य करून आपली वीण पूर्ण करतात. या काळात त्यांचा लहान आठवीत शिकणारा मुलगा विराज याला दररोज या पक्षांच्या जीवक्रमाचे निरीक्षण करतो. ब्राह्मणी मैनेची ही जोडी त्यांच्या घराच्या पोर्चमध्ये सारखी येत असे. त्यांनी काही काळ नाईकनवरे यांनी पोर्चमध्ये लावलेल्या कृत्रिम घरट्याचा आसरा घेतला. या घरट्यातच त्यांनी अंडे घातले. त्यांची दररोजची ये-जा यावर विराज नेहमी लक्ष ठेवायचा. पक्षी बाहेर गेल्यानंतर खुर्चीवर उभा राहून घरट्यात काय आहेत तेही तो पाहत असे. सुरुवातीला काही गवताच्या काड्या, झाडांची पाने दिसायची. काही दिवसातच एक अंडे दिसू लागले. विराज दररोज त्याचे निरीक्षण करायचा. वडिलांच्या मोबाईलमध्ये त्याचा फोटो काढायचा. वडिलांनी घरट्यात कशालाही हात लावायचा नाही, असे सांगितल्यामुळे तो फक्त दुरूनच सर्व पाहत असे. त्या घरट्यात अंड्यातून एक गोंडस पिल्लू बाहेर आले. त्याचा चिवचिवाट ऐकल्यावर प्रथम विराजच्या ते लक्षात आले. त्याने दुरूनच त्याचे फोटो घेतले. तो दररोज त्यांच्या हालचालीचे निरीक्षण करत असतो. तो त्यांच्या घरच्या जवळ उभा असला तरी पक्षी त्याला घाबरत नाहीत. त्यांचे नियमित कार्य सुरूच असते. अशाच एकावेळी त्याने घरट्यातील पिलांना अन्न भरवताच चित्रीकरण आपल्या घरातील मोबाईल मध्ये केले आहे.



धाराशिव

दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अखेर मागणीला यश; हायवे रोडवर बनवले गतीरोधक

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.२२ सप्टेंबर -** तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथे मुंबई हैदराबाद या राष्ट्रीय महामार्गावर गावच्या मुख्य बसस्थानक चौकात गतिरोधक नसल्याने वाहने भरधाव वेगात जाऊन अनेक अपघात घडले होते. याबाबत लोकप्रतिनिधी, सुज्ञ नागरिक यांनी अनेक वेळा महामार्ग प्राधिकरणाकडे निवेदने दिली होती.

याबाबत ग्रामपंचायत सदस्य संजय माने यांनीही मागणी केली होती. सतत पाठपुरावा चालू ठेवला होता. परंतु गावातील एका तरुणाला आपला जीव गमवावा लागला आहे. संजय माने यांनी या तरुणाच्या मृत्यूनंतर अधिकाऱ्यांच्या गाड्यांच्या काचा फोडून त्यांच्या गाड्या जागेवरच थांबवल्या होत्या. गावच्या मुख्य चौकात बसस्थानकाजवळ संजय माने यांच्यासमोर गतिरोधक करून दिले आहेत.



त्यामुळे वेगाने येणारे वाहने थांबत थांबत जात आहेत. संजय माने यांच्या मागणीला यश आले आहे.

## आ. चौगुले यांच्या हस्ते ५ कोटी ८० लाख रुपयांच्या विकास कामांचे भूमीपुजन

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.२२ सप्टेंबर -** लोहारा तालुक्यातील नागूर येथे ५ कोटी ८० लाख रु निधी विविध विकास कामांचे भुमिपुजन आ. ज्ञानराज चौगुले यांच्या हस्ते मराठवाडा निरीक्षक किरण गायकवाड यांच्या प्रमुख उपस्थितीत दि.२२ सप्टेंबर रोजी करण्यात आले. येथील ग्रामस्थांनी विविध विकास कामासाठी आ. ज्ञानराज चौगुले यांच्याकडे निधीची मागणी केली होती. या मागणीची तात्काळ दखल घेऊन

आ. चौगुले यांनी प्रजिमा ४३ कि.मी. ६/०० ते ९/०० (भाग नागूर ते जुने खेड) व कि. मी. ९/५०० ते ११/०० (भाग जुने खेड ते खेड) रस्त्याची सुधारणा करणे ४ कोटी रुपये, आ. ज्ञानराज चौगुले यांच्या स्थानिक विकास निधीतुन नागूर येथील अंगणवाडीजवळ ग्राम पंचायतच्या खुल्या जागेत सार्वजनिक सभामंडप बांधकाम करणे २० लाख रुपये, प्रजिमा ४३ कि.मी. ४/३०० ते ६/०० (भाग कास्ती ते नागूर) रस्त्याची सुधारणा करणे १ कोटी ६० लाख रुपये, निधी मंजुर करुन घेतला. हा भरघोस निधी मंजुर केल्याबद्धल आ. ज्ञानराज चौगुले यांचा ग्रामस्थांच्यावतीने जंगी सत्कार करण्यात आला. यावेळी फटाक्याची आतषबाजी मोठ्या प्रमाणात करण्यात आली. या आयोजित कार्यक्रमात नागूर येथील महादेव दुधभाते, लक्ष्मण माने, गणेश जावळे, जयराम शेवाळे, किशोर जाधव, पवन देडे, गोपाळ वरवटे, अक्षय कांबळे, सौरभ कांबळे, मनोज जाधव, लक्ष्मण जाधव, परमेस्वर माने, शाम जाधव, मनोज जावळे, कल्याण मोरे, अभिषेक जावळे, गोविंद जावळे, दिपक मोरे, महादेव सुरवसे, बाळु मोरे, अक्षय मोरे, सुमित सलगरे, शाम पाटील, प्रशांत जावळे, राकेश जावळे, महेश जाधव, ऋषीकेष सुर्यवंशी, अनिकेत जाधव, कृष्णा जाधव, मनोज मोरे, रणजित जाधव, यांच्यासह बहुसंख्याक तरुण युवकांनी सत्कार केला.

या कार्यक्रमास शिवसेना लोहारा तालुका प्रमुख जगन्नाथ पाटील, उमरगा तालुका प्रमुख बळीराम सुरवसे, सरपंच अर्चना कांबळे, दिनकरराव जावळे, संतोष घोडके, मुकुंद शिंदे, अभिमान खराडे, अरुण जगताप, परवेज तांबोळी, सरपंच सागर पाटील, प्रताप लोभे, अमोल पाटील, अमिन सुंबेकर, यांच्यासह महिला, ग्रामस्थ उपस्थित होते.



## संक्षिप्त वृत्त...

### भाटशिरपुरा येथे वीज पडून तरुणाचा मृत्यू

**कळंब, दि.२२ सप्टेंबर -**



तालुक्यातील भाटशिरपूरा गावातील अजय आसाराम गायकवाड (वय २१) हा तरुण आपल्या शेतातील सोयाबीन पिकाची गंज पावसात झाकत असताना अचानक त्यांच्या अंगावर वीज पडून मृत्यू झाला आहे. या दुर्दैवी घटनेमुळे भाटशिरपुरा गावासह कळंब तालुक्यात हळहळ व्यक्त केली जात आहे.



### जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेत यश; होर्टीत विद्यार्थ्यांचा सत्कार

**जळकोट, दि.२२ सप्टेंबर -** येथून जवळच असलेल्या होर्टी येथील लाल बहादूर शास्त्री विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेत घवघवीत यश संपादन केल्याबद्दल होर्टी ग्रामस्थांकडून सत्कार करण्यात आला. यावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक उपाशे, माजी प्रा. व्यास कुलकर्णी, सोसायटीचे माजी चेअरमन दत्ता राजमाने, शालेय व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष दत्ता भोसले, संतोष मोरे, व्यंकट महाबोले, नवगिरे, गिरी, सोमनाथ गुंजिटे, साईनाथ घोडके, अशोक राजमाने व गावातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. ३९ किलो गटातुन कार्तिकी दत्ता भोसले जिल्ह्यात द्वितीय तर ४२ किलो वजन गटात मंजिरी दत्ता घोडके जिल्ह्यात प्रथम व ५४ किलो वजन गटात राधा सहदेव बोरगावे द्वितीय आणि प्रतिक भोसले व संग्राम कांबळे ४८ किलो वजन गटात जिल्ह्यात द्वितीय क्रमांक पटकाविला आहे. त्याबद्दल ग्रामस्थांकडून या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. या यशाबद्दल ग्रामस्थांमधून अभिनंदन करण्यात येत आहे.

### तेर येथे लक्ष्मण शक्ती सोहळ्यानिमित्त फुलांची सजावट

**तेर, दि.२२ सप्टेंबर -** धाराशिव तालुक्यातील तेर येथील श्री संत गोरोबा



काका मंदिरात लक्ष्मण शक्ती सोहळ्यानिमित्त फुलांची सजावट करण्यात आली होती. चातुर्मासि निमित्ताने रामायण मधिल लक्ष्मण शक्ती सोहळ्यानिमित्त २१ सप्टेंबरला तेर येथील श्री संत गोरोबा काका मंदिरात फुलांची सजावट करण्यात आली होती. लक्ष्मण शक्ती सोहळ्यानिमित्त भाविकांनी दर्शनासाठी मंदिरात गर्दी केली होती.



### कळंबमध्ये क्षमापना दिन साजरा

**कळंब, दि.२२ सप्टेंबर -** दिगंबर जैन समाजाच्या वतीने रविवार दि.२२ सप्टेंबर रोजी कथले चौक येथून श्री १००८ पार्श्वनाथ दिगंबर जैन मंदिरापासून भगवान महावीरांची पालखी मिरवणूक काढण्यात आली. जैन समाजाच्या पर्युषण पर्वाची सांगता या मिरवणुकीने व महाप्रसादाने करण्यात आली. ऋषी पंचमीपासून भाद्रपद पौर्णिमेपर्यंत श्री १००८ पार्श्वनाथ दिगंबर जैन कळंब मंदिरात पर्युषण पर्व संपन्न झाले. याकाळात पूजा, अभिषेक, आरती, प्रवचन असे विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. रविवारी शहरातून श्री १००८ पार्श्वनाथ भगवंतांची मिरवणूक काढून या पर्वाची सांगता करण्यात आली. मिरवणुकीमध्ये समाजातील युवक, युवती, महिला, पुरुष, लहान मुले सहभागी झाली होती. मिरवणूक झाल्यानंतर मंदिरात येऊन अभिषेक करण्यात आला. त्यानंतर महाप्रसादाचे वाटप श्री सुभाष जी संगवे व श्रीकांत संगवे परिवाराकडून करण्यात आले.

### तेर येथे व्यापाऱ्यांचा कडकडीत बंद

**तेर, दि.२२ सप्टेंबर -** धाराशिव तालुक्यातील तेर येथे मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या सुरू असलेल्या अंतरवली सराटी येथील आमरण उपोषणास समर्थन देण्यासाठी पाठिंबा म्हणून व्यापऱ्यांनी कडकडीत बंद पाळला.

### सिमेंट रस्ता कामाचे भूमिपूजन

**जळकोट, दि.२२ सप्टेंबर -** तुळजापूर तालुक्यातील खुदावाडी ग्रा.पं. अंतर्गत असलेल्या पाटील तांडा येथे सिमेंट रस्ता कामाचे सरपंच सरोजिनी कबाडे यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले. महाराष्ट्र शासनाच्या तांडा वस्ती सुधार योजनेअंतर्गत पाटील तांडा ग्रामस्थांकडून सिमेंट रस्ता कामाची मागणी गेल्या अनेक वर्षापासून केली जात होती. ग्रामस्थांच्या मागणीवरून ग्रामपंचायत व भाजपाचे तांडा वस्ती संपर्क अभियानाचे संयोजक प्रवीण पवार यांनी जिल्हा प्रशासनाकडे पाठपुरावा करून सदर कामाची मंजुरी घेऊन तांडा वस्ती सुधार योजनेतून १० लाख रूपये खर्चाचे सिमेंट रस्ता कामाचे उपस्थित मान्यवरांच्या हस्ते भूमिपूजन केले.

## शारदीय नवरात्र उत्सवाच्या तोंडावर श्री तुळजाभवानी संस्थानच्या कार्यक्रम पत्रिकेवरुन नवा वाद



> मंदीरात बऱ्याच गोष्टी ह्या आजही परंपरेनुसार आहेत. मात्र गेल्या दोन वर्षापासून पुजारी मंडळास विश्वासात न घेता अधिकारी मनमानी कारभार करीत आहेत. यासाठी आम्ही निवेदन दिले असून यावर तात्काळ निर्णय न घेतल्यास तिव्र आंदोलन करण्यात येणार आहे.
> **- विपीन शिंदे, अध्यक्ष : पुजारी मंडळ तुळजापूर**

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२२ सप्टेंबर -** श्री तुळजाभवानी मातेच्या शारदीय नवरात्र उत्सवाच्या कार्यक्रम पत्रिकेत नवीन नाव समाविष्ट केल्याने नवीन वाद निर्माण झाला असून या गोष्टीवर पुजारी मंडळाने आक्षेप नोंदवत मंदिर संस्थानकडे निवेदन दिले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की मंदिर संस्थान दरवर्षी नवरात्र उत्सवाच्या आगोदर कार्यक्रम पत्रिका जाहीर करत असते ह्या वर्षीच्या पत्रिकेत प्रथमच दि.१२ ऑक्टोबरच्या दिवशीच्या कार्यक्रमात संत जानकोजी भगत हे नाव समाविष्ट केले आहे.

मागील पन्नास वर्षांत पहिल्यांदाच असे नाव समाविष्ट करण्यात आल्यामुळे पुजारी मंडळाने यावर आक्षेप नोंदवत या विरोधात निवेदन दिले आहे.

## चव्हाण महाविद्यालयाच्या प्राचार्य पदी निवड झाल्याबद्दल रामदास ढोकळे यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२२ सप्टेंबर -** नळदुर्ग येथील डॉ. रामदास ढोकळे यांची लोहारा येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित भानुदासराव चव्हाण महाविद्यालयाच्या प्राचार्य पदी नेमणुक झाली आहे. डॉ. रामदास ढोकळे यांची प्राचार्यपदी नियुक्ती झाल्याबद्दल नळदुर्ग शहर पत्रकार संघाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.



डॉ. रामदास ढोकळे हे यापुर्वी नळदुर्ग येथील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात रसायनशास्त्राचे प्राध्यापक, विभागप्रमुख व उपप्राचार्य म्हणुन ३६ वर्षे सेवा केली आहे. राष्ट्रीय सेवा योजना शिबिराच्या माध्यमातुन आलियाबाद या दत्तक गावात केलेल्या कार्याची दखल घेऊन केंद्र व राज्य सरकारने आलियाबाद ग्रामपंचायतीला ग्राम स्वच्छता अभियान,निर्मल ग्राम, तंटामुक्त गाव या पुरस्काराने सन्मानित केले आहे.त्यांनी गोरगरीब विद्यार्थी तसेच कांही सेवाभावी संस्थाना आर्थिक मदत करून समाजाप्रती त्यांनी ऋण व्यक्त केले आहे.

डॉ. ढोकळ यांची प्राचार्यपदी नियुक्ती झाल्याबद्दल संस्थेचे सरचिटणीस आ. सतीश चव्हाण, संस्थेचे अध्यक्ष प्रकाश सोळंके, प्रदीप चव्हाण व प्रा. सतीश इंगळे यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. त्याचबरोबर नळदुर्ग शहर पत्रकार संघाच्या वतीने डॉ. ढोकळे यांची प्राचार्यपदी नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करून त्यांचा गौरव केला आहे.

## मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा स्पर्धेत यमगरवाडी आश्रम शाळा तालुक्यात प्रथम क्रमांक



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२२ सप्टेंबर -** महाराष्ट्र शासनाकडून मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा स्पर्धेचा या वर्षी दुसरा टप्पा होत आहे. या स्पर्धेमध्ये तुळजापूर तालुक्यातील एकलव्य विद्या संकुल यमगरवाडी आश्रम शाळेचा तुळजापूर तालुक्यातून प्रथम क्रमांक आला आहे.

या स्पर्धेची तयारी म्हणून शाळेमध्ये विविध प्रकारची तयारी करण्यात आली होती शाळेमध्ये उपलब्ध असणाऱ्या सर्व व बाबींचे सादरीकरण आलेल्या पथकासमोर अतिशय उत्तम करण्यात आले होते. आश्रम शाळेमध्ये पाचवीपासून पुढच्या वर्गातील सर्व विद्यार्थ्यांना टॅब देण्यात आले आहेत. तसेच शाळेमधील इयत्ता चौथीच्या पुढील सर्व वर्गात इंटरॅक्ट बोर्ड बसवण्यात आले आहेत. शाळेमध्ये सोलर पॅनल उपलब्ध असून विद्यार्थ्यांना गरम पाण्यासाठी सोलर वॉटरचे सुविधा करून देण्यात आली आहे. विद्यार्थ्यांचे क्रीडा स्पर्धेमध्ये यश खूप चांगले आहे. शाळेमध्ये स्वतःच्या ग्रंथालय उपलब्ध असून ग्रंथालयातील पुस्तकांचा विद्यार्थी दैनंदिन नित्य पणे वापर करतात व वाचलेल्या पुस्तकावर ती लेखी अभिप्राय देतात.

शाळेमध्ये मला खांब उपलब्ध असून मला कामाचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना देण्यात येते मुलींना स्वसंरक्षणाचे धडे ही देण्यात येतात.

या स्पर्धेत यश मिळवण्यासाठी शाळेमधील अनिल घुगे, कोंडीबा देवकर, संतोष बनसोडे सर ,अण्णासाहेब मगर, दयानंद भडंगे, महादेव शेंडगे अशोक बनकर, बालाजी क्षीरसागर, प्रणिता शेटकार, हरीश मगदूम, दत्ता भोजने, राजाभाऊ कुंभार, सविता गोरे, निर्मला हुग्गे, संगीता पाचंगे, फुलाजी ताटी कुंडलवार, माऊली भुतेकर, यशवंत निंबाळकर, रमाकांत पवार, बालाजी भांडेकर, मयूर अंतरेड्डी, सुजाता गणवीर, खंडू काळे, शालिवाहन वाघमोडे, पूर्ण वेळ कार्यकर्ते गोविंद सोमानी, सोमानी, किरण चव्हाण, लता जाधव, सरस्वती जाधव, लक्ष्मी पवार, सुनीता राठोड यांनी परिश्रम घेतले.

## संत मिरा पब्लिक स्कूलच्या मुली क्रीडा स्पर्धेत अव्वल



**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२२ सप्टेंबर -** क्रीडा व युवा सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने शालेय क्रीडा स्पर्धा २०२४-२५ या स्पर्धेला रंगत आली असून, जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा दि.६ सप्टेंबर रोजी श्री तुळजाभवानी सैनिकी स्कूल, तुळजापूर या ठिकाणी क्रीडा स्पर्धा पार पडल्या.

या स्पर्धेमध्ये संत मिरा पब्लिक स्कूल मधील इ.८ वी मधील प्रतिभा सद्दिवाल हिने द्वितीय तर इ.१० वी मधीलभूमिका खराडे, प्राजना भोसले, राधा कोकाटे, श्रेया शिंदे, क्रांती गिरी ह्यांनी धनुर्विद्या (आर्चरी) या खेळामध्ये प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवला आहे. त्यांची नांदेड येथे होणाऱ्या विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. तसेच राज्य थलेटिक्स असोसिएशन राज्यस्तरीय ज्युनिअर अजिंक्यपद स्पर्धा -२०२४ यांच्या संयुक्त विद्यमानाने धाराशिव येथे घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय निवड चाचणी स्पर्धेमध्ये शाळेची सारंगी मुगळीकर इ. दहावी हिची भालाफेक या क्रीडा प्रकारात शिवछत्रपती क्रीडा संकुल बालेवाडी, पुणे येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

सर्व यशस्वी खेळाडू व क्रीडाशिक्षक पंकज रणदिवे यांचा सन्मान वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणीचे माजी कुलगुरू तथा धनेश्वरी शिक्षण समूहाचे (महाराष्ट्र, छत्तीसगड व झारखंड) संस्थापक अध्यक्ष डॉ. वेदप्रकाश पाटील यांच्या हस्ते करण्यात आला.

## एकाच दिवशी ९ शाळांना शालेय साहित्य वाटप

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२२ सप्टेंबर -** तुळजापूरचे युवा नेते आनंद कंदले यांनी त्यांच्या वाढदिवसाच्यानिमित्त आवाहन केले होते, कि माझा वाढदिवसला केक, हार, फटाके, बॅनरना लावता मला त्या बदल्यात गरजू विद्यार्थ्यांना देणेसाठी शालेय साहित्य द्यावे, आणि त्यांच्या या आवाहनला प्रतिसाद देत त्यांच्या नेते, मित्र, सहकारी आणि त्यांच्या वर प्रेम करणाऱ्यांनी या उपक्रमला प्रचंड प्रतिसाद दिला.

त्यांना शुभेच्छा म्हणून शालेय साहित्य रुपी सहा ते सात हजार वह्या, तितेच पेन, पेन्सिल, कंपास व स्कुल बॅग मिळाल्या, त्यांनी त्या तुळजापूर शहरातील जिल्हा परिषद शाळा, नगर परिषद २, नगर परिषद ३,नवीन मराठी शाळा, जिल्हा परिषद कन्या शाळा, तुळजामाता आश्रम शाळा, कुलस्वामिनी विद्यालय, रामवरदायीनी शाळा, तुळजाभवानी प्राथमिक शाळा या विविध ९ शाळांमध्ये साधारण ५ ते ६ हजार वह्या व शालेय साहित्य वाटप करण्यात आले.



गरजू विद्यार्थीसाठी भेट स्वरूप शालेय साहित्य दिले बद्दल सर्वांचे आनंद कंदले यांनी आभार मानले.

## गोवंश बचावासाठी कळंबच्या रणरागिणीचे आळंदीत उपोषण

### गोशाळांसाठी इतर राज्यांप्रमाणे प्रतिदिन अनुदान देण्याची मागणी...



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२२ सप्टेंबर -** देशी गोवंश बचावासाठी अखिल भारत कृषी गोसेवा संघाच्या वतीने दि.१९ सप्टेंबरपासून बेमुदत उपोषणास तीर्थक्षेत्र आळंदीत (जि. पुणे) येथे सुरुवात करण्यात आले आहे. गोवंशाच्या कत्तलीमुळे देशी गाईच्या संख्येत घट होत चालली आहे. ही बाब सामाजिक व आर्थिक दृष्टिकोनातून नुकसान करणारी बाब आहे. महाराष्ट्रात गोरक्षणासाठी स्थापन झालेल्या गोशाळांची आर्थिक परिस्थिती बिकट झाली आहे.

राज्यात अशा गोशाळांची संख्या एक हजारपेक्षा जास्त आहे. या गोशाळांना शासनाकडून आर्थिक मदत मिळावी यासाठी धाराशिव जिल्ह्यातील कळंब येथील रणरागिणी वैशाली बारकूल ह्या महिला प्रतिनिधी म्हणून उपोषणास बसल्या आहेत. पितृपक्षाच्या पवित्र काळात गोमातेला चारा दान केल्यास पित्रांना शांती लाभते व ते आशिर्वाद देतात. पितृपक्षात दानाला अनन्यसाधारण महत्व आहे. पण गो शाळा चालवणे सोपे नाही, याला एक तर समाजातून मदतीची गरज आहे व शासनाने अनुदान देण्याची आवश्यकता आहे.



शासनस्तरावर मात्र गो शाळेची दखल घेतली जात नसल्याचे नवजीवन गो शाळेच्या संचालिका वैशाली बारकुल यांनी सांगितले.

> **गो शाळेस आर्थिक मदतीची गरज...**
> गोवंशाच्या औषधोपचार व संगोपनासाठी मदतीची गरज आहे. यासाठी या गो शाळेच्या संचालिका वैशाली बारकुल ८८०५६९६२२१ यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन संस्थेच्या माध्यमातून करण्यात आले आहे. गोशाळा चालवण्यासाठी शासनाने आर्थिक मदत करण्याची गरज आहे. यासाठी गोशाळा चालकांच्या संघटनेने अनेकवेळा लेखी तक्रारी, आंदोलने करूनही काही उपयोग झालेला नाही.

कळंब तालुक्यातील मंगरूळ पाटीजवळ हि गो शाळा असून, ही गो शाळा गेल्या अनेक वर्षापासून एक महिला हिंमतीने चालवते. या गो शाळेसाठी खऱ्या अर्थाने मदतीची गरज आहे. कत्तलखान्यातुन सुटका झालेले, वृध्द, आजारी गोवंशाचे नवजीवन गोशाळा मंगरूळ पाटी येथे संगोपन करण्यात येते. ही गोशाळा कोणाच्या हि मदतीवीणा एक महिला चालवते ही कौतुकास्पद आहे.

तरी शासनाने वरील बाबींचा सहानुभूती विचार करून गोशाळेला आर्थिक मदत करावी, अशी मागणी वैशाली बारकूल यांनी केली आहे.

# हिंगोलीत काँग्रेसच्या विधानसभा आढावा बैठकीत दोन गटात हाणामारी

## मारहाणीनंतर काँग्रेसचे शहराध्यक्ष पवन उपाध्ये रूग्णालयात दाखल



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ सप्टेंबर**

येथील स्व शिवाजीराव देशमुख सभागृहात शनिवारी जिल्ह्यातील विधानसभा निहाय आढावा बैठक आणि इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती होणार होत्या. यावेळी काँग्रेसचे माजी आ. भाऊराव पाटील गोरेगावकर आणि इच्छुक उमेदवार प्रकाश थोरात यांच्या गटात सहप्रभारी कुणाल चौधरी यांच्यासमोरच तुंबळ हाणामारी झाली. यावेळी गोरेगांवकर समर्थक तथा काँग्रेसचे हिंगोली शहराध्यक्ष पवन उपाध्ये यांना जबर मारहाण झाल्यामुळे त्यांना एका खासगी रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. याबाबत पक्षश्रेष्ठींकडे तक्रार करणार असून कार्यवाही न झाल्यास टिळक भवनासमोर आमरण उपोषण करणार असल्याचा इशारा पवन उपाध्ये यांनी दिला आहे.

सध्या विधानसभेचे वारे जोरात वाहू लागले असून शनिवारी येथील शिवाजीराव देशमुख सभागृहात काँग्रेसच्या हिंगोली विधानसभा मतदारसंघासाठी इच्छुक उमेदवारांनी त्यांचे शक्तीप्रदर्शन केले. सुरूवातील माजी आ. भाऊराव पाटील गोरेगावकर यांचे समर्थक सभागृहात दाखल झाले. त्यांच्या समर्थकांमुळे संपूर्ण सभागृह पॅक झाले होते. त्यांनतर काँग्रेसच्या विधान परिषदेच्या आमदार डॉ प्रज्ञा सातव यांच्यासोबत इच्छुक उमेदवार प्रकाश थोरात हे देखील समर्थकांसह उपस्थित झाले. यावेळी दोन्ही गटाच्या समर्थकांनी जोरदार घोषणबाजी करीत शक्तीप्रदर्शन केले. यावेळी मंचावर सहप्रभारी कुणाल चौधरी, लोकसभा प्रभारी अॅड सचिन नाईक यांच्यासह आ.डॉ प्रज्ञा सातव, माजी आ. भाऊराव पाटील गोरेगावकर आदींची उपस्थिती होती.

सभागृह पॅक भरल्यामुळे प्रकाश थोरात यांच्या समर्थकांना बसण्यासाठी जागा मिळत नव्हती. त्यातच शहराध्यक्ष पवन उपाध्ये यांना प्रकाश थोरात यांच्या समर्थकांनी जबर मारहाण केली. यावेळी सहप्रभारी कुणाल चौधरी यांनी मध्यस्थी करीत दोन्ही गटाला शांत केले परंतु आढावा बैठक न घेताच त्यांनी काढता पाय घेतला.

यावेळी पवन उपाध्ये यांनी सांगितले की, प्रकाश थोरात यांच्याविरोधात मी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्याकडे तक्रार केली होती. त्याचा राग मनात धरून त्यांच्या समर्थकांनी मला जबर मारहाण केली असून खिशातील पैसे आणि मोबाईलही हरवला आहे. यासंदर्भात पक्षश्रेष्ठींकडे तक्रार करणार असून तक्रारीची दखल न घेतल्यास टिळक भवनासमोर आमरण उपोषण करणार आहे.

दरम्यान, शहराध्यक्ष पवन उपाध्ये यांना येथील एका खासगी रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले असून त्यांची प्रकृती सध्या स्थिर आहे. माजी आ. भाऊराव पाटील गोरेगावकर यांनी त्यांची रविवारी सकाळी दवाखान्यात जाऊन भेट घेतली आहे. हिंगोली विधानसभा निवडणुकीवरून माजी आ. भाऊराव पाटील गोरेगावकर आणि आ. डॉ. प्रज्ञा सातव गटातील वाद पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे.

# गणेशोत्सव शांततेत पार पाडणाऱ्या स्वयंसेवकांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ सप्टेंबर**

जिल्ह्यात श्री गणेश स्थापना, विसर्जन आणि श्री विघ्नहर्ता चिंतामणी गणपती मंदिर उत्सव शांततेत पार पाडण्यासाठी स्वयंसेवक, सामाजिक संघटना तसेच पोलिस दलातील कर्मचारी यांनी मोलाची भूमिका निभावल्याबद्दल जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात त्यांचा मान्यवरांच्याहस्ते गौरव करण्यात आला.

यावेळी जिल्हाधिकारी अभिनव गोयल, पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील, अप्पर जिल्हाधिकारी खुशालसिंह परदेशी, उपविभागीय पोलिस अधिकारी सुरेश दळवी, पोनि विकास पाटील, पोनि मारोती थोरात, पोनि सुधीर वाघ यांची प्रमुख उपस्थिती होती.

श्री गणेशोत्सव २०२४ अंतर्गत हिंगोली जिल्ह्यात एकूण १४६४ सार्वजनिक श्री गणेश मंडळांनी स्थापना करण्यात आली होती. त्याचप्रमाणे श्री विघ्नहर्ता चिंतामणी गणपतीचे जवळपास दीड लाख भाविकांनी दर्शन घेतले. जिल्ह्यातील सार्वजनिक गणेश मंडळांचे विसर्जन आणि श्री विघ्नहर्ता चिंतामणी गणपती दर्शन शांततेत पार पाडण्यासाठी पोलिस दलाच्यावतीने सुक्ष्म नियोजन करण्यात आले होते. यासाठी निवृत्त पोलिस अधिकारी, कर्मचारी, स्वयंसेवी संघटना, स्वयंसेवक यांना सहभागी करून घेण्यात आले होते. त्यांनी गणेशोत्सव शांततेत पार पाडण्यासाठी मोलाची भुमिका बजावली. या सर्वांच्या कार्याची दखल घेत तसेच स्वच्छता अभियान आणि रक्तदान शिबीर असे उपक्रम राबविल्याबद्दल जिल्हाधिकारी गोयल, पोलिस अधीक्षक कोकाटे यांच्या संकल्पनेतून संबंधितांचा गौरव करण्यात आला. यावेळी प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात आले. या कार्यक्रमास पोलिस ठाण्यांचे प्रभारी, गणेश मंडळांचे स्वयंसेवक, अंमलदार, सामाजिक संघटनेचे पदाधिकारी आदींची उपस्थिती होती.

# भाजपचे रामदास पाटील सुमठाणकरांचा झंझावती दौरा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ सप्टेंबर**

भारतीय जनता पक्षाचे लोकसभा प्रमुख रामदास पाटील यांनी हिंगोली विधानसभा मतदार संघात झंझावती दौरा सुरू केला असून या दौऱ्यात त्यांनी गावांतील नागरिकांशी संवाद साधत आहेत.

हिंगोली विधानसभा निवडणुकांचे वारे सध्या जोरात वाहत असून सर्वच राजकीय पक्षांचे इच्छुक उमेदवारांनी गावांमध्ये भेटीगाठी, सभा, कॉर्नर बैठका तसेच नागरिकांशी संवाद साधण्यास सुरूवात केली आहे. रविवारी डिग्रस कऱ्हाळे सर्कलमधील आठ्ठरवाडी यैथील श्री हनुमान मंदिराचे दर्शन घेतल्यानंतर




गावकऱ्यांशी संवाद साधला. गोरेगाव सर्कलमधील नागमाथा, वरखेडा त्यानंतर बाभूळगाव सर्कलमधील केंद्रा बु, येथे माजी विभागीय आयुक्त सुनील केंद्रेकर यांचय निवासस्थानी सदीच्छा भेट दिली. गोरेगाव येथील ग्रामदैवत गोरेश्वर महादेवाचे दर्शन घेतले तसेच नागरिक तसेच पदाधिकारी यांचेशी संवाद साधला. सेनगाव तालुक्याती पातोंडा, पुसेगाव, लिंगपींपरी, हिवरा, भानखेडा, आडोळ, मकोडी, सुकळी, गोंडाळा, माझोड आदीं गावांना भेटी देत तेथील नागरिकांशी संवाद साधला आहे. रामदास पाटील सुमठाणकर यांनी हिंगोली विधानसभा मतदारसंघासाठी जोरदार तयारी सुरू केली असून सकाळपासून रात्री उशिरापर्यंत विविध गावांना भेटी देत नागरिकांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी, समस्या जाणून घेत आहेत. त्यांच्या झंझावती दौऱ्याला चांगला प्रतिसाद मिळत असतांना दिसत आहेत.



**हिंगोली– मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण द्या या मागणीसाठी मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी अंतरवाली सराटी येथे आमरण उपोषण सुरू केले आहे. त्यांच्या उपोषणाला पाठींबा म्हणून रविवारपासून हिंगोलीत मराठा बांधवांनी छत्रपती शिवाजी महाराज पूतळा परिसरात आमरण उपोषण सुरू केले आहे. या उपोषणात सहभागी मराठा बांधव. छाया– विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### सुप्रसिध्द व्यापारी स्वरूपचंद परतवार यांचे निधन



हिंगोली– येथील दिगंबर जैन समाजातील ज्येष्ठ समाजसेवक व प्रकाश इलेक्ट्रिकल्सचे संस्थापक स्वरुपचंद केशवराव परतवार यांचे त्यांच्या निवासस्थानी दुःखद निधन झाले. मृत्यू समयी त्यांचं वय ८५ वर्ष होत. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, दोन मुली, नातू, पणतू असा मोठा परीवार आहे. मूळचे लोहगाव येथील रहिवाशी असलेल्या स्वरुपचंद यांनी हिंगोली येथील महावीर चौकात प्रकाश इलेक्ट्रिकल्स हे प्रतिष्ठान निर्माण करून मोठा व्यवसाय केला. श्री सार्वजनिक दसरा महोत्सव, दिगंबर जैन समाज संघटना, महावीर भवन, सकल जैन समाज, भारतीय जैन संघटना, जैन समाज सामूहिक विवाह व परिचय मेळावा समिती, व्यापारी महासंघ आदींचे अनेक वर्ष पदाधिकारी होते. त्यांच्या पार्थिवावर कयाधू स्मशान भूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने जनसमुदाय उपस्थित होता.

### रिधोरा येथे सात दिवसांपासून आमरण उपोषण



वसमत– तालुक्यातील रिधोरा गावामध्ये मराठा बांधव दत्तराव भालेराव यांचे आमरण उपोषण सुरू आहे. मनोज जरांगे पाटील यांना पाठिंबा आमरण उपोषण सुरू केले आहे. या उपोषणाचा आजचा सातवा दिवस असून समाजासाठी अन्नपाणी त्याग केलेला आहे. यावेळी वसमत तालुक्यातील मराठा बांधव आक्रमक झालेला दिसून येत आहे. रिधोरा या गावांमध्ये गावकरी मंडळी मोठ्या संख्येने उपोषणस्थळी दाखल झाले आहेत.

### हिंगोलीत ईद मिलादुन्नबी निमित्त भव्य मिरवणूक

हिंगोली– जश्ने ईदे मिलादुन्नबी निमित्त भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले होते. ठिकठिकाणी प्रतिष्ठित नागरिकांकडून ईद-ए-मिलादुन्नबी कमिटीच्या सदस्यांचे हार व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. ठिकठिकाणी नागरिकांनी अल्पोपहार जिलेबी, मिठाई, शरबत, बदाम शेख, कचोरी रॅलीमध्ये येणाऱ्या लोकांना वाटले. या रॅलीचे आयोजन ईद मिलादुन्नबी समितीचे अध्यक्ष हाजी मोहम्मद खिजर,सचिव हाजी अहमद खान, नसीर अहमद खान, शेख गुलाम मुस्तफा आदींनी केले होते.

# अखिल भारतीय मारवाडी महिला संघटनेकडून गरजूंना कपड्यांचे वाटप




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ सप्टेंबर**

येथील अखील भारतीय मारवाडी महिला संघटनेच्यावतीने मानवता की दीवार अंतर्गत गोर-गरीब मुले, मुली तसेच महिलांना कपड्यांचे वाटप करण्यात आले.

अखील भारतीय मारवाडी महिला संघटनेच्यावतीने विविध सामाजिक उपक्रम राबवले जात आहेत. याचाच एकभाग म्हणून रविवारी संघटनेच्यावतीने गोरगरीबी आणि गरजूंना कपड्यांचे वाटप करण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने गरजुंनी कपडे आणि साड्या तसेच मुलांमुलींसाठी ड्रेस घेण्यासाठी गर्दी केली होती. यावेळी संघटनेच्या अध्यक्षा मंजु बगडिया, सचिव वर्षा कयाल, कोषाध्यक्ष पूजा बगडीया यांच्यासह महिला पदाधिकारी व सदस्या उपस्थित होत्या.

# जि.प. कर्मचारी व शिक्षक पतसंस्थेची सर्वसाधारण सभा संपन्न





**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली २२ सप्टेंबर**

येथील जि.प.बहूविध प्रशाला येथे पतसंस्थेची २४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेचे अध्यक्ष गजानन बोरकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या सर्वसाधारण सभेसाठी प्रमुख पाहुणे म्हणून या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष व्ही.एस.सुर्यवंशी, मनोहर पोपलाईत, भगवानराव लोंढे, उपशिक्षणाधिकारी नेटके, गटशिक्षणाधिकारी नांदे, माजी चेअरमन प्रकाशराव निळकंठे, जावळे, आत्माराम मईंग, जि.प.शिक्षक पतसंस्था अध्यक्ष रामदास कावरखे, विठ्ठल पवार, रामराव वराडे, विश्वंभरराव जावळे व पतसंस्थेचे सभासद मोठ्या प्रमाणात सभासद उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक हरिभाऊ मुटकुळे यांनी केले या प्रसंगी संस्थेचे सचिव रमेश सुर्यवंशी यांनी संस्थेच्या वार्षिक अहवाल वाचन केले व संस्थचे पुढील वर्षासाठीची उद्दीष्टे व ध्येयधोरणे सांगितले. गटशिक्षणाधिकारी श्री नांदे यांनी संस्थेच्या प्रगतीसाठी सर्व सभासदांनी संस्थेत भरपूर प्रमाणात ठेवी ठेवून संस्थेला सहकार्य करावे व नियमित कर्जफेड करावी, असे प्रतिपादन केले त्याचबरोबर संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुर्यवंशी यांनी येणाऱ्या वर्षे मध्ये संस्थेची स्वतःची इमारत असावी अशी अपेक्षा व्यक्त केली. अध्यक्षीय समारोप करताना बोरकर यांनी संस्थेच्या प्रगतीसाठी व सभासद हितासाठी सदैव प्रयत्नशील राहणार असल्याचे सांगितले. या कार्यक्रमासाठी उपस्थित सर्व मान्यवरांचे आभार संस्थेचे संचालक गजानन खिल्लारी यांनी व्यक्त केले.

# राशन दुकानातून १०० टक्के आनंदाचा शिधा व धान्य वाटप

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ सप्टेंबर**



शहरातील एस एफ पठाण यांच्या राशन दुकानातून शंभर टक्के लाभार्थ्यांना गौरी व गणपतीचा आनंदाचा शिधा आणि सप्टेंबर महिन्याचे धान्य वाटप करून ऑनलाईन त्याची नोंदही करण्यात आली आहे. राज्यात सप्टेंबर महिन्यात १०० टक्के धान्य वाटणारे पहिले राशन दुकान ठरले आहे.

शहरातील आनंद नगर भागात असलेल एस एफ पठाण यांनी मागील वर्षीही लाभार्थ्यांना १०० टक्के धान्य वितरीत करीत ऑनलाईन नोंद केली होती. यावर्षीही त्यांना माहे सप्टेंबर मध्ये दि ४ सप्टेंबर ते २० सप्टेंबर या काळात मिळालेले ५८३९ किलो गहू, ८४०४ किलो तांदुळ आणि गौरी गणपतीनिमित्त लाभार्थ्यांना वाटपासाठी मिळालेला ५४६ आनंदाचा शिधाची किट त्यांनी वाटप केली आहे. कदाचित राज्यात एस एफ पठाण यांचे पहिले दुकान आहे त्यांनी गौरी गणपती आनंदाचा शिधा आणि धान्य वाटप लाभार्थ्यांना सप्टेंबर महिन्याच्या २० तारखेपर्यंत करून त्याची शासन दरबारी ऑनलाईन नोंदही केली आहे. त्यांच्या या कामाबद्दल पुरवठा विभागाच्यावतीने कौतुक करण्यात येत असून त्यांच्या कामाची ऑनलाईन नोंदही झाली आहे.

# विविध प्रजातीची ११ हजार झाडे लावण्याचा मानस– पोलिस अधीक्षक कोकाटे

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ सप्टेंबर**



येथील पोलीस अधीक्षक कार्यालय आणि ईतर ठिकाणच्या परिसरात घनवट पद्धतीने विविध प्रजातीचे झाडं लावण्याच्या कार्यक्रम घेण्यात आला.. याप्रसंगी ११ हजार झाडे सदभाव सेवाभावी संस्था, पर्यावरण रक्षक दलच्या सह्योगाने लावण्याचा मानस असल्याचे पोलीस अधिक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी व्यक्त केला.

जैवविविधता टिकली पाहिजे, मातीचा पोत सुधारला पाहिजे, जलस्तर वाढविणे, ऑक्सिजन पार्क, फॅक्टरी तयार झाली पाहिजे याअनुषंगाने झाडं लावण्यार असल्याच डॉ भरतीया यांनी सांगितले. याची सुरुवात केली असून यामध्ये जांभूळ, गोंदन, चिंच, महारुख, नळखीरा, पळस, कांचन, टेम्भूर्णी, कडुलिंब, वड, पिंपळ आदी विविध प्रजातीचे झाडांचं रोपण करण्यात आले. ड्रीप करून झाडं जगविल्या जाणार तसेच त्यांना बांबूच्या कमठ्याचा आधार दिला जाणार आहे. मुख्याधिकारी डॉ. अरविंद मुंढे, आणि वन विभाग, सामाजिक वनिकरण यांच्या माध्यमातून वृक्षांची उपलब्धता झाली. आणखी जशी जशी वृक्ष मिळतील त्याप्रमाणे लागवड करण्यात येणार आहे. याप्रसंगी सतीश मुळतकर, रामराव जाधव, सदभाव आणि पर्यावरण रक्षक दलाचे डॉ अभयकुमार भारतीया, विनोद खरात, पोले, रवी धनवे यांची उपस्थिती होती.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### लालबहादूर शास्त्री विद्यालयात डॉ. शिरीष पटवर्धन यांचे व्याख्यान

**उदगीर, दि.२२ सप्टेंबर-**

उदगीर स्त्री रोग संघटनेद्वारे आयोजित डॉक्टर शिरीष पटवर्धन पुणे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. संजय कुलकर्णी, स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष शंकरराव लासुणे, डॉक्टर प्रवीण मुंदडा ,महेश भातांब्रे, राजेश राठोड ,शैलेश येरोळकर, प्राजक्ता गुरूडे, सविता पदातुरे, मुख्याध्यापक अनंतराम कोपले ,उपमुख्याध्यापक अरुण पत्की, पर्यवेक्षक कृष्णा मारावार, किरण नेमट उपस्थित होते. प्रमुख अतिथी डॉक्टर शिरीष पटवर्धन यांनी आरोग्याच्या वाटा व हिमोग्लोबिनचे प्रमाण याविषयी सोप्या भाषेत आरोग्याचे व उत्तम आहाराचे महत्व विशद केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉक्टर संजय कुलकर्णी यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांना आहार विषयक मार्गदर्शन व विद्यार्थ्यांनी सकस आहार घ्यावा असा संदेश दिला. या कार्यक्रमासाठी उदगीर शहरातील नामवंत डॉक्टरांची उपस्थिती लाभली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व स्वागत परिचय पारसेवार अंबिका यांनी केले तर प्रास्ताविक अनिता येलमटे व आभार किरण नेमट यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता जान्हवी देशमुख यांच्या कल्याणमंत्राने झाली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्वच शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

### हायवाच्या धडकेमुळे दुचाकीस्वार ठार

**लातूर, दि. २२ सप्टेंबर-**

लातूर शहरातील साई चौक भागामध्ये हायवा आणि दुचाकीच्या धडकेमध्ये दुचाकीस्वार जागी ठार झाल्याची घटना आज रविवार दिनांक २२ सप्टेंबर रोजी चारच्या सुमारास घडले आहे. लातूर शहरातील साई चौक भागामध्ये एका भरधाव वेगातील हायवा (एम एच ४३ ४४) आणि दुचाकी स्वार याची चौकातील वळण रस्त्यावर धडक झाली. या धडकेमध्ये दुचाकी स्वार जागेचा ठार झाल्याची घटना घडली. मृत युवकाला लातूर येथील विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात उत्तरीय तपासणीसाठी पाठविण्यात आले. अपघातामुळे या भागामध्ये वाहनांची कोंडी निर्माण झाली होती. यातून मार्ग काढण्यासाठी रस्ते वाहतूक नियंत्रण शाखेतील पोलीस यांनी मार्ग काढू वाहतूक सुरळीत केली. साई चौक हा अतिशय वर्दळीचा चौक आहे. या भागामध्ये रेल्वे स्थानकाकडे जाणारी वाहतूक आणि महामार्गावरून अवजड वाहनांची मोठ्या प्रमाणात वर्धा असल्यामुळे येथे सातत्याने वाहनांची गर्दी होऊन अपघाताचे प्रमाणही वाढत आहे. या चौकामध्ये असलेले वाहतूक सिग्नल सातत्याने बंद अवस्थेत असतात. त्यामुळे या वाहतुकीवर नियंत्रण राहत नाही. येथे कायमस्वरूपी वाहतुकीवर तोडगा काढावा अशी मागणी सर्वसामान्य नागरिक आणि छोट्या वाहन चालक धारकाकडून केली जात आहे.

### डॉ. सूर्यवंशी यांची इंग्रजी विभाग प्रमुखपदी निवड

**उदगीर, दि. २१ सप्टेंबर-**



येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयातील इंग्रजी विभाग प्रमुख प्रा.डॉ. एस.आर.नागोरी हया नियत वयोमानानुसार निवृत्त झाल्यामुळे सदरील विभाग प्रमुख पदावर प्रा.डॉ.एस.आर.सूर्यवंशी यांची निवड करण्यात आली. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे सहसचिव डॉ.आर.एन.लखोटिया व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर.के.मस्के आणि उपप्राचार्य डॉ.एस.जी.पाटील यांच्या हस्ते त्यांना निवडीचे पत्र देऊन पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी इंग्रजी विभागातील प्राध्यापक, सर्व विभागाचे प्रमुख आणि कार्यालयीन कर्मचारी उपस्थित होते.

### स्वाभिमान योजनेसाठी २७ सप्टेंबरपर्यंत अर्ज करावेत

लातूर, दि. २२ सप्टेंबर-

भूमीहीन दारिद्रय रेषेखालील आदिवासींचे सबळीकरण व स्वाभिमान योजनेतंर्गत दारिद्रयरेषेखालील भूमीहीन आदिवासी कुटुंबांना ४ एकर जिरायती (कोरडवाहू) किंवा २ एकर ओलीताखालील जमीन देण्याचे प्रस्तावित आहे. ही योजना आदिवासी विकास विभागाच्या २८ जुलै, २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये १०० टक्के अनुदानित आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी २७ सप्टेंबरपर्यंत छत्रपती संभाजीनगर एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयात अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. दारिद्रय रेषेखालील भूमिहीन आदिवासी परितकत्या स्त्रिया, दारिद्रयरेषेखालील भूमीहीन आदिवासी विधवा स्त्रिया, भूमिहीन कुमारी माता, भूमीहीन आदिम जमाती, भुमीहीन पारधी यांना प्राधान्य राहील.

**अर्जासोबत जोडावयाचे कागदपत्रे**

उपविभागीय अधिकारी (एस.डी.एम.) यांनी दिलेले जात प्रमाणपत्र, दारिद्र्यरेषेखालील प्रमाणपत्र, लाभार्थ्यांचे किमान वय १८ व कमाल ६० इतके असावे, लाभार्थी ज्या गावातील जमीन आहे, त्या गावचा रहिवाशी असावा, भूमिहिन प्रमाणपत्र तहसलीदार यांनी दिलेले असावे, शाळा सोडल्याचा दाखला, वयाचा दाखला, आधारकार्ड, उत्पन्नाचा दाखला (तहसीलदार यांनी दिलेला) अर्ज सादर केलेलया वर्षातील असावा, लाभार्थी यांनी कोणत्याही शासकीय अथवा गायरान जमिनीवर अतिक्रमण केले नसल्याबाबतचे तलाठी यांचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे. पात्र लाभार्थी यांनी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, छत्रपती संभाजीनगर, महानगर पालिका व्यापारी गाळे, तिसरा मजला, रिलायन्स मॉलच्या पाठीमागे , गजानन मंदिर रोड, गारखेड परिसर, छत्रपती संभाजीनगर ( दुरध्वनी क्रमांक : ०२४०-२९५२५००) या कार्यालयातून अर्ज घेवून जावेत व परिपूर्ण भरलेले अर्ज या कार्यालयाकडे २७ सप्टेंबर पर्यंत सादर करावेत.

जमीन ही कोणालाही दान दिली नसल्याचे व जमिनीचा कोणताही प्रकारे वाद नसल्योबातचे प्रमाणपत्र, शेतविक्रेते यांचे संमतीपत्र व कुटूंबांतील व्यक्तीचे ना-हरकत-प्रमाणपत्र बॉण्ड पेपरवरती नोटरीसह व विक्री करीत असलेल्या जमिनीचा भूमी अभिलेख कार्यालय यांचा टोच नकाशा ही कागदपत्रे जोडून परिपूर्ण प्रस्ताव एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालयास दिनांक २७ सप्टेंबर, २०२४ पर्यंत सादर करण्यात यावा.

**- चेतना मोरे,**
**एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी**

# लोखंडी पाईपलाईनसाठी राष्ट्रवादी आक्रमक

**हस्ती पाईपलाईनला विरोध**

**पाईप बदलो आंदोलनाचा इशारा**



**तभा वृत्तसेवा,**
**औसा, दि.२२ सप्टेंबर-**

औसा शहर व हद्दवाढ भागात पाणी पुरवठा करण्यासाठी नवीन पाईपलाईनला मंजुरी मिळाली असून पाईपलाईन करण्यासाठी संबंधित गुत्तेदारांनी हस्ती पाईपलाईन साठा केला आहे .नागरिकांच्या आरोग्यासाठी व विशेष करुन उन्हाळ्यात पिण्याचे पाणी पुरवठा करण्यासाठी प्लस्टिकची पाईपलाईन आरोग्यास हानीकारक आहे. यामुळे प्लस्टिक ऐवजी लोखंडी पाईपलाईन करावी .अशी मागणी राष्ट्रवादी काग्रेसचे जिल्हाध्यक्ष प्रा. डा. अफसर शेख यांनी निवेदनाद्वारे नगरपालिकेकडे केली आहे.

औसा शहरातील नवीन हद्दवाढ व इतर कांही भागात नवीन पाणी पुरवठा करण्यासाठी अमृत २ अभियान अंतर्गत नव्या पाईपलाईनला मंजुरी मिळाली आहे. शहरातील इतर भागाप्रमाणे नव्याने करण्यात येणारी पाईपलाईन लोखंडी ऐवजी संबंधित ठेकेदाराने हस्तीच्या पाईपचा साठा कुमारस्वामी महाविद्यालयाच्या मैदानात केला आहे.

लोखंडी पाईपलाईन ऐवजी हस्ती पाईपलाईनमध्ये गुत्तेदारास जास्त फायदा व्हावा. यासाठी अंदाजपत्रकात बदल करण्यात आला असून यामध्ये शहरातील जनतेचे नुकसान होणार असल्याचे या निवेदनात म्हटले आहे.याचबरोबर प्लस्टिक पाईपलाईनमधून योग्य दाबाने पाणी पुरवठा होत नाही. तसेच पाईपलाईन दबू शकते. त्यामुळे पाणी पुरवठा करण्यासाठी अनेक अडचणीना सामोरे जावे लागणार असल्याची भिती व्यक्त करण्यात आली आहे.

या हस्ती प्लस्टिक पाईपलाईन मधून नळ जोडणी दिलेल्या नळ धारकांना होणाऱ्या गळतीमुळे कमी दाबाने पाणी पुरवठा होऊन पाणी कमी प्रमाणात मिळू शकते. तसेच प्लस्टिकमधून सेवन करणे आरोग्यास हानीकारक असते असे विज्ञान सांगते. यामुळे शहरात प्लस्टिकचा वापर टाळण्यासाठी नगरपालिका एकीकडे प्रयत्नशील आहे. तर दुसरीकडे पिण्याच्या पाण्याचा पाणी पुरवठा प्लस्टक पाईपलाईनमधून करुन नागरिकांचे आरोग्य नगरपालिका धोक्यात का आणत आहे . अशी विचारणा या निवेदनातून करण्यात आली आहे. याचबरोबर प्लस्टिकच्या पाईपलाईन मधून उन्हाळ्यातील उच्च तापमामानात होणारा पाणी पुरवठा जनतेच्या शरीरास हानीकारक ठरणार आहे.यामुळे नगरपालिकेने हस्ती पाईपलाईन ऐवजी लोखंडी पाईपलाईन करावी. अशी मागणी नगरपरिषदेसह तहसिलार व जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे .या मागणीची दखल तात्काळ प्रशासनाने नाही घेतली तर गुरुवार दि १० ऑक्टोबर रोजीपासून औसा शहरातील हाश्मी चौक येथे पाईप बदलो जन आंदोलन करण्याचा इशारा या निवेदनाद्वारे दिला आहे. परेन सालार, वकील इनामदार, फरहान सिद्दीकी , असदर पटेल , जमीर पठाण , रुपेश दुधनकर , अजहर परेल ,भुरुज शेख , आयुष पठाण आदी राष्ट्रवादी काग्रेसचे कार्यकर्ते उपस्थित होते

## गर्भपात करताना बोगस डॉक्टरांना रंगेहात पकडले; उदगीरमध्ये कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**उदगीर, दि. २२ सप्टेंबर-**

उदगीर परिसरात अवैद्य गर्भपात होत असल्याच्या घटना घडत असल्याची चर्चा चालू होती या पार्श्वभूमीवर येथील सामान्य रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी शहर व ग्रामीण पोलीस अधिकारी येथील बनशेळकी रोडवर असलेल्या एका बोगस डॉक्टरांच्या दवाखान्यात एका पीडित महिलेचा गर्भपात करत असताना रंगेहात पकडून त्यास ताब्यात घेण्यात आल्याची घटना घडली आहे.



याबाबत ग्रामीण पोलीस निरीक्षक राजकुमार पुजारी यांनी दिलेली अधिक माहिती अशी की, रविवारी रोजी तीन वाजण्याच्या सुमारास सामान्य रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉक्टर पांडुरंग दोडके डॉक्टर आरती वाडीकर शहर पोलीस निरीक्षक अभिषेक शिंदे ग्रामीण पोलीस निरीक्षक पुजारी यांच्या टीमने गर्भपात होत असल्याची माहिती मिळाल्यावर बनशेळकी रोड येथील चाचा हॉटेल शेजारी असलेल्या आपल्या क्लिनिक या दवाखान्यात छापा टाकला असता एका पीडित महिलेच्या चार महिन्याच्या गर्भपाताची प्रक्रिया करत असताना दिसून आले यावेळी गर्भपात करणारा डॉक्टर इरफान शमशुद्दीन मोमीन राहणार बाबा नगर निडेबन यांची चौकशी केली असता कसलेही वैद्यकीय शिक्षणाचे प्रमाणपत्र नसल्याचे निष्पन्न झाले पुढील उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे घटनास्थळावरून रक्ताचा स्त्राव गर्भपात गोळ्या औषधी इंजेक्शन सलाईन आदी ताब्यात घेऊन जप्त करण्यात आले आहे याप्रकरणी सदर बोगस डॉक्टर मोमीन व त्यास गर्भपातासाठी रुग्ण पुरविणाऱ्या धन्वंतरी आयुर्वेदिक मेडिकल रुग्णालयात काम करणाऱ्या फर्जंद पठाण राहणार मुसा नगर यांना ग्रामीण पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्यांच्यावर गर्भपात प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया ग्रामीण पोलीस ठाण्यात सुरू आहे याचा अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक परशुराम देवकते करीत आहेत उदगीर शहर व परिसरात गर्भलिंग चाचण्या व अवैद्य गर्भपात करण्याची राखीत पुन्हा सक्रिय झाले असल्याचे यावरून दिसून येते या पीडित महिलेला अगोदरची एक मुलगी आहे चार महिन्याची गरोदर असताना नेमका गर्भवतात कोणी करायला लावला याचा तपास पोलीस करत आहेत या महिलेने लिंग निदान चाचणी चाचणी उदगीर शहरात केली होती का शेजारील कर्नाटक राज्यात केली होती याबाबत कसून तपास करण्यात येणार असून दोषींवर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे राजकुमार पुजारी यांनी सांगितले.

## परिवहन महामंडळात लातूर विभागातील ६९ जणांची शिकाऊ उमेदवारांची होणार निवड

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. २२ सप्टेंबर-**

विभागाचे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या लातूर विभागात सन २०२४ - २०२५ भाग २ सत्रासाठी वेगवेगळ्या व्यवसायाकरिता शिकाऊ उमेदवार (प्रशिक्षणार्थी) म्हणून ६९ पदे ऑनलाईन पध्दतीने पदे निश्चित करण्यात आली आहे. यामध्ये मोटार मेकेनिक (यांत्रिक मोटारगाडी एमएमही)-४१, मोटारगाडी साठाजोडारी (एमव्हीबीबी) (शिट मेटल) १५, अॅटो इलेक्ट्रीकल ईलेक्ट्रीशियन (विजतंत्री) - ०७, सांधाता (वेल्डर) (गॅस अॅन्ड ईलेक्ट्रीकल)-०१, मेकॅनिक रेफ्रिजरेशन अॅड एअर कंडिशनर (प्रशितन व वातानुकुलिकरण टेक्नीशियन)-०२, मेकॅनिक ऑटो इलेक्ट्रीकल अँड इलेक्टॉनिक्स ०१, अभियांत्रिकी पदवीधर-०१, तसेच अभियांत्रिकी पदविका-०१ या पदांचा समावेश आहे. दहावी पास, आय.टी. आय किंवा विहीत व्यवसायात व्होकेशनल आभ्यासक्रम एमएसबीएसव्हीईटी पूर्ण केलेल्या तसेच (उमेदवांरानी सर्वप्रथम एनएपीएस वेब पोर्टलवरील www.apprenticeshipindia.gov.in व अभियांत्रिकी पदवीधर, अभियांत्रिकी पदवीकासाठी एनएटीएस-२.० (NTS-२.०) पोर्टलवरील www.nats.education.in या वेबसाईटवर १९ सप्टेंबर, २०२४ ते २९ सप्टेंबर, २०२४या कालावधीत ऑनलाईन रजिस्ट्रेशन करून MSRTC Division Latur E०११७२७००४६१ या आस्थापनेसाठी ऑनलाईन अप्लाय करणे आवश्यक आहे. ऑनलाईन रजिस्ट्रेशन केलेल्या उमेदवारांनी विभागीय कार्यालयात उपलब्ध करून दिलेले छापील अर्ज भरावेत. छापील अर्ज रा.प. विभागीय कार्यालय, जुना रेणापूर नाका, अंबाजोगाई रोड, लातूर (आस्थापना शाखा) येथे ३० सप्टेंबर, २०२४ ते ७ ऑक्टोबर, २०२४ रोजी (शनिवार व रविवार वगळून) वेळ १० ते दुपारी ३ या वेळेत मिळतील व लगेच स्विकारले जातील. अर्जासोबत जीएसटी १८ टक्के खुल्या प्रवर्गाकरीता रुपये ५९० व मागासवर्गीयांसाठी २९५ चा धनादेश किंवा आय.पी.ओ. (इंडियन पोस्टल ऑर्डर) MSRTC Fund ccount Latur या नावाने अर्ज घेतेवेळी सोबत असणे आवश्यक आहे. १९ सप्टेंबर, २०२४ ते २९ सप्टेंबर, २०२४ या कालावधी नंतर जे उमेदवार ऑनलाईन रजिस्ट्रेशन करतील, अशा उमेदवारांच्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. ते अर्ज रद्द समजले जातील व त्यांना या कार्यालयाचा छापील नमुन्यातील अर्ज मिळणार नाही. व ऑनलाईन रजिस्ट्रेशन केलेल्या उमेदवाराचे ७ ऑक्टोबर, २०२४ रोजी दुपारी ३ नंतर या कार्यालयात सादर केलेले विहीत नमुन्यातील अर्ज स्विकारले जाणार नाहीत. त्यांचा शिकाऊ उमेदवार भस्तीसाठी विचार केला जाणार नाही.

### डॉ. आंबेडकरांची पूर्णाकृती पुतळा उभारण्यासाठी मत नोंदवण्याचे आवाहन

**लातूर, दि. २२ सप्टेंबर-**

शहरातील नागरिकांना आवाहन करण्यात येते की, शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा कायमस्वरुपी ७५ फुट पुर्णाकृती पुतळा उभारणे करणे करिता आपल्या महानगरपालिकेच्या ( mclatur.org ) या संकेतस्थळावर व महानगरपालिका कार्यालायात, येथे वेगवेगळे असे ३ प्रकारचे मॉडेलच्या प्रतिकृतीचे संकल्पचित्र ठेवण्यात आले असुन महानगरपालिकेमध्ये ठेवलेल्या बंद पेटीमध्ये Option १ ते ३ पैकी एक दिनांक २५.सप्टेंबर रोजी पर्यंत आपले मत कळवावे असे आवाहन आयुक्त, बाबासाहेब मनोहरे यांनी केले आहे.

### निलंग्यात २७६ वाहनावर कार्यवाही; अडीच लाखांचा दंड वसूल



**तभा वृत्तसेवा,**
**निलंगा, दि. २२ सप्टेंबर-**

निलंगा शहरातील व मुख्य मार्गावरून बेशिस्त पळणाऱ्या वाहनांना शिस्त लावण्यासाठी निलंगा पोलिस अक्टीव्ह मोडवर आले असून स्पेशल ड्राईव्हद्वारे ३५ केसेस करून ३९ हजारांचा दंड वसूल केला आहे. पोलिस निरिक्षक सुधीर सूर्यवंशी यांच्या धडक कारवाईने वाहनधारकांचे धाबे दणाणले आहेत.

उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. नितीन कटेकर यांच्या मार्गदर्शनाखली पोलीस स्टेशन निलंगा अंतर्गत छत्रपती शिवाजी महाराज चौक निलंगा येथे निलंगा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सुधीर सूर्यवंशी यांचे आदेशाप्रमाणे सहाय्यक पोलीस निरीक्षक केंद्रे, पोलीस उपनिरीक्षक पल्लेवाड तसेच सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक विजय बिरादार, संदीप कांबळे आदीने विशेष मोहीम राबवून वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या विरुद्ध विविध कलमाखाली ३५ केसेस करून ३९ हजार रुपयाचा दंड फोटावला माहे १ सप्टेंबर ते आज पावतो २७६ वाहनांवर कार्यवाही करून दोन लाख ५२ हजारांचा दंड आकारले आहेत. त्यामुळे वाहनधारकांचे धाबे दणाणले आहेत. आता शहरात चालणाऱ्या विविध अवैध धंदेवाल्यावरही कारवाई केली जाणार असून रात्री आकरा वाजण्याच्या आत हाटेल, धाबे, बिअर-बार उघडे ठेवणाऱ्यांवर ही कारवाई केली जाणार आहे.



## 'विश्वेश्वरय्या'चे औद्योगिक प्रशिक्षण परिक्षेत यश

**महाविद्यालयाचा निकाल ९५ टक्के**

**तभा वृत्तसेवा,**
**औसा, दि. २१ सप्टेंबर-**

राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद , न्यू दिल्ली अंतर्गत घेण्यात आलेल्या परिक्षेत औसा तालुक्यातील आलमला येथील श्री विश्वेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ व्दारा संचलित विश्वेश्वरय्या औद्योगिक प्रशिक्षण महाविद्यालयाचा निकाल घोषित झाला आहे. या वर्षी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उज्ज्वल यश संपादीत करुन परंपरा कायम ठेवली आहे .

या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळविले असून वीजतंत्री व्दितीय वर्षातुन अशांत आगवाने ८७.८३ टक्के गुण घेऊन प्रथम, रोहित सुर्यवंशी ८७.६६ टक्के व्दितीय तर विशाल पवार ८६.१६ टक्के गुण घेऊन तृतीय आला आहे. तारतंत्री व्दितीय वर्षातुन हनुमान काकडे ८८.३३ टक्के गुण घेऊन प्रथम, अभिषेक उत्केकर ८८ टक्के व्दितीय तर कुनाल राठोड ८४.३३ टक्के गुण घेऊन तृतीय आला आहे. जोडारी व्दितीय वर्षातुन वैभव जाधव ८२.६६ टक्के गुण घेऊन प्रथम, पवन सुरवसे व जगदीश पाटील ८१.३३ टक्के व्दितीय तर विजय मसलगे ८१.१६ टक्के गुण घेऊन तृतीय आला आहे. मेकॅनिकल डिझेल या ट्रेडमधुन रत्नदिप सातपुते ८१.३३ टक्के गुण घेऊन प्रथम, शुभम फोलाने ८१.१६ टक्के व्दितीय तर दशरथ कांबळे ८१ टक्के गुण घेऊन तृतीय आला आहे. महाविद्यालयाचा एकुण निकाल ९५ टक्के लागला आहे .

विजतंत्री प्रथम वर्ष ऋतुजा आडे ८८.८३ टक्के गुण घेऊन प्रथम, शिवशंकर राठोड ८८.५० टक्के व्दितीय तर सुप्रिया चिवरे ८६.२० टक्के गुण घेऊन तृतीय आली आहे. तारतंत्री प्रथम वर्षातुन सुमित बोमणे ८८.८३ टक्के गुण घेऊन प्रथम, पंकज मगर ८१ टक्के व्दितीय तर जगदीश पाटील ८८.३३ टक्के गुण घेऊन तृतीय आला आहे. जोडारी प्रथम वर्षातुन वैभव गिरी ८८.६६ टक्के गुण घेऊन प्रथम, शिवहार शेटे ८६.३३ टक्के व्दितीय तर अभिषेक खोंड ८३.५० टक्के गुण घेऊन तृतीय आला आहे.

यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष शिवचरण धाराशिवे, उपाध्यक्ष प्रभाकर कापसे, सचिव बसवराज धाराशिवे, सहसचिव महादेव खिचडे, महाविद्यालयाचे प्राचार्य गोपाळ दंडिमे, विश्वेश्वरय्या अभियांत्रिकी पदविका महाविद्यालयाचे प्राचार्य प्रशांत धाराशिवे, गटनिदेशक प्रा. परमेश्वर गवळी, प्रा. सागर मसलकर, प्रा. अरबाज शेख, प्रा. दिनकर जळकोटे, प्रा. सागर तुरे, प्रा. एकनाथ चव्हाण, प्रा. रहिम शेख सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

# हुतात्मा स्मारकांसाठी ८ कोटींचा निधी मंजूर

**तभा वृत्तसेवा,**
**उदगीर, दि. २२ सप्टेंबर-**

मराठवाडा मुक्ती संग्रामात उदगीर व जळकोट तालुक्यातील तालुक्यातील स्वातंत्र्य सैनिकांचे व या लढ्यातील हुतात्म्यांचे मोठे योगदान आहे. नव्या पिढीला या हुतात्म्यांचे स्मरण होण्यासाठी बांधण्यात आलेल्या हुतात्मा स्मारकांची पडझड झाली असल्यामुळे या दोन्ही तालुक्यातील हुतात्मा स्मारकांच्या दुरुस्तीसाठी आठ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे. शिवाय उदगीर शहरातील भुयारी गटारे बांधकाम करण्यासाठी ३५० कोटींचा निधी मंजूर करण्यात आला असून, या कामाचा शुभारंभ उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते ३० सप्टेंबर रोजी होणार असल्याची माहिती राज्याचे क्रीडा युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांनी येथे आयोजित कार्यक्रमात बोलताना दिली.मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त येथील मराठवाडा जनता विकास परिषेदेच्या वतीने येथील हुतात्मा स्मारकात मराठवाडा मुक्ती संग्रामात लढा दिलेल्या स्वातंत्र सैनिकांच्या चित्रांचे प्रदर्शनाचा समारोप शनिवारी झाला. याप्रसंगी कार्यक्रमात ना. संजय बनसोडे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. एस. एस. पाटील होते. प्रास्ताविक जनता विकास परिषेदेचे सचिव प्रा. प्रवीण जाहुरे यांनी केले.



पुढे बोलताना मंत्री संजय बनसोडे यांनी मराठवाडा मुक्ती संग्रामाच्या लढ्यातील निजाम, रजाकार, किसान दल, हुतात्मे, स्वातंत्र्य सैनिकांची माहिती नव्या पिढीला मिळावी व या लढ्याचा इतिहास अभ्यासक्रमात होण्यासाठी आपण मुख्यमंत्र्यांकडे मागणी करणार आहे. उदगीर तालुक्यातील रामघाट व हत्तीबेट डोंगरात किसान दलाने लढा दिलेली ठिकाणे असल्यामुळे तोंडचिर येथे प्रवेशद्वारासाठी १ कोटींचा निधी उपलब्ध करून दिला आहे. तर हत्तीबेटाच्या विकासासाठी १०कोटींचा निधी उपलब्ध करून दिला आहे. या दोन्ही ठिकाणची कामे प्रगतीपथावर असल्याचे क्रीडामंत्री बनसोडे म्हणाले. या कार्यक्रमात विश्वनाथ मुडपे, विशाल तोंडचिरकर यांनी उदगीर तालुक्यातील लढ्याची माहिती सांगितली. व्यासपीठावर मुख्याधिकारी सुंदर बोन्दर, माधव खताळ यांची उपस्थिती होती. आभार प्रदर्शन राम मोतीपवळे यांनी केले.

**दूध डेअरीचे राजकारण करू नका**

उदगीर येथील शासकीय दूध डेअरी २००२ सालीच बंद झाली आहे. उदगीरची डेअरी पूर्ववत सुरू करण्यासाठी पुनरुज्जीवन समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीला मी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे व डेअरी सुरू करून देण्यासाठी लागेल तेवढा निधी मंजूर करून देण्याचे आश्वासन दिले आहे. डेअरीसाठी या समितीसोबत असताना कांही सदस्यांकडून राजकारण केले जात आहे. या समितीतील सदस्यांच्या मागणीनुसार राज्याच्या दुग्ध विकास मंत्र्यांचे एन. डी. डी. बी. ला पत्र मिळवून दिले. दूध डेअरीचे लिलाव झालेले भंगार घेऊन जात असल्याची माहिती समिती सदस्यांनी मला दिल्यानंतर ते पण थांबवले. असे असताना कांही सदस्यांकडून मला बदनाम करण्याचे षडयंत्र सुरू असल्याचे ना. बनसोडे यांनी सांगितले.

CMYK

लातूर
# दिनांक

लातूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केल

## विभागीय स्पर्धेत नवनाथ खिलारे यास रौप्य पदक

**तभा वृत्तसेवा,**
**औसा, दि.२२ सप्टेंबर-**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड विभागीय व अंतर विभागीय सर्वोत्कृष्ट शरीरष्टी पुरुष स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत श्री वेताळेश्वर शिक्षण संस्था संचलित लातूर कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयाचा बी फार्मसी तृतीय वर्षाचा विद्यार्थी नवनाथ खिलारेने विभागीय स्पर्धेत रोप्यपदक पदक व आंतरविभागीय स्पर्धेत कास्यपदक मिळवले आहे.



या उल्लेखनीय कामगिरी बदल संस्थेचे अध्यक्ष भीमाशंकर बावगे, सचिव वेताळेश्वर बावगे संचालक नंदकिशोर बावगे, माधुरी बावगे, प्राचार्य डॉ. श्रीनिवास बुमरेला, क्रीडा संचालक प्रा. चैतन्य पवार यांच्यासह अन्य प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी कौतुक केले.



## संक्षिप्त वृत्त



### मातृभाषेचा शब्दकोश विकसित करण्यासाठी मराठी वाङ्मय मंडळ : डॉ. पेन्सलवार

**उदगीर, दि. २२ सप्टेंबर-**

पुढील पिढीला मराठी भाषेतील शब्दसंपत्ती देणे, ही सर्व मराठी भाषिकांची सामूहिक जबाबदारी आहे. मराठी भाषा संवर्धन आज काळाची गरज झाली आहे. इतर भाषांविषयी आदर बाळगून मातृभाषेचा शब्दकोश विकसित करण्यासाठी प्रत्येक महाविद्यालयामध्ये मराठी वाङ्मय मंडळाची आवश्यकता असते, असे मत ग्रंथपाल डॉ. लक्ष्मीकांत पेन्सलवार यांनी व्यक्त केले. ते महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयातील मराठी वाङ्मय मंडळ उद्घाटन समारंभ प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. सुधाकर पाटील हे होते. यावेळी व्यासपीठावर मराठी विभागप्रमुख डॉ. दीपक चिद्दरवार, डॉ. बाळासाहेब दहिफळे, डॉ. अर्चना मोरे, डॉ. कोंडीबा भदाडे, मराठी वाङ्मय मंडळाचा अध्यक्ष ज्योतीराज साळुंके यांची उपस्थिती होती. प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख डॉ. दीपक चिद्दरवार यांनी केले. मंडळाची सदस्य मुक्ता सूळ या विद्यार्थिनीने 'महिलांवरील अत्याचाराबद्दल' ची कविता सादर केली तसेच आसावरी अपसिंगेकर या विद्यार्थिनीनेदेखील स्वलिखित कविता सादर केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंडळाच्या सचिव आसावरी अपसिंगेकर यांनी तर आभार श्वेता कांबळे या विद्यार्थिनींनी मानले. कवठाळे श्रुती व भोळे ऋतुजा या विद्यार्थिनीने मराठी वाङ्मय मंडळाची रांगोळी साकारली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मराठी वाङ्मय मंडळाचे सदस्य श्रीकांत पंचगुडे, सचिन यादव, प्रिन्स भालेराव, संध्या जमादार, जानवी केंद्रे, बुद्धभूषण सोनकांबळे, ऋतुजा भोळे, विद्या आचवलकर यांनी पुढाकार घेतला.

### हत्तीबेटावर फडकला तिरंगा

**उदगीर, दि. २२ सप्टेंबर-**



तालुक्यातील देवर्जन पंचक्रोशीत असलेल्या हत्तीबेट पर्यटन स्थळाच्या गडावर मंगळवारी तिरंगा फडकला. मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त स्वातंत्र्य सैनिकाचे पाल्य असलेले गंगापूरचे माजी सरपंच सुधाकर बिरादार यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. १९४८ साली हत्तीबेटावर किसान दल विरुद्ध निजामी लष्कर यांच्यात झालेल्या लढाईत किसान दलाचा विजय झाल्यामुळे हत्तीबेट गडाला मोठे महत्व आहे. जिल्हा प्रशासनाने हत्तीबेटावर ध्वजारोहण करण्याचे आदेश देशाच्या अमृतमहोत्सवी वर्षांपासून काढले आहेत. तेंव्हा पासून हत्तीबेटावर ध्वजारोहण होत आहे. मंगळवारी सकाळी स्वातंत्र्य सैनिकाचे पाल्य व माजी सरपंच सुधाकर बिरादार यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी सरपंच अभिजित साकोळकर, जि.प.चे माजी सदस्य चंद्रप्रकाश खटके, बाजार समितीचे माजी संचालक गजानन बिरादार, ग्रामसेवक महांडोळे, मुकुंद बुरांडे, विनोद रोडगे, कांतराव श्रीवास्तव, गुणवंत खटके, मधुसूदन गुडसुरकर, मनोहर कुलकर्णी यांच्यासह परिसरातील स्वातंत्र्य सैनिकांचे पाल्य व परिसरातील नागरिक उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार व्ही. एस. कुलकर्णी यांनी मानले.

### दैठणा येथे मराठवाडा मुक्ती संग्राम दिन साजरा

**दैठणा दि. २२ सप्टेंबर**



शिरूर-अनंतपाळ तालुक्यातील दैठणा येथील रामराव पाटील विद्यालयात मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनानिमित्त राजनारायण बिरादार यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी रामराव पाटील विद्यालयाच्या अनेक विद्यार्थ्यांनी भाषणे केली.यावेळी शाळेतील सर्व विद्यार्थ्याकडून स्वच्छता करण्याबाबची प्रतिज्ञा घेण्यात आली. राजनारायण बिरादार म्हणाले, महात्मा गांधीनी ज्या भारताचे स्वप्न पाहिले होते त्यामध्ये केवळ राजनैतिक स्वातंत्र नव्हते, तर त्या सोबतच एक स्वच्छ व विकसित देशाची संकल्पना होती. महात्मा गांधीजींनी गुलामीतून भारत मातेला मुक्त करुन स्वातंत्र्य मिळवून दिले. आता भारत मातेला अस्वच्छतेतून मुक्ती देऊन देशाची सेवा करणे आपले आद्य कर्तव्य आहे. मी शपथ घेतो की, मी स्वतः स्वच्छतेच्या बाबतील जागृत राहीन आणि त्यासाठी वेळ ही देईल. दरवर्षी १०० तास म्हणजेच प्रत्येक आठवडयातून २ तास श्रमदान करून स्वच्छतेच्या संकल्पनेला पूर्ण करेल. सूत्रसंचालन राजीव गुडे तर या कार्यक्रमातील मुख्य वक्ते म्हणून विठ्ठल कदम यांनी कार्य केले. या कार्यक्रमाचे मार्गदर्शक शिक्षक प्रभाकर कारभारी होते. कार्यक्रमाचे सहकारी विश्वजीत सांगवे आणि या कार्यक्रमाला सहकार्य करण्यासाठी गोविंद पेंटमशेटे यावेळी उपस्थित होते.

# औसा तालुक्यात नाले, ओढ्याला पूर; वाहतूक विस्कळीत

## तुंगीत आठ बग सोयाबीनची गंज पाण्यात, वीज गुल, ऊस आडवा

**तभा वृत्तसेवा,**
**औसा दि. २२ सप्टेंबर -**

औसा परिसरात शनिवार दि. २१ रोजी सायंकाळी ४ वा. सुमारास विजेच्या कडकडाटीसह वादळी वाऱ्यात तब्बल दोन तास जोरदार पाऊस झाला आहे. या वादळी पावसामुळे ताली भरुन फुटल्या असून काढणी केलेले व उभे असलेले सोयाबीन पाण्यात आहे. तर तुंगी येथे आठ बग सोयाबीनची बनीम पाण्यात आहे. नाले, ओढ्याला पूर आल्याने पिके पाण्यात गेली असून अनेक गावाचा संपर्क तुटला होता. या वादळात उभा ऊस आडवा पडला असून जिरायत व बागायत शेतकरी संकटात सापडले आहेत. या पावसाने नुकसान झालेल्या पिकांची पाहणी करुन पंचनामे करावेत अशी शेतकऱ्यांची मागणी होत आहे.



उजनी, लामजना, मातोळा, बेलकुंड, औसा व किल्लारी मंडळात सर्वाधिक पाऊस पडला. या वादळी पावसाचा सर्वाधिक फटका काढणी केलेल्या व काढणीस आलेल्या सोयाबीन या नगदी पिकाला सर्वाधिक बसला आहे. यावर्षी पावसाने मृग नक्षत्रातच जोरदार सुरुवात केली असल्याने शेतकऱ्यांनी याच नक्षत्रात अर्ध्याहून अधिक पेरण्या उरकल्या होत्या. त्यामुळे काढणी केलेले व काढणीला आलेले सोयाबीन मोठ्या प्रमाणात आहे. यामुळे ऐन काढणीच्या मोसमात पावसाने गाठल्याने शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. मात्र नेमक्या नुकसानीचा आकडा प्रशासनाकडून आजून मिळालेला नाही .

या पावसामुळे एकंबीतांडा ओढ्याला पूर आल्याने एकंबी, उजनीतांडा, एकंबीतांडा, एकंबीवाडी व धाराशिव जिल्ह्यातील टाकळी, पाडोळी अशा २५-३० गावाचा संपर्क जवळपास पाच तास तुटला होता. चिंचोली काजळे ओढ्याला पूर आल्याने गावातील व आशिव येथील शेतकऱ्यांना पाण्याला उतार मिळेपर्यंत पावसात भिजत काठावरच ताटकळत थांबावे लागले. मातोळा नाला तुडुंब भरुन वाहिल्याने आशिवा, मातोळा, देवताळा, हसलगण ते किल्लारी पर्यंतच्या गावकऱ्यांना तीन तास थांबावे लागले. तुंगी, औसा, बेलकुंड व परिसरातील ओढे नाले तुडुंब भरुन वाहिल्याने जवळपास तीन ते पाच तास गावकऱ्यांचा संपर्क तुटला होता. अनेक ठिकाणचे पाणी उभ्या व काढलेल्या पिकात घुसले असल्याने नुकसानीत भर पडली आहे. काढून टाकलेले सोयाबीन पावसात भिजले याचबरोबर ताली फुटून आलेल्या पाण्यात भिजले आहे. व काढणीला आलेले सोयाबीन भिजले असल्याने दीड हजाराने घसरण झालेल्या भावात काळे पडलेले सोयाबीनमधून काढणीचा खर्च तरी निघणार का ? आशी शंका शेतकऱ्यांना भेडसावत आहे. तुंगी येथील शेतकरी संदीपान पवार यांनी आठ बगची काढणी करुन बनीम लावून ठेवलेले सोयाबीन पाण्यात आहे. यामुळे १०० क्विंटलचे नुकसान झाले आहे.

## संगणक परिचालकांचा उद्या मुख्यमंत्र्यांच्या बंगल्यावर मोर्चा

**तभा वृत्तसेवा,**
**वलांडी, दि. २२ सप्टेंबर-**

ग्रामविकास व माहिती तंत्रज्ञान विभागांतर्गत आपले सरकार' प्रकल्पाच्या माध्यमातून ग्राम पंचायत स्तरावर कार्यरत असलेल्या राज्यातील संगणक परिचालकांनी २४ सप्टेंबरला मुख्यमंत्री एकनाथ शिंदेयांच्या ठाणे येथील निवासस्थानावर मोर्चा काढण्याचे निश्चित केले असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर सूर्यवंशी-चापोलीकर यांनी प्रसारमाध्यमांना माहिती दिली.

सुर्यवंशी- चापोलीकर म्हणाले, संगणक परिचालक १२ वर्ष प्रामाणिक काम करत आहेत, त्यांना सुधारित आकृतीबंधानुसार ग्रामपंचायत कर्मचारी दर्जा व किमान वेतन देणे किंवा कर्मचारी दर्जा व किमान वेतन देणे या मागणीसाठी राज्य संघटनेच्या वतीने येत्या मंगळवारी (ता. २४) राज्यातील सुमारे २९ हजार ग्रामपंचायतीमध्ये काम करणारे २४ हजार संगणक परिचालक मोर्चात सहभागी होत असून, मुख्यमंत्री शिंदे यांच्याकडून निर्णय होऊ शकतो, अशी सर्व संगणक परिचालकांची अपेक्षा आहे. शासन जो पर्यंत मागण्या मान्य करणार नाही,तो पर्यंत ठाणे सोडणार नसल्याचा निर्धार केला असल्याची माहिती सूर्यवंशी -चापोलीकर यांनी दिली आहे.

**राज्यातील २४ हजार संगणक परिचालक मोर्चात सहभागी होणार**

## महिलांच्या सुरक्षितेसाठी शिवसेनेच्या जयश्री उटगेंचा पुढाकार

**तभा वृत्तसेवा,**
**औसा, दि. २० सप्टेंबर-**

बदलापुर, चाकूर व भेटा येथे महिलांवर झालेल्या अत्याचाराच्या घटना भविष्यात घडू नये. यासाठी प्रशासकीय व स्थानिक पातळीवरील मरगळ घेतलेल्या योजनांना पुन्हा कार्यान्वित करुन नव्याने उपाययोजना राबविण्यासाठी शिवसेनेच्या जिल्हा महिला संघटक जयश्री उटगे यांनी पुढाकार घेतला. अंगणवाडी, बालवाडी, शाळा, विद्यालय, महाविद्यालय, स्कूल बस याची पाहणी केली. आणि मुली, महिलांच्या संरक्षणासाठी संबंधितांशी चर्चा करुन तात्काळ उपाय योजना राबवाव्यात, अशी मागणी केली.

बदलापूर येथे महिलेवर झालेल्या अत्याचाराच्या घटनेमुळे संपुर्ण राज्या हादरुन गेले. या घटनेची शाई वाळण्याच्या आत चाकुर येथे घटना घडली. यानंतर औसा तालुक्यातील भेटा येथील घटनेने अत्याचाराचा कळस गाठला. याचबरोबर महिला व मुलींच्या पालकात खुपच भितीचे वातावरण पसरले होते. त्यांना आधार देऊन घटना टाळण्यासाठी जिल्हा महिला संघटक जयश्री उटगे, शिवसेनेचे जेष्ठ नेते सुरेश भुरे यांनी औसा शहरातील अंगणवाडी, बालवाडी, शाळा, विद्यालय, महाविद्यालय, बसस्थानक, शिकवणी परिसर, वसतिगृह येथे जाऊन त्या ठिकाणांची प्रत्यक्षात पाहणी केली.यावेळी अनेक त्रुटी समोर आल्या, गुड टच बॅड टच बाबत अंगणवाडी ते महाविद्यालयापर्यंत माहिती द्यावी. सीसीटीव्ही तात्काळ सुरु कराव्यात. मुली, महिलांचे स्वच्छतागृह बंदीस्त करावेत. स्कुल बस मध्ये महिला कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी, खासगी वाहन असेल तर त्या वाहनात ट्रकर बसविणे गरजेचे आहे.



**महिला सुरक्षेसाठी तालुकास्तरावर अधिकाऱ्यांच्या गाटी भेटी**

पोलिस प्रशासनाने गस्त वाढवून गर्दीच्या ठिकाणी महिला कर्मचाऱ्यांची नेमणूक करावी. दामिणी पथक कार्यरत करुन रोडरोमिओंचा बंदोबस्त करावा. तर परिवहन महामंडळाने ग्रामिण भागातील बसेससाठी महिला वाहकांची नियुक्ती करावी, अशी मागणी पोलिस प्रशासन व आगार प्रमुख यांची भेट घेऊन करण्यात आली. यावेळी शिवसेनेच्या महिला आघाडीच्या कार्यकर्त्या, पदाधिकारी उपस्थित होत्या. शिवसेनेने घेतलेल्या या पुढाकारामुळे किमान औसा शहरात अशा घटनाना आळा बसेल, अशी शहरवासियांतून चर्चा होत आहे.

## कर्करोगाच्या आजाराबाबत जनजागृती करावी

**जयेश पटेल; उदगीर रोटरी क्लबचा पदग्रहण अन् पुरस्कार सोहळा**

**तभा वृत्तसेवा,**
**उदगीर, दि. २२ सप्टेंबर-**

भारतामध्ये दरवर्षी कर्करोगाच्या आजाराने ८० हजार महिला मृत्यू पावत आहेत. कर्करोगाच्या आजाराचे कारण केवळ अज्ञान हेच असून यावर नियंत्रण आणण्यासाठी रोटरी क्लबने कर्करोगाच्या आजाराविषयी महिलांमध्ये जनजागृती करणे काळाची गरज असल्याचे मत रोटरी क्लब डिस्ट्रिक्ट ३१३२ चे सन २०२६-२७ चे गव्हर्नर जयेश पटेल यांनी व्यक्त केले.

उदगीर येथे रोटरी क्लब ऑफ उदगीर सेंट्रलच्या नूतन पदाधिकाऱ्यांच्या पदग्रहण सोहळा ओमकार मंगल कार्यालयात पार पडला. यावेळी ते बोलत होते. याच कार्यक्रमात रोटरी क्लबच्या वतीने देण्यात येणाऱ्या राष्ट्राचे शिल्पकार व जीवनगौरव पुरस्काराचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रोटरी क्लब उदगीर सेंट्रलच्या अध्यक्षा सरस्वती चौधरी होत्या. व्यासपीठावर रोटरीच्या मावळत्या अध्यक्षा मंगला विश्वनाथे, सचिव ज्योती चौधरी, उपाध्यक्ष रवींद्र हसरगुंडे यांची उपस्थिती होती. प्रारंभी दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

शिक्षकांचा परिचय विक्रम हलकीकर यांनी करून दिला. सूत्रसंचालन विशाल तोंडचीरकर व डॉ. सुलोचना येरोळकर यांनी केले. आभार रोटरी क्लबच्या सचिव ज्योती चौधरी यांनी मानले. कार्यक्रमास रोटरीचे संस्थापक अध्यक्ष किशोर पंदीलवार, संतोष फुलारी, विजयकुमार पारसेवार, प्राचार्य व्यंकटराव कणसे, चंद्रकांत ममदापुरे, डॉ. सुधीर जाधव, अनिल मुळे, भागवत केंद्रे, रामदास जळकोटे, गोपाळ मुक्कावार, कमलेश पेठे, डॉ. माधव चंबुले, डॉ. विजयकुमार केंद्रे, डॉ. बसवराज स्वामी, नागेश आंबेगावे, लक्ष्मीकांत चिकटवार, सुनीता मदनूरे, विद्या पांढरे, डॉ. सुनीता चवळे सह मोतीलाल डोईजोडे, अजित पाटील तोंडचीरकर, मीरा चंबुले, संपदा गोरे, प्रा. अश्विनी देशमुख, अर्चना चिकटवार, डॉ. तृप्ती दाचावार, सीमा बाहेती, शामला मुक्कावार, डॉ. ज्योती गिरी, सुनंदा सरदार उपस्थित होते.




या कार्यक्रमात सेवानिवृत्त शिक्षिका उषा तोंडचिरकर यांचा जीवनगौरव पुरस्काराने सन्मान करण्यात आला तर महेश प्रा. विद्यालयाच्या मुख्याध्यापिका प्रतिभा बिरादार, सरदार वल्लभभाई पटेल विद्यालयातील शिक्षिका अनुराधा धोंड, हिप्परगा डाऊळ जिल्हा परिषद प्रा. शाळेच्या शिक्षिका वर्षा राठोड, मानकी येथील जिल्हा परिषद प्रा. शाळेच्या शिक्षिका सुनीता भंडे व मलकापूर येथील जिल्हा परिषद प्रा. शाळेच्या शिक्षिका प्रभावती वडजे या महिला शिक्षिकांचा राष्ट्राचे शिल्पकार या पुरस्काराने सन्मान करण्यात आला.

## महाराष्ट्र महाविद्यालयाची आरती गोमटे विद्यापीठात तृतीय

**तभा वृत्तसेवा,**
**निलंगा, दि. २२ सप्टेंबर-**



स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड च्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेत महाराष्ट्र महाविद्यालय,निलंगा येथील कला शाखेची विद्यार्थिनी आरती गोमटे हिने ८७.६९ गुण प्राप्त करून विद्यापीठात सर्व तृतीय स्थान पटकावले आहे.

महाराष्ट्र शिक्षण समितीचे अध्यक्ष विजयकुमार पाटील-निलंगेकर ,सचिव बब्रुबान सरतापे यांच्या मार्गदर्शनाखाली व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ माधव कोलपुके यांच्या नेतृत्वाखाली विविध पातळीवर गुणवत्ता वाढविण्यासाठी घेण्यात आलेल्या धोरणात्मक निर्णयामुळे महाविद्यालयाचा विद्यापीठ पातळीवर गुणात्मक विकास दिसुन येत आहे.

या वर्षी आरती लक्ष्मण गुमटे ह्या विद्यार्थिनीने महाविद्यालयाच्या यशस्वी तेची परम्परा कायम राखली या यशस्वी ते बदल संस्थेचे अध्यक्ष विजयकुमार पाटिल निलंगेकर , सचिव बब्रुबान सरतापे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ माधव कोलपुके,सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

## निलंग्यात सकल मराठा समाजाच्या वतीने मुंडण आंदोलन

**३०० फूट उंच टॉवरवर चढून केला निषेध**

**तभा वृत्तसेवा,**
**निलंगा, दि. २२ सप्टेंबर-**

गेल्या सहा दिवसांपासून मनोज जरांगे पाटील यांचे सुरू असलेल्या अंतरवली सराटी येथील आमरण उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी शासनाच्या विरोधात सकल मराठा समाज निलंगा तालुक्याच्या वतीने निलंगा शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात सामूहिक मुंडण आंदोलन करून शासनाचा निषेध केला. तर काही मराठा समाज बांधवांनी ३०० फूट उंच टॉवरवर चढून शासनाचा निषेध केला.

संपूर्ण महाराष्ट्रात मराठा समाज बांधवांनी मराठा योद्धा मनोज जरांग- पाटील यांना विविध आंदोलने करत पाठिंबा देत आहेत. मात्र गेल्या तेरा महिन्यापासून सुरू असलेल्या आंदोलनाला यश मिळत नाही. सरकार याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहेत, त्यामुळे शासनाने तात्काळ मराठा समाजाला ओबीसी मधून आरक्षण द्यावा अशी मागणी केली जात आहे. त्यामुळे गेल्या सहा दिवसांपासून मनोज जरांगे पाटील यांचे सुरू असलेल्या अंतरवली सराटी येथील आमरण उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी शासनाच्या विरोधात सकल मराठा समाज निलंगा तालुक्याच्या वतीने मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. आरक्षणासंबंधित तात्काळ सर्व मागण्या मान्य करावे अन्यथा यापेक्षाही तीव्र आंदोलन करण्यात येतील अशा तीव्र भावना सकल मराठा समाज बांधवांच्या वतीने व्यक्त करण्यात आले. यावेळी मराठा समाजाला सरसकट ओबीसीतून आरक्षण देण्याच्या मागणीसाठी आरक्षण आमच्या हक्काचं, नाही कोणाच्या बापाचं, लढेंगे जितेंगे, हम सब जरांगे, या सरकारचं करायचं काय, खाली मुंडकं वरी पाय, मनोज जरांगे पाटील तुम आगे बढो, हम तुम्हारे साथ हैं अशा घोषणाबाजी करत शासनाचा निषेध केला. यावेळी श्लोक दत्ता जाधव या अकरा वर्षाच्या विद्यार्थ्यांने मुंडण आंदोलन केले, तसेच राजेंद्र राघो या लिंगायत बांधवाणेही मुंडण केले व गणेश सूर्यवंशी, डिगंबर जाधव, अंकुश धनुरे, चक्रधर शेळके, किरण पाटील, माधव वाडीकर यांच्यासह असंख्य समाज बांधवांनी मुंडण केले आहेत.



तर अनेक मराठा समाज बांधवांनी येथील ३०० फूट उंच टॉवर वर चढून विविध रंगाच्या धुराचे नळकांडया फोडून शासनाचा निषेध केला. यावेळी पोलीस निरीक्षक सुधीर सूर्यवंशी यांनी स्वतः पोलीस फौज फाटा घेऊन ३०० फूट उंच टॉवर वर चढून आंदोलन करणाऱ्या समाज बांधवाना खाली येण्याची विनंती केली तसेच सकल मराठा समाज बांधवांनीही विनंती केले असतानाही आंदोलक खाली उतरण्यास तयार नव्हते. त्यानंतर येथील समाज बांधवांनी अंतरवली सराटी येथील मनोज जरांगे पाटील यांच्या सहकार्यांना फोनवर संपर्क साधून आंदोलकांना विनंती केले त्यानंतर सर्वांच्या विनंतीला मान ठेऊन आंदोलकांनी ३०० फूट उंच टॉवर वरून खाली उतरले. शेकडो मराठा समाज बांधव या मुंडण आंदोलनात सहभागी झाले होते.